श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड, संचालित

मासिक

# ॥ रघुवीर समर्थ ॥

e-mail : raghuvirsmasik@gmail.com

जून २०१३,
वर्ष सातवे, अंक सहावा,
मुल्य रु. १५



यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।।

# कीर्तन प्रशिक्षण वर्ग, सज्जनगड

## दिनांक : ११ ते १९ मे २०१३



कीर्तन प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी श्री.शंकर गोरे, श्री.अभिजीतबुवा, श्री.प्रसाद स्वामी, श्री.वासुदेवबुवा बुरसे, श्री.नारगोळकर, श्री.शहाजीबुवा रामदासी




श्रीसमर्थ समाधी मंदिरासमोर कीर्तन वर्गातील प्रशिक्षणार्थी, प्रशिक्षक ह.भ.प.श्री.वासुदेवबुवा बुरसे यांच्या समवेत



शिबिरार्थींना प्रशस्तिपत्र देताना संस्थानचे विश्वस्त श्री.बाळासाहेब स्वामी, संस्थानचे अध्यक्ष श्री.भूषण स्वामी श्री.वासुदेवबुवा बुरसे सोबत स.भ.श्री.मोहनबुवा रामदासी



कीर्तन प्रशिक्षण वर्गाच्या समारोप प्रसंगी श्री.बाळासाहेब स्वामी, श्री.भूषण स्वामी, श्री.वासुदेवबुवा बुरसे, श्री.मोहनबुवा रामदासी



श्री.वासुदेवबुवा बुरसे व सौ.गीताताई बुरसे यांना श्रीसमर्थ प्रसाद देताना संस्थानचे अध्यक्ष श्री.भूषण स्वामी सोबत श्री.बाळासाहेब स्वामी, श्री.मोहनबुवा रामदासी



जेष्ठ योगतज्ज्ञ प.पू.दादाजी वैशंपायन सज्जनगडावर आले असताना त्यांना श्रीसमर्थ प्रसाद देताना संस्थानचे विश्वस्त श्री.बाळासाहेब स्वामी व श्री.मोहनबुवा रामदासी



भाग्यनगर (हैद्राबाद) येथील श्रीसमर्थ पादुका दौऱ्यात पादुका पूजन प्रसंगी प.पू. साईसुंदरम् महाराज व भक्त मंडळी



श्री रामदासस्वामी संस्थान, सज्जनगड, संचालित
मासिक

# ।।रघुवीर समर्थ।।

जून २०१३/ वैशाख-ज्येष्ठ शके १९३५

श्रवण मनन निदिध्यास। प्रचितीने बाणतां विश्वास।
रोकडा साक्षात्कार, सायास। करणेंचि नलगे।।


- वर्ष सातवे
- अंक सहावा
- वार्षिक वर्गणी : रु. १५०
- चार वर्षांसाठी : रु. ५००
- आठ वर्षांसाठी : रु. १०००

• मालक •
श्री रामदास स्वामी संस्थान,
श्री रामदास स्वामींचा मठ,
मु.पो. सज्जनगड, ता.जि. सातारा.
पिन ४१५०१३
फोन (०२१६२) २७८२२१
Website :
www.samartharamdas.com
E-mail :
samartharamdas@gmail.com
• संपादक •
स. भ. मंदारबुवा रामदासी उर्फ
श्री.मंदार प्रदीपराव कुलकर्णी
• कार्यकारी संपादक •
डॉ. सौ. ज्योत्स्ना कोल्हटकर
• मानद उपसंपादक •
स. भ. मोहनबुवा रामदासी
• संपादन साहाय्य •
स. भ. अमृतबुवा रामदासी
• मुखपृष्ठ •
सौ. अर्चना धीरज पेटकर
• प्रकाशक/मुद्रक •
श्री. सूर्याजी गवालाक्ष स्वामी (C.A.)
श्री रामदास स्वामी संस्थान,
सज्जनगड, जि. सातारा,
• मुद्रण स्थळ •
श्री गजानन प्रेस,
७६ अ, चिमणपुरा, सातारा
• सल्लागार मंडळ •
- श्री. भूषण महारुद्र स्वामी
- ॲड. महेश. ना. कुलकर्णी
- ॲड. राजेन्द्र. ना. कुलकर्णी
- श्री. विजय प. ठोंबरे
- कलेक्टर ॲंड कोर्ट ऑफ वॉर्डस् सातारा यांचे प्रतिनिधी

हे मासिक प्रकाशक श्री रामदास स्वामी संस्थानचे वतीने प्रकाशक व मुद्रक श्री. सूर्याजी गवालाक्ष स्वामी यांनी श्री रामदास स्वामींचा मठ, मु.पो. सज्जनगड, ता.जि.सातारा, (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. श्री गजानन प्रेस, ७६ अ, चिमणपुरा, सातारा येथे मुद्रित केले. **संपादक**- स.भ.मंदारबुवा रामदासी उर्फ श्री.मंदार प्रदीपराव कुलकर्णी


## अनुक्रमणिका


- **संपादकीय** — मंदारबुवा रामदासी — ४
- **समर्थ महाद्धार** — शहाजीबुवा रामदासी — ७
- **चिंतन दासबोधाचे** — स.भ. मोहनबुवा रामदासी — ९
- **स्वामी विवेकानंदांच्या विचारांतील भारतीय नारी** — सौ. ज्योती संत — ११
- **मृत्यू - एक मध्यंतर** — डॉ. सौ. विद्या जोशी — १४
- **समकालीन संतांचे पसायदान** — श्री. विश्वनाथ प्रभुणे — २०
- **अभंग योगवासिष्ठ (लेखांक ३ रा)** — श्री. वामन वा. कोल्हटकर — २२
- **यज्ञसंकल्पना-३** — स. भ. शरयु दाते — २७
- **तुका म्हणे (अभंग ६ वा)** — सौ. माधुरी दि. जोशी — ३०
- **दृष्टांत** — अमृतबुवा रामदासी — ३४
- **स्वभावाला औषध नाही ?** — श्री. ग. प्र. कुलकर्णी — ३६
- **दास म्हणे** — श्री. प्रसादबुवा रामदासी — ३८
- **जुना दासबोध- निराभिमान शांति (लेखांक १० वा)** — सौ. मंजिरी श. धूपकर — ४०
- **नमस्कार माझा सद्गुरू रामदासा (लेखांक ८ वा)** — सौ. संध्या कोल्हटकर — ४३
- **विविध कार्यक्रम वृत्ते** — ४६


• लेखातील मजकुराशी संपादक/प्रकाशक/सल्लागार सहमत असतीलच असे नाही.



## संपादकीय

# हिंदवी स्वराज्य संस्थापक शिवकल्याण राजा

सर्व समर्थ भक्तांसी
सादर जय रघुवीर!



तमाम हिंदु धर्मीय आणि हिंदु धर्म व संस्कृतीबद्दल आदर बाळगणाऱ्या सर्वांसाठी ज्येष्ठ शुध्द त्रयोदशी शके १५९६ हा दिवस सदैव संस्मरणीय असाच आहे. शेकडो वर्षांची गुलामी झुगारुन देणाऱ्या छत्रपती श्री शिवाजी महाराज यांना याच दिवशी रायगडावर राज्याभिषेक संपन्न झाला. हिंदु संस्कृतीच्या छायेखाली अखंड भारत आनंदाने नांदत असताना इ.स. ७१२ पासुन मुस्लिम आक्रमकांनी या राष्ट्राला धक्के द्यायला सुरुवात केली. धर्मांधता, परधर्माबद्दल आत्यंतिक अनादर, हिंदुधर्म संपवण्याचाच त्यांचा हेतू होता. तत्पूर्वी हिन्दुस्थानात विविध प्रदेशात अनेक राजांची छोटीछोटी राज्ये होती व त्यांच्यात परस्पर वैरही असे परंतु त्यांची श्रध्दास्थाने एक असल्यामुळे सर्वसामान्य जनता, स्त्रिया, लहान मुले, देवदेवतांची मंदिरे, धर्मवेत्ते ब्राह्मण यांचा कधीही अकारण छळ होत नसे.

कोणत्याही राष्ट्राला एकसंध राहण्यासाठी त्यातील विविध समूहांचे श्रध्दास्थान समान असावे लागते. उपास्य दैवत व उपासना पध्दती एक असावी लागते. जरीही उपास्य दैवत व उपासनापध्दती भिन्न असली तरी आपणाहून भिन्न उपासनापध्दतीबद्दल आदरभाव असावा लागतो. यादृष्टीने हिंदुधर्म व इस्लाममध्ये फरक होता व आहे. हिंदुधर्मात सगुण-साकार, सगुण-निराकार, निर्गुण निराकार अशा सर्व स्वरुपात देव मानला जातो. एकेश्वरवाद अनेकेश्वरवादही आहे. द्वैत, अद्वैत, द्वैताद्वैत, विशिष्टाद्वैत इत्यादी सिध्दांताचाही समावेश आहे. षड्दर्शनांपैकी सांख्यदर्शन व पूर्वमीमांसा ही दर्शने निरीश्वरवादी आहेत आणि तरीही त्यांना आस्तिक दर्शन मानले जाते.

या विविध मार्गांमध्ये सैध्दांतिक मतभेद असले तरी परस्परांचे अस्तित्व नाकारण्याइतके मनभेद नसतात.

**आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरः। सर्वदेवनमस्कारः केशवं प्रतिगच्छति ।।**

अशी विविधतेतील एकतेचे महत्त्व पटवणारी 'आर्य, सनातन, वैदिक, हिंदु धर्म संस्कृती व तीचा इतिहास या आर्यावर्त, हिन्दुस्थान, भारत, इंडिया नावाने ओळखल्या जाणाऱ्या भुगोलातुन वजा केला तर बाकी काय उरेल ?

परंतु असे प्रयत्न सातत्याने व दीर्घकाळ मुस्लिम आक्रमकांनी केले. मुस्लिम आक्रमकांनी हिंदु धर्मातील पूजनीय प्रतीकांची विटंबना, स्त्रियांवर अनन्वित अत्याचार, बळजबरीने व अमिषाने धर्मांतरण अशा विविधमार्गांनी हिंदुंचे सत्व, स्वत्व व हिन्दुस्थानची सत्ता यांचे हरण केले.

हिन्दुस्थानच्या वीरांचे शौर्य व पंडितांची बुध्दिमत्ता अल्पस्वल्प स्वार्थात मग्न होती. स्वतःचे शौर्य परकीयांचे दास्य करण्यासाठी झिजत होते. अशा कठीण प्रसंगात श्री शिवाजी महाराज उभे राहिले. स्वराष्ट्र

व स्वधर्म यासाठी साम, दाम, दंड, भेद अशा सर्वही राजनीतींचा वापर राजकारणात करुन, गनिमी काव्याने व प्रत्यक्ष समरांगणातही हिंदुधर्म व हिंदुराष्ट्रविरोधी शक्तींना धुळ चारली. हे कार्य करित असताना स्वकीय राजधुरीण व धर्मधुरीणांचा विरोधही त्यांनी मोडून काढला.

श्री समर्थ म्हणतात ...

**स्वधर्माआड जे विघ्ने । ते ते सर्वत्र उठिली । लाटीली कुटीली देवे । दापिली कापिली बहु ।।**

**बुडाले सर्वही पापी । हिन्दुस्थान बळावले । अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभुवनी ।।**

**कल्पांत मांडला मोठा । म्लेंछदैत्य बुडावया । कैपक्ष घेतला देवी । आनंदवनभुवनी ।।**

ज्येष्ट शु. त्रयोदशी शके १५९६ ला रायगडावर राज्याभिषेक संपन्न झाला. रायगडावर सिंहासनाधीश्वर झालेली श्रीमंत छत्रपती श्रीशिवाजीराजे भोसले ही केवळ एक व्यक्ती नव्हती तर लाखो हिंदुंचा मूर्तिमंत स्वाभिमान होता. श्रीसमर्थ म्हणतात -

**देव धर्म गो ब्राह्मण । करावया संरक्षण । हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ।।**

छत्रपती श्री शिवराय अस्तिक होते. धर्मनिष्ठ होते, प्रजापालनाचा धर्म जाणणारे होते, हिंदू धर्मातील पूजनीय प्रतिकांचे रक्षण करण्यासाठी कटिबध्द होते. धर्मकार्य करून समाजाला सुसंस्कारित करणाऱ्या ब्राह्मणाला दिलेले दानपत्र व ब्राह्मणास अनुचित असे धर्मद्रोही कृत्य करणाऱ्या कृष्णाजी भास्कर कुळकर्ण्यांस दिलेला मृत्युदंड ह्या तात्विक दृष्टीने ब्राह्मण रक्षणाच्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

**काशी की कला गई । मथुरा में मस्जिद भई । अगर शिवबा न होते तो । सुन्नत होती सबकी ।।**

धर्माच्या अनुयायांकडून होत असलेल्या वर्तनावरून धर्म ओळखला जातो ही गोष्ट काही अंशी सत्य असली तरी अशा प्रकारे झालेली ओळख नेहमी अपूर्णच असते. म्हणूनच अनुयायांच्या गैरवर्तणुकीमुळे धर्मावर आसुड ओढू नयेत, हे पथ्य बहुतांश विचारवंत, राजकारणी हिंदू धर्माच्या बाबतीत पाळताना दिसत नाही. वर्षानुवर्षे इस्लामच्या अनुयायांकडून होणाऱ्या अतिरेकी कृत्यांमुळे जग होरपळून निघतांना दिसत असूनही देशाच्या उच्चपदस्थ असलेल्या जबाबदार व्यक्ती 'इस्मामी दहशतवाद' हा शब्द कधीही वापरत नाहीत. परंतु 'हिंदू दहशतवाद' 'भगवा दहशतवाद' हा शब्द बिनदिक्तपणे वापरतात व हिंदू धर्माला बदनाम करतात. पुन्हा आम्ही छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रातले आहोत, याचा मिथ्या अभिमान मिरवतात. हा प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांचा अवमान नव्हे का ? असो. हे सर्व अरण्यरुदन ठरेल, अशाप्रकारे छत्रपती शिवरायांना निधर्मी व इस्लामधार्जिणे ठरवण्याचा पध्दतशीर डाव खेळला जात आहे.

छत्रपती शिवाजी महाराज परधर्मविरोधी नव्हते हे असत्य नसले तरी ते हिंदू होते, हिंदुधर्मनिष्ठ होते, हिंदुधर्माभिमानी होते हे निखालस सत्य आहे हे कोणीही नाकारू शकणार नाही.

छत्रपती शिवराय हिंदू म्हणून जन्मले, हिंदू म्हणून जगले आणि हिंदू म्हणूनच त्यांनी शेवटचा श्वास घेतला. मी अपघाताने हिंदू म्हणून जन्माला आलो, मी हिंदू म्हणून जन्माला आलो परंतु हिंदू म्हणून मरणार नाही, असे छत्रपती शिवरायांना वाटले नाही. आज गल्लीबोळात नवनवीन धर्मसंस्थापक उभे राहत आहेत. परंतु दिल्लीचे तख्त हलवणाऱ्या या महान पराक्रमी राजाने आपल्या लोकप्रियतेच्या व शक्तीच्या बळावर नवीन धर्म स्थापना केली नाही. कारण महापुरुष आपल्या परंपरांशी विद्रोह करीत नाहीत तर परंपरांमध्ये निर्माण झालेल्या अनिष्ट रुढी बाजुला करून त्यातील उदात्तता समाजापर्यंत नेऊन समाजात स्नेह वाढवतात.

या संपूर्ण विश्वात असा एकही धर्म व पंथ नाही की ज्यात अनुयायांच्या असमंजसपणामुळे, स्वार्थामुळे इ. कारणांनी दोष व कुप्रथा निर्माण झाल्या नाहीत.आपल्या राष्ट्रात व धर्मात निर्माण झालेल्या अनिष्ट प्रथांवर कडाडुन टिका करणारे स्वामी विवेकानंद म्हणतात, I have come to fulfil not to destroy

**धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार । जाले आहेत पुढे होणार । देणे ईश्वराचे ।।**

सामान्यातील सामान्य लोकांच्या हृदयसिंहासनावरून ढासळलेला धर्म, नीतीन्याय, यांची पुनर्स्थापना करण्याचे कार्य महापुरुष करतात म्हणून ते अवतार म्हणवले जातात. असे महान कार्य छत्रपती श्रीशिवरायांनी केले आहे.

**मुख्य ते हरिकथा निरूपणा । दुसरे ते राजकारण ।।**

राजकारणाच्या माध्यमातून राष्ट्रात सुशासन येण्यासाठी भक्तीच्या माध्यमातून सुसंस्कार पेरणे महत्त्वाचे असते. सुसंस्काराच्या पायावरच सुशासन उभे राहते. राजकारण व धर्माचा संबंध हा असा आहे.

संतांची कामगिरी हिंदवी स्वराज्याला अशाप्रकारे पूरक ठरली आहे. संत श्री तुकाराम महाराजांच्या प्रत्येक अभंगातुन वेद, उपनिषद्, श्रीमत् भगवद्गीता, श्रीमत् भागवत आदि धर्मग्रंथात प्रतिपादन केलेल्या आचार व विचारांना समाजमनाने आत्मसात करावे, अशी तळमळ दिसते.

श्री तुकाराम महाराजांच्या आचार, विचारांचा तसेच श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या आचार, विचार, प्रचार आणि प्रतिकाराच्या उपदेशाचा प्रचंड परिणाम समाजमन सुसंस्कारित ठेवण्यावर झाला आहे. या सुसंस्कारित मनातच सुशासनाची इच्छा उत्पन्न होते, टिकते व त्यासाठी वाटेल तो त्याग व पराक्रम करायला समाजमन सिध्द होते.


छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकदिनानिमित्ताने श्रीशिवप्रभुंचे, श्रीसमर्थ रामदास स्वामींचे जगद्गुरु श्री तुकोबारायांचे स्मरण होते. छत्रपती शिवरायांना स्वराज्याच्या सिंहासनापर्यंत पोहोचण्यासाठी सर्वस्व पणाला लावून लढणाऱ्या अठरापगड जातीतील ज्ञात-अज्ञात मावळ्यांचे स्मरण होऊन त्यांच्या चरणी मन नमन होते. सहज कृतज्ञतेने डोळे भरून येतात. या सर्वही महापुरुषांच्या स्मृतीमूर्तींवर अश्रुंचा अभिषेक होतो. श्रीसमर्थांचे शब्द पुनःपुन्हा आठवतात.

**म्लेंछ दुर्जन उदंड । बहुता दिसांचे माजले बंड ।**
**याकारणे अखंड । सावधान असावे ।।**
**शिवरायांचे आठवावे रूप । शिवरायांचा आठवावा प्रताप ।**
**शिवरायांचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ।**
**याहूनी करावे विशेष । तरीच म्हणवावे पुरुष । यालपरी विशेष काय लिहावे ।।**

ते स्वराज्य, ते सुराज्य आज आहे का ? ते आणण्याची तीव्रइच्छा शक्ती, आपापल्या क्षेत्रात यादृष्टीने 'जनमत' तयार करण्याचे कार्य आपण करत आहोत का ? शिवरायांचा आदर्श ठेवून, राष्ट्रधर्माचे पालन करून, राष्ट्राचा भौतिक व सांस्कृतिक विकास घडवणाऱ्या व्यक्तींच्या हाती राज्यकारभार असावा, असा संकल्प श्री शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने करूया !

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

- मंदारबुवा रामदासी (भ्रमणध्वनी - ९७६३२७१४०७)
C/o स.भ. मीनाताई भावे, श्रीधर-दत्त निवास, ४८४/८७, मित्रमंडळ सोसायटी, पुणे-४११ ००९.




मो. ९४२१८७१८६८

सर्व समर्थ भक्तांसि

सादर जय रघुवीर!

चैत्र कृष्ण चतुर्दशी यादिवशी श्री समर्थ शिष्या श्री वेणास्वामी यांच्या पुण्यतिथीनिमित्त गडावरील त्यांच्या समाधी वृंदावनास षोडशोपचार अभिषेक करण्यात आला.

दि. १३ मे अक्षय्य तृतीया या दिवशी श्रीसमर्थ समाधीस अभिषेकानंतर दरवर्षीप्रमाणे सकाळी १० वाजता सुगंधीत चंदनाच्या गंधाचा लेप लावण्यात आला. श्रीसमर्थ समाधीस गंधलेपन केले जाते. वर्षातून फक्त अक्षय्य तृतीया या दिवशीच श्रीसमर्थ समाधी पूर्ण उघडी असते. समाधीवर वस्त्र घातले जात नाही. उघड्या समाधीच्या दर्शनाचा लाभ अनेक भक्त दिवसभर घेत असतात.

**धन्य धन्य ते नगर। जेथे कथा निरंतर।**
**गुण गाती भगवंताचे। तेचि मानावे दैवाचे।**
**स्वये बोले जगजीवन। थोर कलीयुगी कीर्तन।**
**रामदास म्हणे भले। हरिभक्ती उद्धरले।।**

श्रीसमर्थांनी वरील अभंगातून कीर्तन भक्तीची भरभरून स्तुती केली आहे. महाराष्ट्रात चारशे वर्षापूर्वी नारदीय व वारकरी कीर्तन परंपरा होती. त्यातीलच नारदीय कीर्तन परंपरेचं अनुसरण करून श्रीसमर्थांनी त्या आधारावर रामदासी कीर्तन पद्धतीची मुहुर्तमेढ रोवली. श्रीसमर्थ हे स्वतः उत्तम कीर्तनकार होते. श्रीसमर्थांनी आपल्या अवतार काळात अनेक उत्तम कीर्तनकार शिष्य तयार केले. भगवंताचे गुणानुवाद समाजापर्यंत पोहचवण्याचे उत्तम साधन म्हणून श्रीसमर्थांनी कीर्तनाचा उपयोग केला. कीर्तन ही एक भक्ती आहे. साधक या भक्तीद्वारे भगवंताची प्राप्ती करून घेऊ शकतो.

श्रीसमर्थांनी आपल्या मधुरवाणीने मृतप्राय महाराष्ट्र नव्हे तर अवघा देश जिवंत केला. श्रीसमर्थांनी गावोगावी कीर्तने केली. कीर्तनाद्वारे रामभक्ती बरोबरच स्वदेश, स्वधर्म आणि स्वराज्य यांचे स्फुल्लिंग मनामनांत चेतवले. यावनी अत्याचाराने हीनदीन, गलितगात्र, मरगळलेल्या हिंदू समाजाला श्रीसमर्थांनी कीर्तनातून जागे केले. आचारहीन, विचारहीन, कृतीहीन झालेल्या समाजाला भक्कम अशा सद्‌विचारांचा आधार दिला.

कीर्तन ही श्रीसमर्थांची आवडती भक्ती होती. म्हणून या विचाराला अनुसरून श्री रामदास स्वामी संस्थान आयोजित रामदासी कीर्तन प्रशिक्षण शिबीर १० मे ते १९ मे या कालावधीत गडावर संपन्न झाले. शिबीराचे हे तिसरे वर्ष होते. दिवसेंदिवस रामदासी कीर्तनकारांची संख्या घटत चालली आहे. म्हणून रामदासी कीर्तनकार तयार करण्याचा संकल्प संस्थान ने केला आहे. पहिल्या वर्षी ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. दुसऱ्या वर्षी ३५ विद्यार्थी होते तर तिसऱ्या वर्षी ४५ विद्यार्थी होते. महाराष्ट्रातून अनेक जिल्ह्यांतून हे विद्यार्थी आले होते. महाराष्ट्रातील श्रीसमर्थांचे मठ, त्या मठातील रामदासी मठपतींची मुलं या प्रशिक्षणाचा लाभ घेतील व त्यामुळे प्रत्येक मठातील कीर्तन परंपरा चालू राहील. निदान त्या मठाच्या उत्सवाच्या वेळेस त्यांना दुसरे बाहेरून कीर्तनकार बोलवण्याची गरज पडू नये. प्रत्येक मठातील मठपतीचा मुलगा कीर्तनकार असावा.

ज्या ज्या भागात मठ आहेत त्या त्या भागात त्या मठाकडून, त्या मठाच्या मठपतींकडून कीर्तनाच्या माध्यमातून ''रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड नेऊन समाज जागृती, राष्ट्रजागृती, धर्मजागृतीचे कार्य मोठ्या प्रमाणात करता येईल. श्रीसमर्थांच्या वाङ्‌मयाचा, विचारांचा प्रचार करण्याचा कीर्तन हा अतिशय सुलभ मार्ग आहे. म्हणून रामदासी कीर्तनकार तयार व्हावेत यासाठी संस्थानने हा प्रयत्न चालवला आहे.

सद्यस्थितीत देशाला व धर्माला आलेली ग्लानी कीर्तनाच्या माध्यमातूनच आपण घालवू शकतो. देशात

होणारा भ्रष्टाचार, नेतेगिरी, नीतीभ्रष्टता हे देशावर येणारे मोठे संकट आहे. पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण, भोगवाद व स्त्रीयांवर होणारे अत्याचार हाही चिंतेचा विषय आहे. राष्ट्राचे व धर्माचे कोणासही काही देणेघेणे नाही. प्रत्येकजण आपापल्या स्वार्थी, संकुचीत कामात तल्लीन आहे. देशात अनेक ठिकाणी धर्मांतराचे कार्य मोठ्या प्रमाणात चालू आहे. या संकटाला तोंड देण्यासाठी चांगल्या विचारांच्या प्रचारकांची आवश्यकता आहे. खेडोपाडी अजून तरी कीर्तनकारांवर समाजाची श्रद्धा व विश्वास आहे. त्यात कीर्तनकार जर ''आधी केले मग सांगितले'' या विचारांचा असेल तर निश्चित समाजाच्या विचारात व आचारात फरक पडेल.

हा विचार समोर ठेवून संस्थान दरवर्षी रामदासी कीर्तन प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करीत आहे. दि. १० मे रोजी श्री प्रसाद स्वामी यांच्या हातून श्रीसमर्थ प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करून शिबीरास सुरुवात झाली. या शिबीरास कीर्तन प्रशिक्षक म्हणून स.भ. वासुदेवबुवा बुरसे व त्यांच्या पत्नी सौ.गीताताई वासुदेव बुरसे यांचे मार्गदर्शन लाभले. कीर्तनात बुवांना जसे अपेक्षित आहे तसेच ते मुलांकडून करून घेतात. बुरसे बुवांसारखे प्रशिक्षक मिळणे ही मुलांच्या दृष्टिकोनातून खरी श्रीसमर्थ कृपाच म्हणावी लागेल. यावेळेस बुवांनी श्रीसमर्थ शिष्य ''मधुकर'' हे आख्यान मुलांकडून बसवून घेतले.

दि. १८ मे रोजी दुपारी श्रीसमर्थ मंदिरातील सभामंडपात सर्व विद्यार्थ्यांचे कीर्तन प्रात्यक्षिक घेण्यात आले. त्यावेळेस संस्थानचे अध्यक्ष व अधिकारी स्वामी श्री. भूषण स्वामी, श्री.बाळासाहेब स्वामी, श्री. मोहनबुवा रामदासी उपस्थित होते.

दि. १९ मे रोजी सकाळी सर्व विद्यार्थ्यांना संस्थानकडून प्रमाणपत्र व झांजा देण्यात आल्या. त्यावेळेस विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना संस्थानच्या व्यवस्थेबद्दल अंतःकरणपूर्वक आभार मानले.श्री.भूषण स्वामी, श्री, बाळासाहेब स्वामी, श्री. मोहनबुवा रामदासी, श्री. वासुदेवबुवा बुरसे यांनी विद्यार्थ्यांना आशीर्वादपर मार्गदर्शन केले. उपस्थित मान्यवरांच्या हातून विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

## मान्यवरांच्या भेटी

**ॐ आनंद हिमालयं विष्णुं गरुडध्वजं ॐ ।**
**ॐ शिवंदत्तं गायत्री सरस्वती महालक्ष्मी प्रणमाम्यहम् ॐ।।**

दि. १४/५/२०१३ रोजी प. पू. दादाजी व त्यांचे भक्तगण सज्जनडावर आले होते. संस्थान मधील सर्व सेवेकऱ्यांना त्यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व सेवेकऱ्यांना त्यांनी लक्ष्मी प्रसाद दिला. तसेच दादाजींनी श्रीरामदास स्वामी संस्थानला २५,०००/- रु. देणगी दिली.

नांदेड येथील शिवसेना जिल्हा अध्यक्ष श्री.निखिल लातूरकर यांनी सहकुटुंब श्रीसमर्थ समाधीचे दर्शन घेतले. तसेच कीर्तनकार स.भ. श्री.श्रीराम रोडे मालेगाव वाशिम यांनी कीर्तन शिबीरास भेट दिली.

## कीर्तन प्रशिक्षण शिबिर

खालील कीर्तनकार हे सज्जनगडावरील रामदासी कीर्तन प्रशिक्षण शिबिरात प्रशिक्षित झालेले आहेत.

१) श्री अथर्व आशिष तांबोळकर, २) श्री.केदार संतोष पानसरे, ३) प्रतिक ज्ञानेश्वर जगताप, ४) कल्पेश सुरेश वाघ, ५) सौ. ज्योती सुहासराव पालीमकर, ६) सौरभ सुमंत रामदासी, ७) ज्ञानदा वासुदेव बुरसे, ८) अनुपमा अनंत कांदळगावकर, ९) श्रीधर सितारामबुवा रामदासी १०) सदिच्छा मनोहर दिवाकर, ११) रेणू विनोद रामदासी, १२) स्वरांजली प्रशांत संत, १३) मनाली मिलिंद उपाध्ये, १४) शुभम भानुदास पंचभाई, १५) अमोल धुंडीराज रामदासी, १६) प्रसादबुवा रामदासी, १७) शहाजीबुवा रामदासी

समर्थभक्तांनी नवोदित कीर्तनकारांना कीर्तन करण्याची संधी अवश्य द्यावी.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

**पृष्ठ प्रायोजक :**
**स. भ. श्री. स्वानंद कुलकर्णी, मिरज**
**एस. के. इन्व्हेस्टमेंटस्**

चिंतन दासबोधाचे -

# सद्गुरू स्तवन

स.भ. मोहनबुवा रामदासी, सज्जनगड, मो. ९४२११७७८२१

### आता सद्गुरू वर्णवेना

सद्गुरूंचे स्तवन शब्दांनी होऊ शकत नाही, कारण शब्द निर्माण झालेले असतात. शब्दांना उगम आहे आणि अंतही आहे. शब्द निर्माण करणारा कुणीतरी आहे. शब्द निर्माण करत असताना शब्दाची मांडणी मनात आधी झालेली असते. शब्द निर्माण होण्यासाठी किंवा करण्यासाठी माध्यमाची गरज आहे. याचाच अर्थ शब्द परस्वाधीन आहेत. शब्द निर्मिती नंतर किंवा शब्दाच्या मांडणीवरून अहंची बाधाही होऊ शकते. ज्याचे वर्णन करायचे तोच वर्णनातीत असेल, मर्यादित तोडक्या मोडक्या शब्दांनी वर्णन करून अंतःकरणाचे समाधान होणार नसेल तर वर्णन न करणे हेच त्याचे खऱ्या अर्थाने वर्णन असेल. शब्दांच्या मर्यादा ओलांडून जाणे सर्वसामान्यांना शक्य होत नाही. काहीजण शब्दांनी भरपूर वर्णन करतात आणि शेवटी म्हणतात यापेक्षा हे वर्णन किती तरी पटींनी वेगळे आहे.

सद्गुरू याचाच अर्थ जे सद् म्हणजे सत्य आहे, अशा गुरूंचे वर्णन कसे करणार ? ज्यांचे वर्णन करावे ही मनाची उर्मीच जर परमार्थाला घातक होत असेल तर ती उर्मीच जर मला आत्मवस्तूपासून दूर नेत असेल तर अशा वर्णनाचा मोह आपल्याला होऊच नये, बोलण्याची वृत्तीच आपल्याला निवृत्तीपासून दूर लोटण्याचा प्रयत्न करीत असते. वृत्तीची निवृत्ती व्हावी हा संकल्प सुद्धा पुन्हा आपल्याला वृत्तीच्याच दावणीला बांधत असेल तर वृत्तीच्या निवृत्तीसाठी ज्यांना प्रार्थना करतो त्यांना सद्गुरू असे म्हणतात.

सगुणाच्या माध्यमातून निर्गुणाची उपासना करावी असे समर्थ सांगतात. सगुणाच्या उपासनेचे अंतिम साध्य म्हणजे सद्गुरूंची कृपा. ज्यांची कृपा झाल्यानंतर बोलणे थांबते, मनाच्या क्रिया संथ होतात, अंतःकरणात शुद्ध गंगेच्या प्रवाहाप्रमाणे ज्याचे विचार अत्यंत शुद्ध होतात असे शुद्ध विचार आपल्याला हरिद्वार दाखवत असतात. समर्थांना सद्गुरुंचे वर्णन किंवा महती वर्णन करणे अशक्य होते असे नाही पण, आता सद्गुरू वर्णवेना हेच सद्गुरुंचे वर्णन आहे. त्यापेक्षा वेगळे वर्णन काय असू शकणार ?

मायेच्या आधारावरच सगळी वर्णने अवलंबून असतात. मायाच हे वर्णन करून घेत असते. मायेच्या अस्तित्वावर जी जी वर्णने केली जातात ती ती सर्व मिथ्या असतात, मायेचा स्पर्श होतो ते मिथ्या, असत्य असते. मायेचा स्पर्श होत नाही ते ते सर्वसत्य असते. त्या सत्याचा विचार आपण करू.

सद्गुरूंचे वर्णनच वर्णनातीत आहे. मायेचा खेळ इतका भयानक असतो. भल्याभल्यांना मायेने वेड लावले. परमार्थातील सर्वात मोठा अडसर म्हणून मायेकडे पाहिले जाते. ती माया सुद्धा ज्या स्वरूपाला घाबरते तिचा स्वभाव तिला बदलावा लागतो. मायेने सद्गुरूंच्या चरणाकडे धाव घेणे म्हणजे काजव्याने दिव्यावर झेप घेऊन आपला स्वतःचा देहत्याग करण्याप्रमाणेच आहे. जीवावर उदार होऊन प्राणाची आहुती द्यावी असे मायेला सुद्धा वाटत नाही. कारण सद्गुरूंच्या चरणापर्यंत जाण्याचा ज्या साधकांचा प्रयत्न असतो त्यांचा कस किंवा परीक्षा पहाणे हे मायेचेच काम असते. साधकांना त्यांच्या स्व-स्वरुपापर्यंत पोहोचण्यासाठी त्याला अनेक परिश्रम, अडीअडचणी, संकटे, शारीरिक, मानसिक दोन्हीही प्रकारांचे सामोरे जावे लागते. हा मायेचाच खेळ असतो. समर्थांचे सद्गुरूंचे बद्दलचे चिंतनच वेगळे आहे. या सर्व अनुभूती

घेऊनच समर्थ म्हणतात,

**आता सद्‌गुरू वर्णवेना। जेथे माया स्पर्शो शकेना।**

मायेचा स्पर्श अत्यंत वाईट आहे. मायेच्या स्पर्शाइतका विटाळ दुसरा कुठलाही नसेल. कारण चांगला विचार करता करता हे मन इतक्या खालच्या पातळीवर त्याला स्वतःला घेऊन जाते हे त्याचे त्यालाही समजत नाही.

या शब्दातच यमाचे अस्तित्व असते. यमाचा घाला जसा चुकवता येत नाही त्याप्रमाणे मायेचा घालासुद्धा चुकवता येत नाही.

स्वरुपाचे अज्ञान हेच सर्वात कठीण असते.

स्वरुपाचे ज्ञान मला झाले आहे असे जो तोंडाने सांगत असेल त्याच्या इतका अज्ञानी अन्य कुणी असणार नाही. ज्ञान करून घेणे हा शब्दप्रयोगच अज्ञान दशेत घेऊन जातो. म्हणून मी अज्ञानी आहे अशी सतत मनाची धारणा ठेवून जो साधना करतो त्याची वाटचाल खऱ्या अर्थाने ज्ञानाच्या दिशेने सुरू आहे हेच खरे.

समर्थ म्हणतात-

**मज न कळे हा विचारु। दुरूनी माझा नमस्कारु।**
**गुरूदेवा पैलपारु। पाववी मज ।।**

सद्‌गुरूंच्या वर्णनाचा विषयच मला समजत नाही. कारण सद्‌गुरूंच्या समोर किंवा त्यांच्या वर्णनाचे वेळी विचार पांगळा होतो. हा विचार सतत करावा. विचारांचे आणि अविचारांचे स्थान वेगवेगळे असत नाही. दूध गाईचे असेल, म्हशीचे असेल, शेळीचे असेल दूध एकच असते. वरील प्रकारामध्ये दुधाच्या चवीत कदाचित फरक असू शकतो. घट्ट, पातळपणाही असू शकतो पण दूध हा प्रकार एकच असतो. दुधावर प्रक्रिया एकच प्रकारची आहे. विचाराच्या कंपाऊंडमध्ये अविचाराची जनावरे शिरून तेथील कुरणाचे अस्तित्वच संपून टाकले जाते.

समर्थही म्हणतात बाकीचे विचार लक्षात येतात पण हा विचारू याला फार महत्त्व आहे. तो विचार माझ्या लक्षात येत नसलेमुळे समर्थ म्हणतात त्यापेक्षा दुरूनच नमस्कार करणे योग्य होते. समर्थ जेव्हा दुरून नमस्कार म्हणतात, तेव्हा आपण काय करावे ? कारण आपला नमस्कार नेहमी दुरूनच असतो.

जवळून केलेल्या नमस्कारामध्ये तेवढी तीव्रता, आत्यंतिक श्रध्दा असण्याची आवश्यकता आहे. आपली योग्यता नसेल, आपण पूर्व पवित्र नसू तर देवघरात देवाजवळ जाण्याचा सुद्धा आपल्याला संकोच होतो. आपल्या मनातील अपवित्रता आपल्याला दूर ठेवते. अंतःकरणाचे पावित्र्य हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. दुरूनही केलेला नमस्कार तिथपर्यंत पोहोचत असतो. दुरून केलेल्या नमस्कारामध्ये अंतःकरणाची व्यापकता आणि विशालता लपलेली असते.

अंतःकरणातला एक भाव जवळ घेऊन जाण्याच्या प्रयत्नात असतो. देवाच्या पायाला हात लावला किंवा मला माझ्या हाताने पूजा करण्याची संधी मिळावी हा विचार थोडासा संकुचित पणाचा वाटतो. सर्वत्र चराचरात परमेश्वर भरून उरलेला आहे. ही व्याप्त भूमिका महत्त्वाची असते. तीच इथे पहावयास मिळते.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

## पुढील अंकात...

### श्री योगीराज कल्याण स्वामी

**आषाढ महिन्यापासुन श्री योगीराज कल्याण स्वामींच्या त्रिशताब्दी पुण्यतिथी वर्षास प्रारंभ होत आहे. यानिमित्त संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे यांचा विशेष लेख पुढील अंकात...**

## पुढील अंकापासून...

### अध्यात्माची रहस्यकथा

**अध्यात्मातील गुढवादावर श्रीमत् ग्रंथराज दासबोधातील तत्त्वज्ञानाच्या आधारे चिंतन मांडणारी विशेष लेखमाला. पाश्चिमात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानाचे अभ्यासक श्री. विष्णु भास्कर अभ्यंकर यांच्या सहज सुंदर शैलीत...**
**पुढील अंकापासून 'रघुवीर समर्थ' वाचकांच्या भेटीला...**

# स्वामी विवेकानंदांच्या विचारांतील भारतीय नारी

सौ. ज्योती संत, सातारा, मो. ९४२१४३७०७९

**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः**

अर्थात जेथे स्त्रिया संतुष्ट असतात, जेथे त्यांना योग्य तो सन्मान मिळतो, तेथे देवतांचा वास असतो.



ज्या देशात स्त्रियांना योग्य तो सन्मान मिळतो आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला अनुकूल असे वातावरण निर्माण करण्यात येते तो देश उन्नतावस्थेत पोहोचत असतो. स्वामी विवेकानंदांनी हे ओळखले होते म्हणूनच आपल्या लिखाणातून आणि व्याख्यानातून भारतीय स्त्रियांवर त्यांनी मार्मिक विवेचन केले आहे. विवेकानंदांच्या काळात स्त्रिया उंबरठ्याच्या आत होत्या. परंपरा व रुढी यांनी जखडलेल्या होत्या. त्यांचे जीवन स्वामींनी लहानपणापासून पाहिले होते. समाज सुधारण्यासाठी प्रथम स्त्रियांनी स्वतःची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. तो बदल स्त्रियांनी स्वतःच केला पाहिजे असे स्वामीजींचे मत होते. भारतीय स्त्रीचे कुटुंबातील स्थान, समाजातील स्थान, भारतीय स्त्री व पाश्चात्य स्त्री यातील भेद, भारतीय स्त्रियांच्या समस्या व त्यांच्या निराकरणाचे उपाय अशा विविध विषयांवर स्वामीजींची मते स्पष्ट होती. त्यांच्या या विचारांचा थोडक्यात हा परिचय-

'स्त्री' हा शब्द म्हटला तरी आपल्या हिंदूंच्या मनात 'मातृभाव' उत्पन्न होतो. परमेश्वराला देखील आपण 'आई' म्हणून आळवतो. भारतीय कुटुंब आईच्या तंत्राने चालत असते आणि म्हणूनच ते कुटुंब असते. मातृत्व हेच भारतीयांच्या दृष्टीने स्त्रीत्वाचा सर्वोत्कृष्ट अविष्कार होय. कारण तेथे स्वार्थाचा कणमात्रही लवलेश नसतो. मूर्तिमंत सहनशीलता म्हणजेच 'आई' अशी आपली संकल्पना आहे. तीच आपला आदर्श असते. भारतीय संस्कृतीतील मातेची थोरवी गाताना 'आद्य शंकराचार्य म्हणतात, ''पुत्र हा कुपुत्र असू शकतो पण माता कधीच कुमाता असू शकत नाही.' स्त्रीमधल्या या मातृरूपी शक्तीचे आपण पूजन करतो. पण पाश्चात्य देशात स्त्रीपूजन होते ते तिच्या सौंदर्याचे म्हणजेच स्त्री केवळ उपभोग्य वस्तू आहे. या जाणीवेने केलेले. त्यात पावित्र्याचा, मांगल्यतेचा कुठेही स्पर्श असत नाही आणि हाच स्त्रीबद्दलचा भारतीयांचा दृष्टिकोन आणि पाश्चिमात्यांचा दृष्टिकोन यांच्यात महत्त्वाचा फरक आहे.

यानंतर स्त्रीचे दुसरे रूप समोर येते ते 'पत्नी' म्हणून. हिंदूंच्या दृष्टीने ती केवळ पत्नी नसते तर असते 'सहधर्मचारिणी'. नवऱ्याच्या सुखात, दुःखात अगदी कुठल्याही प्रसंगी त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणारी. याचा मूर्तिमंत आदर्श म्हणजे रामपत्नी 'सीता' होय. आज रामायण होऊन हजारो वर्षे झाली तरीही सर्वांना ती तेवढीच पूज्य वाटते. एका मर्यादापुरुषोत्तम राजाची पत्नी असूनही कुठल्याही प्रकारची खंत एका शब्दाने देखील व्यक्त न करता तिने दारूण दुःखाने भरलेले जीवन कंठले. सीतेच्या पदचिन्हांचा मागोवा घेतच भारतीय स्त्रीयांनी आपला उत्कर्ष साधावयास हवा. भारतीय स्त्री जीवनाच्या उन्नतीचा हाच एकमेव मार्ग आहे. सीता चरित्रात जो आदर्श व्यक्त झाला तो अद्यापही भारतीयांच्या मनात आहे.

वैदिक काळात वेदपठण करणारी स्त्री आज एवढी दीन का झाली आहे ? ती केवळ प्रजोत्पादनाची यंत्र झाली आहे का ? माणूस म्हणून तिचे भवितव्य काय ? जी स्त्री पुरूषांच्या बरोबरीने वेदपठण करीत असे. गार्गी, मैत्रेयी या ब्रह्मवादिनी होत्या. ती स्त्री आज कुठे आहे ? कशामुळे हे सर्व घडले ? त्याचे कारण म्हणजे या शक्तिरूपिणी स्त्रीची अवहेलना हेच आहे आणि त्यामुळेच समाजाचा अधःपात होतो आहे. हीच गोष्ट आताच्या परिस्थितीलाही लागू होते. आजूबाजूला घडणाऱ्या स्त्रियांवरील अत्याचाराच्या बातम्या वाचताना हेच लक्षात येते. समाजाची घसरण कशामुळे होते याचे कारणही हेच आहे की स्त्रीचा सन्मान न करायला शिकणे. पाश्चात्य संस्कृतीचा आपल्या मनावर एवढा पगडा बसला आहे की आपल्या संस्कृतीचे मूळ कशात आहे हेच आपण विसरत चाललो आहोत आणि त्यासाठीच आध्यात्मिक संस्कार प्रत्येकावर करणे महत्त्वाचे आहे.

स्त्री जातीचा अभ्युदय झाल्याखेरीज समाजाचे कल्याण होणे अशक्यच असते. यासाठी स्त्रीयांना केवळ शिक्षण देऊन चालणार नाही तर स्त्रियांनी आपली योग्यता इतकी वाढवायला हवी की आपले प्रश्न त्या आपल्या पद्धतीने सहज सोडवू शकतील. त्यांच्याखेरीज अन्य कुणीही हे कार्य समाधानकारक करू शकणार नाही. फक्त स्त्रीयांना शिक्षित करणे एवढेच आपले काम आहे आणि हे शिक्षण त्यांना भारतीय पद्धतीने देण्यात यावे. त्यांच्या शिक्षणात कोणते विषय असावेत ? तर आधुनिक विज्ञानाच्या सहाय्याने पुराण, इतिहास, गृहकार्य, कला, गृहपरिपालनाचे नियम, आदर्श चरित्र घडविण्यासाठी पाहिजे असणारी नीती या सर्व विषयांचे शिक्षण स्त्रियांना द्यायला हवे. स्त्रियांनी धर्मपरायण व नीतीपरायण असायलाच हवे. कारण याच विद्यार्थिनी उद्याच्या माता आहेत. ज्या घरात माता धर्मपरायण असते तेथील संतती अशा प्रकारचीच घडते आणि अशा संततीवरच देशाचे कल्याण अवलंबून असते.

सध्या ज्याप्रकारचे शिक्षण प्रचलीत आहे त्या शिक्षणाचा उपयोग केवळ पैसा मिळवण्यासाठीच होतो. तसले शिक्षण नाही तर यथार्थ शिक्षण स्त्रियांनी घ्यायला हवे. ज्यायोगे चरित्र घडेल, बुद्धीचा विकास होईल आणि स्वावलंबीही होता येईल. याबरोबर थोडे वीरत्व सुद्धा आवश्यक आहे. समाजाची वृत्ती पाहता स्त्रियांनी स्वसंरक्षणाचे शिक्षण घेणे आवश्यक बनले आहे. धर्म हा शिक्षणाचे सार आहे. शिक्षण जर धर्महीन असेल तर त्यात चुका राहणारच. त्यामुळे धर्माला केंद्र करून स्त्री-शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. धर्माला गौण स्थान देणे हेच सध्याच्या स्त्री शिक्षणातील दोषाचे कारण आहे. समाज सुधारकांनी स्वतः धर्माचा अभ्यास न करता स्त्री शिक्षण हाती घेतल्यामुळे त्यांच्याकडून अशा प्रकारच्या चुका झालेल्या आहेत. पण काही झाले तरी सर्व स्त्री-पुरुषांना शिक्षण दिले पाहिजे. त्या शिक्षणाच्या जोरावरच चांगले-वाईट ठरवू शकतील आणि आपोआपच वाईट परंपरा, रूढी यांचा त्याग करतील.

भारतीय संस्कृती ही प्राचीन वैदिक संस्कृती आहे असे मानले जाते. त्या संस्कृतीचे प्रवर्तक 'आर्य' हे स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. प्राचीन काळी स्त्रियांचा वाटा पुरूषांसारखाच असल्याचे आपल्याला आर्यांच्या वाङ्मयात आढळते. वेदातील एक सूक्त एका स्त्री ऋषीने केलेले आहे. स्त्रिया ह्या कधीही पौरोहित्य करू शकत नाहीत असा अर्थ ज्यातून अप्रत्यक्षपणे काढता येईल असा एकही उतारा वेदवाङ्मयात नाही. उलट स्त्रिया पौरोहित्य करीत असल्याची कितीतरी उदाहरणे त्यात आहेत. तर मुलांप्रमाणे मुलींनाही सुशिक्षित करावे असे स्मृतिकार 'मनू' म्हणतो.

राजनीतीनिपुणता, प्रदेशांचा कारभार पाहणे, देश चालविणे इतकेच नव्हे तर युद्ध करणे या सर्व बाबतीत स्त्रियांनी स्वतःला पुरुषांच्या बरोबरीने सिद्ध केले आहे. संधी मिळेल तेव्हा स्त्रिया आपल्या जवळ पुरुषांएवढीच योग्यता आहे हे सिद्ध करून दाखवतात आणि नैतिकतेच्या बाबतीत त्या पुरूषांच्या वरचढ असतात.

स्वामी विवेकानंदांचे विचार पाहताना असे जाणवते की आजच्या काळातही हे विचार किती तंतोतंत लागू पडतात. लौकिक अर्थाचे शिक्षण घेऊनही स्त्रियांना योग्य तो सन्मान आजही मिळत नाही. यासाठी स्वामीजींचे हे विचार समाजातील सर्व थरांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. भारतीय धर्म आणि भारतीय संस्कृती यांची चाललेली अधोगती हीच स्त्रियांवरील अन्यायाला कारणीभूत आहेत. भारतीय संस्कृती आणि धर्म यावर श्रद्धा ठेवल्यानेच परिस्थितीत बदल घडेल कारण समाजाला देण्यासारखे भारताजवळ हजारोपट अधिक आहे हे आपण विसरता कामा नये.

हिंदू धर्मावरील व्याख्याने देण्यासाठी स्वामीजी जगभर फिरले पण भारतीय संस्कृतीएवढी आदर्श संस्कृती त्यांना कोठेच आढळली नाही. या आदर्श संस्कृतीमध्येही कालांतराने दोष निर्माण झाले. त्याचे निवारण करण्यासाठी स्त्रीयांची मानसिक उन्नती झाली पाहिजे. कारण आपण आपली संस्कृती विसरल्यामुळेच समाजाचे अधःपतन झाले असे स्वामीजींचे स्पष्ट मत होते.

भारतातील स्त्रीयांचे जीवन सर्व दृष्टीनी उन्नत बनविणे हे आपले कर्तव्य आहे आणि ते जर योग्य रितीने पार पाडले तर भारताचे भवितव्य खचितच उज्ज्वल होईल असा स्वामीजींना विश्वास होता. स्वामीजींचा हा विश्वास सार्थ ठरविणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. स्वामीजींच्या जन्माला या वर्षी १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्त त्यांच्या स्मृतीला अभिवादन करून स्वामीजींचे हे विचार प्रत्येक भारतीयापर्यंत पोहोचवण्याचा संकल्प करूया.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**




## श्रध्दांजली

सौ. इंदूमती पद्माकर ठोंबरे यांचे दि.२५ मे २०१३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ७२ वर्षांच्या होत्या. श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगडचे विश्वस्त व संपर्क माध्यमांतील व्यावसायिक श्री. विजय ठोंबरे यांच्या त्या मातोश्री होत्या.

सौ. इंदूमती ठोंबरे यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

संस्थानच्या श्रीसमर्थ सेवा कार्याबद्दल त्यांना विशेष आपुलकी होती. आपला पुत्र सज्जनगडाच्या संस्थानची ‘विश्वस्त’ म्हणून जबाबदारी स्वीकारून समर्थ सेवा कार्य करित आहे, त्याबद्दल त्यांना विशेष समाधान होते.

श्रीरामदास स्वामी संस्थान ठोंबरे परिवाराच्या दुःखात सहभागी आहे. सौ. इंदुमती ठोंबरे यांच्या आत्म्यास चिरशांती प्राप्त होवो, हीच श्रीसमर्थ चरणी प्रार्थना !

# मृत्यू - एक मध्यंतर

डॉ. सौ. विद्या जोशी, चेंबूर, मुंबई, फोन- (०२२) २५२८८५३२, मो.- ९३२२१६२३३०

पहाटेच्या साखरझोपेतून जागी झाले ती या शीर्षकानेच ! मृत्यु- एक मध्यंतर! खरोखरच, मृत्यु हे मध्यंतर आहे ? कशाचं? जीवनाच्या कलाकृतीचं ? माझं मन विचार करू लागलं. माझ्या डोक्यामध्ये , झोपेत हा विचार कसा आला , का आला ! मी रात्री झोपताना ''श्रीराम जय राम जयजयराम'' असा जप करत झोपले होते. तरी मृत्युबद्दल हा एक थोर विचार माझ्या मनाला शिवला. परमार्थाच्या मार्गावर मृत्युचा विचार करणं, त्यामागचं तत्त्वज्ञान जाणून घेणं गरजेचं आहे, म्हणून !

मध्यंतर.. दोन भागांमधला हा काळ ! माझ्या डोळ्यासमोर एखाद्या नाटकाचे मध्यंतर उभे राहिले. नाटकात एक अंक संपतो आणि दुसरा अंक सुरू होण्यापूर्वी मध्यंतर होतो. या मध्यंतराच्या अगोदर नाटकाचा क्लायमॅक्स झालेला असतो. पुढे काय होणार याची उत्सुकता मनात घेऊनच आपण सारे नाट्यगृहाच्या बाहेर येतो. बाहेर आल्यावर आपण पुढे काय होणार याची चर्चा करतो, कुणी वाफाळलेला चहा घेत शांतपणे उभा असतो. कुणी कुठे जातो तर कुणी कुठे ! काहीजण बसल्या जागीच असतात, एकमेकांत गप्पा मारत. कुणाला इकडे तिकडे बघता बघता आपला जुना मत्र दिसतो, मग पुढे जाणं, त्याच्याशी बोलणं, नाही तर फक्त नेत्रपल्लवी, हस्तपल्लवीवरच भागवलं जातं. याचाच अर्थ असा की मध्यंतरात सर्वजण मुक्त असतात. मध्यंतरानंतर मात्र पुन्हा आपल्या स्थानावर स्वतःला बांधून घेतात, दुसरा अंक बघण्यासाठी!

असं जर मध्यंतर आहे, तर मृत्यु खरोखरच मध्यंतरासारखा आहे का ?आपल्याला मृत्यु येतो तो आपल्या नकळत, क्लायमॅक्स गाठूनच! मृत्युनंतर आपलं काय होतं, ते आपल्याला माहित नसतं. जेव्हा माणूस मेला असं आपण म्हणतो, तेव्हा त्या व्यक्तीचं शरीर तर आपल्याला समोर दिसत असतं.. तरी तो मेलाय असं आपण का म्हणतो ? जेव्हा आपण त्या व्यक्तीला जाळतो वा पुरतो तेव्हा आपल्याला त्याचे शरीरच जळताना वा मातीखाली गेलेले दिसते. तरी आपण त्या क्षणापासून तो नाही, असे म्हणतो. तर मग मृत्यु म्हणजे नेमके काय आहे. ते मध्यंतर कसे ठरते ?

याचे कारण म्हणजे जे दिसते ते माणसाचे खरे स्वरूप नव्हे. तर अजरामर आत्मा त्या व्यक्तीच्या शरीर, मन, बुद्धी, अहंकार, इंद्रिये यांच्यामध्ये खेळत असतो. त्या आत्म्याच्या खेळाचे मध्यंतर होते व तो शरीर बदलतो. त्यामुळे पहिले शरीर मृत झाले असे आपण म्हणतो. मनुष्य शरीरातील सर्व पेशी तसेच हृदय, फुफ्फुसे व मेंदूही कार्य करण्याचे बंद करतात. तेव्हा मनुष्य मृत झाला असे आपण म्हणतो. विचार करता करता मला गीतेमधील एक ओळ आठवली.

**मृत्युः सर्वहरश्चाहमुद्‌भवश्च भविष्यताम् ।**

श्रीकृष्ण अर्जुनाला सांगत आहे की,''सर्वांचा नाश करणारा मृत्यु आणि पुढे होणाऱ्यांच्या उत्पत्तीचे कारण म्हणजे मी आहे.'' मृत्यु सर्वांवर सत्ता चालवितो. त्याच्यावर मात्र कुणाचेच राज्य चालत नाही. तो स्वतंत्र आहे. बलाढ्य, दुर्बळ, श्रीमंत, गरीब, सज्जन, दुष्ट, लहान, मोठा, योगी, चोर, शहाणा, वेडा, शास्त्रज्ञ, वेदज्ञ, संसारी, संन्यासी, पंडित, विचारवंत, पराक्रमी, शस्त्रधारी, सत्कीर्ती असणारे वा अपकिर्ती असणारेही, सिद्ध, वैद्य, उच्चवर्णीय, नीचवर्णीय, ब्राह्मण, शूद्र, वैश्य, क्षत्रिय, एवढेच नव्हे तर जारज, उद्‌भिज, अंडज आणि स्वेदज अशा सर्वांवर त्याचे अधिराज्य चालते. चौऱ्यांशी योनीपैकी कुठल्याही योनीत जन्माला आला की तो मरणारच हे

तत्त्व जन्माबरोबरच येते. त्यापासून कुणाचीही सुटका नाही. आपला देह ज्याप्रमाणे अनित्य आहे त्या प्रमाणे विश्वातील सर्व जीव अनित्य आहेत. या सर्व देहांत व त्यांच्या भोवतालीही ब्रह्म भरलेले आहे. परंतु आपल्या अज्ञानामुळे, अविद्येमुळे आपल्याला ते दिसत नाही समजत नाही. आपण मृत्युपासून कुठे दूर जायचे ठरविले तरी तसे जाऊ शकत नाही. मरणाची भिती सर्वांनाच वाटते. कुणालाही मरण नको असते. पण ते टाळणे शक्य नाही. मृत्यु आपल्या मागे येऊन आपल्याला नेमक्या वेळी गाठतोच. त्यामुळे त्याच्याशी लपंडाव खेळता येत नाही. खरे तर परमेश्वराचे अवतार म्हणून जन्मास आलेले श्रीराम, कृष्ण हे देखील मृत्युपासून सुटका करून घेऊ शकलेले नाहीत. सर्वांना एकच नियम तो लावतो. जो जन्माला आला तो मरणारच, हाच तो नियम. कधी, कसा, कुठे हे मात्र मृत्यु त्याचे तो ठरवितो. या विश्वातील चराचरांवर मृत्युचेच राज्य चालत असल्यानेच जगाला मृत्युभूमी असे नाव पडले आहे. आपल्या आयुष्यात पुढे काय होणार आहे ते आपल्याला आधी कळत नाही. त्याचप्रमाणे आपल्याला मृत्यु कधी येणार आहे, याचा अंदाजही आपल्याला येत नाही. एवढेच नाही तर एखादी व्यक्ती मेली की जाळले वा पुरले जाते. त्यानंतर त्याचे नातेवाईक व सगेसोयरे आपली नित्यकर्मे पूर्ववत करू लागतात. हळूहळू मृत माणसाला विसरूनही जातात. मेलेल्या व्यक्तीचे कार्य काही काळपर्यंत जगात टिकते.हळूहळू तेही नाश पावते, लयास जाते. या मृत्युचे कोडे सुटल्याखेरीज, मृत्युचा गंभीरपणे विचार केल्याखेरीज मानवी जीवनाचा खरा अर्थ, मनुष्याला कळणे शक्य नाही. जीवनाची खरी किंमत माणसाला समजत नाही.

जेव्हा परमेश्वराने विश्वाची रचना केली, तेव्हाच अनित्य गोष्टींमधले बदल निश्चित केले असावेत. प्रत्येक जीवाला जन्म,वाढ, झीज,वार्धक्य आणि नाश या स्थित्यंतरातून जावे लागणार हे नक्की केले. माणसाचे जीवनचक्र स्थिर झाले. तसे झाले नसते तर सारे जीव या भूमीवर साठून,कोंडून राहिले असते. सगळ्यांचे जीवन एकसूरी झाले असते. म्हणूनच देवाने सगळ्यांची सोय केलेली दिसते. शेवटी जीवन म्हणजे तरी काय... स्वतःची अंतर्बाह्य वाढ करणे, फुलारणे, प्रगती करणे होय. झीज आणि वार्धक्य यांची जाण असल्यानेच स्वतःचा विकास करण्याची प्रवृत्ती मनात उचंबळून येते. आपल्या स्वतःमध्ये डोकावून आपले गुण जाणणे, त्यांची वाढ करणे, सर्व बाजूंनी स्वतःची प्रगती करणे, व्यक्तिमत्व विकास करणे म्हणजेच यशस्वी जीवन जगणे होय. हे सारे कमवायचे असेल तर माणसाला उद्योगी रहावे लागते. सतत काही ना काही काम करावे लागते. हेच आपल्या हातून होणारे कर्म होय. माणसाने कर्म करण्याचे सोडले तर उत्क्रांती होणारच नाही, वाढ खुंटेल. जीवन तर कीटक, प्राणी, जनावरेही जगत असतात. पण आहार, निद्रा, भय आणि मैथून याशिवाय मनुष्याच्या मेंदूची शक्ती जास्त आहे. तो विचार करू शकतो. परमेश्वराने माणसाचा मेंदू विकसित केला आणि त्याला स्वकर्मातून विकासाचा मार्ग दाखविला. क्रियमाण अशी कर्मे तो करू शकतो. मनुष्याने जर जीवनचक्रात फिरताना स्वतःची प्रगती साधली, ज्ञान मिळवले तर त्याला मरण न टाळता येण्याजोगे आहे, हे समजते. जीवनचक्राचा शेवट असाच असतो हे तो गृहीत धरतो. मृत्यु जरी अटळ असला तरी कीर्तिरूपाने माणूस समाजाच्या लक्षात राहू शकतो. असे झाल्यास मृत्युचे भय कशास वाटायला हवे.

मृत्युसंबंधीचा विचार करूनच करूणाष्टकात समर्थ परमेश्वराला आळवतात,

**नको द्रव्यदारा नको येरझारा।**
**नको मानसी ज्ञानगर्वे फुगारा।।**
**सगूणीं मज लाविं रे भक्तीपंथा।**
**रघुनायका मागणें हेचि आतां।।**

समर्थांसारखा एक श्रीरामाचा सच्चा भक्त, एक तत्त्ववेत्ता रामाला अशी विनंती करतो, तर आपण कोण पामर. आपल्याला किमान असे विचार मनात येण्यासाठीही किती प्रयत्न करावे लागतील याची गणतीच नाही. समर्थांचे हे वचन बरेच काही सांगते,

**पापपुण्य समता घडे। तरीच नरदेह जोडे।**
**याचें सार्थक करावें। आपणांसी उद्धरावें।।**

''मृत्युनंतर जीवाचे काय होते ?'' असा प्रश्न नचिकेताने यमराजाला विचारला होता. तेव्हा यमराजाने थोडक्यात प्रश्नाचे उत्तर दिले. ते असे की श्रेयस (मोक्ष) आणि प्रेयस(भोग) हे दोघे मनुष्याला आपापल्या जाळ्यात अडकविण्याचा प्रयत्न करत असतात. त्यातील जो श्रेयस जवळ करतो, त्याचे कल्याण होते व जो प्रेयस जवळ करतो, त्याचे जीवन अर्थहीन होते. श्रेयस्कर हेच हितकारक असते. तर प्रियकर हे रूचीकर असते. त्यामुळे मनाला आल्हाददायक अशी संवेदना होत असते. याउलट विद्या, ज्ञान संपादन करणे व परमार्थ मार्ग हे श्रेय देणारे तर कामरूपी अविद्येचा मार्ग हा प्रेयस देणारा असतो. मन,बुद्धी आणि मेंदू या अनित्य अवयवांमुळे हे ज्ञान-विद्या संपादन करणे शक्य होत असते.''यासाठीच आत्म्याची उपासना कर'' असा सल्ला यमराजाने नचिकेताला दिला होता.

आपल्या आयुष्यात आपण जे जे भोग भोगत असतो ते एकीकडे आपल्या इंद्रियांचे तेज कमी कमी करत असतात. आपण पुष्कळ वेळ टी.व्ही.पाहीला वा खूप वेळ वाचत बसलो तर आपले डोळे दुखू लागतात. हळूहळू दृष्टी क्षीण होते. सारखे मसालेदार वा चमचमीत पदार्थ खात गेले तर पोटात पित्त वाढते, मळमळ होऊ लागते व अन्न नकोसे होते. तरी देखील आपण जागे होत नाही. समर्थ रामदास आपल्या कानी कपाळी सांगत असतात,

**घटिकां गेली पळें गेली, तास वाजे झणाणा।**
**आयुष्याचा नाश होतो, राम कां रे म्हणाना।।**

आपण आयुष्यभर धडपड करून अनेक गोष्टी मिळवतो. त्या साठवून ठेवतो. धनसंचय करतो, वित्तसंचय, धान्यसंचय करतो,अनेक मित्रमंडळी जमवितो. पण यातील काहीच कायमची सोबत करत नाही. या सर्व भौतिक, इंद्रियांना तात्पुरते सुख देणाऱ्या वस्तू, हे भोग क्षणभंगूर आहेत. हे समजणे म्हणजेच विवेक होय. परमार्थ करताना हा विवेक ठेवणे गरजेचे असते. परमार्थ म्हणजेच दुसऱ्यांच्या, समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे होय. प्रपंचात परमार्थ साधायचा असेल तर,''प्रपंची ते भाग्य। परमार्थी वैराग्य।। आणि 'प्रपंच करावा नेटका।'' या दोन उक्तींची सांगड योग्य रितीने घालावी लागते. समर्थ मनाच्या श्लोकात सांगतात,''देहेरक्षणाकारणें यत्न केला। परी शेवटी काळ घेऊनी गेला।।''

आपल्या आयुष्याचे एखाद्या वेळी सिंहावलोकन करावे. त्यावेळी असे दिसते की जीवनभर आपल्या देहाचे अनेक लाड केले, चोचले पुरविले तरी मृत्यु कधी उभा ठाकेल आणि त्या देहाला घेऊन जाईल हे आपले आपल्यालाच कळत नाही. जसे कर्म असेल त्याप्रमाणे मृत्यु येतो. जाताना व्यक्ती एकटीच जाते, मरते. हा साठा मात्र मागेच राहतो. म्हणूनच पातंजलीने 'अपरिग्रह' करावा असे सांगितले आहे. भोगसाधनांचा संग्रह करणे म्हणजे परिग्रह होय. शरीर व मन यांचे धारण, रक्षण व पोषण करण्यासाठी जेवढ्या वस्तूंची गरज असते, त्यापेक्षा जास्त वस्तू जमा करणे व त्यांचा वापर करणे याला अपरिग्रह असे म्हणतात. जरूरीपुरतेच कमवावे, गरज भागण्याइतके खावे, प्यावे. आपला वेळ ध्यान-तपात घालवावा, ईश्वराचे नाम घ्यावे, जप करावा आणि आत्ममग्न व्हावे. आपल्या शरीराचा आपण त्याग करणार आहोत. म्हणून त्याचा मोह ठेवणे इष्ट नाही असे संत, महंत आपल्याला नेहमीच सांगत असतात. त्यांनी आत्मज्ञान संपादन केले आणि ते स्वस्व रूपाशी एकरूप झाले. म्हणूनच आज युगानुयुगे समाजाच्या ध्यानी राहिले आणि अमर झाले. गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण असेही सांगतात, **अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते।**

म्हणजेच सर्व जगाच्या उत्पत्तीचे कारणही परमेश्वरच आहे. त्याच्यामुळेच जगातील सर्व कर्मे चालू असतात, चालू राहतात. परमेश्वर हे जगाचे उत्पत्तीकारण आहे आणि जगाचा नाशही तोच करतो. कुंभार ज्याप्रमाणे मडक्याच्या जन्मास निमित्तकारण ठरतो वा माती हे जसे मडके तयार करण्यास उपादानकारण ठरते, तसाच

परमेश्वरही जगाच्या निर्मितीस कारणीभूत ठरतो. असे जर असेल तर त्या परमेश्वराला, त्याच्या कर्तृत्वाला जाणण्याचा प्रयत्न आपण का करत नाही ! संत ज्ञानेश्वर म्हणतात, त्याप्रमाणे,

**जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत ।।**

असे आपण का मानत नाही ? याचे कारण म्हणजे आपला अहंकार! देवास न मानणे, आपली नास्तिक वृत्ती.

श्रीकृष्णाने सांगितलेले आहे की जीवनाचे गणित हे परमार्थावर अवलंबून असावे. जो मृत्युसमयी परमात्म्याची आठवण ठेवतो, त्याचे नाव घेत राहतो, ज्याचा स्वभावच ईश्वररूपी झालेला असतो, तो या जन्ममृत्युच्या फेऱ्यातून सुटतो. आपण आयुष्यभर पापे केलेली असतात. भौतिक कर्मे केलेली असतात, त्याचेच स्मरण आपल्याला मरण जवळ आल्यावर होत राहते. पण आपण जी पुण्ये केली त्यांचा आठव करावा व देवाचे नाव घ्यावे. तर आपण या चक्राच्या बाहेर पडू शकतो. ही युक्ती परमेश्वरानेच आपल्याला सांगून ठेवली आहे. परंतु आपण असे आहोत की स्वतःला बुध्दिवान समजतो आणि आपल्या कर्तृत्वावर अभिमान बाळगतो. त्यामुळे मृत्युसमयी आपल्याला स्वतःची फुशारकी वाटते आणि या भोगांमुळेच आपण पुन्हा पुनर्जन्माच्या गळ्यात पडतो. देहत्याग करताना मनात जे जे विचार असतात, जो भाव असतो, त्या भावालाच मनुष्य प्राप्त होतो, असे भगवंताने सांगून ठेवले आहे. खरे म्हटले तर माणसाच्या कर्तृत्वाच्या अहंकारावर मृत्यु हाच उत्तम उतारा आहे. खरे पाहिले असता, जन्म हे दुःखालय आहे. जीवन जगत असताना मनुष्य त्रिविध तापात होरपळून निघत असतो. भौतिक सुखे त्याला क्षणिक आनंद देत असतात.

यावरूनच तुलसीदासांची एक कथा आठवते. तुलसीदास रामभक्ती करण्यापूर्वीची ही गोष्ट आहे. ते एकदा बाहेरगावी गेले होते. तेथे त्यांना आपल्या पत्नीची रत्नावलीची खूपच आठवण येऊ लागली. म्हणून त्यांनी घरी जायचे ठरविले. परंतु त्या दिवशी खूपच सोसाट्याचा वारा सुटलेला होता. त्यांचा मार्गात असलेल्या नदीला पूर आला होता. नदीचे ते आक्राळविक्राळ रूप पाहून ते दुसरा मार्ग शोधू लागले. परंतु अंधार झाला होता. त्यांना पुढचे अंधुकसे दिसत होते. त्यातच त्यांना नदीच्या पाण्यावर एक ओंडका तरंगताना दिसला. त्यांनी चटकन त्या ओंडक्याचा आधार घेतला आणि ते पोहत नदीच्या पैलतीराला गेले. घरापर्यंत ते पावसात भिजत आले. परंतु पत्नी माडीवर झोपलेली होती. जिन्याचे दार बंद, तर मग वरती जावे कसे ? त्यांना प्रश्न पडला. तोच त्यांना समोर एक दोरखंड लटकताना दिसला. त्यांना वाटले, पत्नीनेच तो आपल्यासाठी बांधलेला असावा. दोराला धरून ते वर आले आणि पत्नीला कडकडून भेटले. रत्नावलीला आश्चर्य वाटले. तिने पुसले,''तुम्ही एवढ्या वादळ वाऱ्यात येथवर आलात कसे ?'' ते म्हणाले,''नदीत एक ओंडका दिसला. चल मी तुला दाखवितो, तुला खोटं वाटत असेल तर..'' दोघं नदीवर आले. बघतो तो काय तो लाकडाचा ओंडका नव्हता. तर नदीमध्ये एक प्रेत फुगून पाण्यावर तरंगत होतं. मग ते घरी आले नी दोरी कुठली ते रत्नावलीला दाखवू लागले. ते पाहून तर तिला आश्चर्य भिती वाटली. कारण ती दोरी नव्हती तर एका अजस्त्र नागाने कठड्याला गुंडाळून घेऊन तो खाली लोंबत होता. रत्नावली ते सार बघून म्हणाली, ''माझ्यासारख्या हाडामासांच्या शरीरावर प्रेम केल्याने तुम्ही एवढे मोठे साहस केले. त्यापेक्षा श्रीरामावर याच्या अर्धी जरी भक्ती केली असतीत तर किती बरे झाले असते !''

तेव्हापासूनच तुलसीदास रामाच्या प्रेमात पडले आणि त्यांनी कालांतराने ''रामचरितमानस'' हा भक्तीपूर्ण ग्रंथ लिहिला आणि समाजाला एक योग्य दिशा दाखविली. भौतिक आनंद हा किती क्षणिक असतो, हे त्यांना पटले म्हणूनच त्यांचे मन बदलले. हा वरवरचा आनंद घेण्यासाठी मनुष्य अनेक पापे करत असतो. म्हणूनच समर्थ म्हणतात,

**मृत्युकाळ काठी निकी। बैसे बळियाचे मस्तकी।**
**महाराजे बळिये लोकी। राहो न सकती ।।**

अंतकाळ ही एक जबरदस्त काठी आहे. ती लहान-

थोर या सगळ्यांच्याच पाठी बसते.ती अशी बसते की सरळ बरोबर घेऊनच जाते. निर्मित वस्तुंचा संपूर्ण नाश करणे, हा मृत्युचा सहज खेळ आहे. सर्व दृश्य, अनित्य व जन्मलेल्या गोष्टींना, जीवांना मृत्यु अटळ आहे. तो सर्वभक्षक व सर्वनाशक आहे. प्रत्येक जीवाचे शरीर नष्ट होणारे आहे, म्हणूनच मृत माणसाचे शरीर काही वेळातच कुजू लागते, सडू लागते.

आनंद घेण्यासाठी अतिशय सहजपणे देहाच्या माध्यमात जीव प्रकट होतो. मानवी जीवन एखाद्या प्रवाहाप्रमाणे सतत पुढे जात असते. मृत्युरूपी सागराला हा प्रवाह जाऊन मिळतो. ज्या पंचमहाभूतांपासून, द्रव्यांपासून देह निर्माण होतो, ती द्रव्ये नित्य बदलत असतात, कणाकणाने झीजत असतात. अशी झीज होत असल्याने आनंद उपभोगण्यासाठी उपयोगी वा लायक असा देह उरत नाही. जेव्हा असे होते तेव्हा जीव सहजपणे देह सोडून जातो. या जीवासाठी जन्मकाल वा प्रकटीकरण आणि अंतःकाल महत्त्वाचे ठरतात. जन्माच्या वेळी जीव अव्यक्ततेकडून व्यक्ततेकडे येत असतो तर मृत्युसमयी तो व्यक्त झालेला जीव अव्यक्त होत असतो. यासाठीच तर मृत्यु हा व्यक्त-अव्यक्ततेमधला मध्यंतर ठरतो.

**न बोले मना राघवेंवीण कांही**
**जनीं वाउगें बोलतां सुख नाही।**
**घडीने घडी काळ आयुष्य नेतो।**
**देहांती तुला कोण सोडूं पहातो॥** म. श्लोक

असे समर्थ मनाच्या श्लोकात म्हणतात, ते आपल्याला पटू लागते. जीवन हे जर क्षणभंगुर आहे, तर तेवढ्या अल्पकाळात आपण भक्ती मार्गाने जावे, काही सत्कार्य करावे, परमेश्वराशी अनुसंधान ठेवावे, असे संत परोपरीने आपल्याला सांगतात.जन्म आणि मृत्यु हे आपल्या शरीराला असतात. आपल्या चैतन्याला नाही. या चक्रातून सुटण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे भक्तीमार्ग, परमार्थ, ध्यानधारणा आणि परमेश्वराशी अनुसंधान ठेवणे. हे आपल्या मनावर ठसविण्यासाठी गर्भावस्थेमध्ये गर्भाला कसे कोंडल्यासारखे होते, अतिशय उष्णतेत रहावे लागते, तो काळ गर्भासाठी किती कठीण आहे, याचे वर्णन संत करतात. मनाच्या श्लोकामध्ये समर्थ वर्णन करतात,

**निरोंधे पचे कोंडिले गर्भवासीं।**
**अधोमुख रे दुःख त्या बाळकासी॥**

गर्भाशयातून बाहेर येताना गर्भ खाली मान करून येत असतो. किती दुःखदायक आहे. त्यावेळची त्याची स्थिती! बाळाचा जन्म हा जरी कुटुंबाला सुखावह असला तरी गर्भाचा जन्म झाल्यावर जे जीवन पुढे जगायचे असते, ते टाळण्यासाठीच संत हे सारे गर्भावस्थेचे वर्णन करतात. तेव्हा हे चैतन्य जागते ठेवण्याचा प्रयत्न करावा. देहबुद्धी विसरून आपल्या चंचल मनाला आवर घालावा. त्यामुळेच उत्तम गती प्राप्त होते.

आपली संस्कृती पुनर्जन्मावर विश्वास ठेवते. मनुष्याचा आत्मा त्याच्या कर्मानुसार निरनिराळ्या योनीत जन्म घेतो, अशी आपली श्रद्धा आहे. काही वेळा आपला अहंकार त्यावर आपल्याला विचार करू देत नाही. आपल्यावर मृत्युची हुकूमत चालते, हे आपण मान्य करत नाही. परंतु हे एक वैश्विक सत्य आहे. आपली जर देवावर श्रद्धा असली तर अर्थातच आपण आपल्या हृदयातील आत्म्याचे अस्तित्व ओळखू शकतो. त्यावर विश्वास ठेवू शकतो आणि मग तो आत्मा एक शरीर सोडून दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो, असे म्हटले तर वावगे वाटत नाही. ही दैवाची गती आहे. ज्ञान संपादन करून आणि चांगले वागून सत्शील राहून आपल्या आत्म्याचा आपणच उद्धार करावा लागतो. आपणच आपल्या आत्म्याचे मित्र वा शत्रु असतो. हेच आपल्याला श्रीकृष्णाने गीतेमध्ये सांगितलेले आहे. तो म्हणतो,

**उद्धरेत् आत्मनात्मानं, आत्मानमवसादयेत्।**
**आत्मैव ह्यात्मनोबन्धुः, आत्मैव रिपुरात्मनाः॥**

हा आत्मा शरीर बदलत असल्याने कायम जीवंत असतो आणि मरते ते फक्त शरीर असते, वरवरचे ! यासाठीच मला वाटतं मृत्यु या दोन जन्मांमधले मध्यंतर असावे. या जन्मात केलेल्या पापपुण्याचे फळ पुढील जन्मात मिळते. म्हणूनच तर मृत्यु हा मध्यंतर ठरतो.

मध्यंतरापूर्वी आपण कसे कर्म केले त्याचा निकाल मध्यंतराच्या नंतरच्या काळात आपल्याला कळतो. आपल्या आयुष्यात कर्माचा जो कळस-क्लायमॅक्स आपण गाठलेला असतो, त्यानुसार पुढच्या जन्मात आपल्याला बक्षीस मिळते. आपल्या आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक घटनेच्या मागे कार्यकारणभाव असतो. कार्य या जन्मात होते पण कारण मात्र मागल्या जन्मात घडलेले असते. आपण जसे बी पेरलेले असते, तसेच पुनर्जन्मात उगवते.आदल्या जन्मात केलेल्या विचारांचे, कर्माचे संस्कार आत्म्यावर झालेले असतात. हे संस्कार आत्म्याबरोबरच पुढच्या जन्मात जातात. या संस्कारातूनच व्यक्तिमत्व घडत असते. ते संस्कार इतके खोलवर मुरलेले असतात, की ठरवूनही ते बदलता येणे कठीण जाते. विश्वाचे मूळ हे ऐक्यात आहेआणि आत्मा हा त्यातील एकमेव सत्य आहे. आत्मा आणि परमात्मा यात काही भेद नाही. हे जाणण्यासाठीच आपल्याला जो माणसाचा जन्म मिळालेला आहे, त्याचा पुरेपूर फायदा करून घ्यावा. जितकी पुण्यकर्मे करता येतील तेवढी करावीत. परोपकार, दया, करुणा आणि प्रेम यांनी अवघे आयुष्य सजवावे. आत्म्याच्या संसरणातून मुक्त होण्यासाठी, जन्म-मृत्युच्या फेऱ्यातून सुटण्यासाठी या मनुष्यजन्माचा उपयोग करून घ्यावा. कर्मयोग, ज्ञानयोग किंवा भक्तीयोगाच्या माध्यमातून मोक्ष मिळवावा. याचा परिणाम निश्चितरित्या मध्यंतराच्या नंतरच्या अंकावर होईल.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

## रघुवीर समर्थ मासिक सभासदांशी हितगुज

- ‘रघुवीर समर्थ मासिक’ प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टामार्फत पाठविले जाते.
- महिन्याच्या २५ तारखेपर्यंत मासिक न मिळाल्यास कृपया स्थानिक पोस्ट ऑफिसमध्ये चौकशी करावी.
- एखाद्या महिन्याचा अंक न मिळाल्यास २५ तारखेनंतर स्थानिक प्रतिनिधी अथवा सातारा कार्यालयाकडे संपर्क केल्यास आपणास दुसरी प्रत पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.
- **अंकासंबंधी समस्या निवारणासाठी संपर्क –**
  **श्री. रवि देशपांडे – ९४०५५४२४६१ (सातारा कार्यालय)**
- मासिकाची वर्गणी–
  **वार्षिक वर्गणी– रु. १५०/–, चार वर्षांसाठी – रु. ५००/–आठ वर्षांसाठी – रु. १०००/–**
- कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येते.
- मासिकाच्या कव्हर पाकिटावर आपल्या पत्त्याच्या खालील बाजूस वर्गणी संपण्याचा कालावधी दिलेला आहे. कृपया वर्गणीदारांनी तो पाहून एक महिना आधीच वर्गणी M.O. किंवा D.D. ने पाठवावी किंवा खालील बँक खात्यात आपण **चेकने** किंवा **ऑनलाइन** जमा करावी.

**श्रीरामदास स्वामी संस्थान, सज्जनगड IDBI Bank, Satara City Branch,**

**बचत खाते क्र. 45110010830237 IFSC - IBKL 0000451**

- वर्गणी पाठविल्याची माहिती एका स्वतंत्र पोस्टकार्डवर किंवा ईमेल द्वारे किंवा एस.एम.एस. करून आपले संपूर्ण नाव व पत्ता दूरध्वनी क्रमांकासहित कळवावी. ‘‘**रघुवीर समर्थ**’’ साठी असा उल्लेख करावा.

**मासिकाची वर्गणी पाठविण्याचा पत्ता**

**श्रीरामदास स्वामी संस्थान, सातारा कार्यालय**

**‘चंद्रहास’ प्लॉट नं. ३६ ब, सर्व्हे नं. ४६७/७ अ, उत्तेकरनगर, सदरबझार, सातारा ४१५००१.**

ई-मेल : raghuvirsmasik@gmail.com

# समकालीन संतांचे पसायदान

श्री. विश्वनाथ प्रभुणे, ठाणे मो. ९८२०४२४६६५

शालिवाहनाच्या सोळाव्या शतकात या भारतभूमीत भगवंताचे पुन्हा अवतरण झाले ते असे श्री समर्थ रामदास, संत तुकाराम आणि शिवाजी महाराज.

### संत तुकाराम महाराज

''तुकाराम महाराज म्हणजे भागवत धर्माचा कळस होण्याचे महद्भाग्य लाभलेले महान संत होय. यांचा जन्म माघ वद्य पंचमी शके १५३० साली देहुगावांत (पुणे जिल्हा) झाला व त्याचप्रमाणे त्यांनी फाल्गुन वद्य द्वितीया शके १५७२ रोजी सदेह वैकुंठ गमन केले.

संत तुकारामांचे चरित्राचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की संसार तापाने तप्त झाल्यावर, तुकोबास दृढतर वैराग्य प्राप्त झाले. प्रापंचिक आपत्तीमुळे न डगमगता, त्यांनी ह्या सर्व संकटांचा उपयोग आत्मकार्याकडे करून घेतला. अनुताप हा परमार्थाची पहिली पायरी आहे असे त्यांना जाणवले.

तुकोबांचे कवित्व म्हणजे अस्सल मराठमोळी भाषा, यांचा अभंग कानावर न पडलेला व न वाचलेला मनुष्य सापडणे केवळ अशक्य आहे. ज्ञानेश्वरांची जशी ओवी तशी यांची अभंगवाणी म्हणजे यांची मानसकन्याच. यांच्या अमृतवाणीला कधीही भंग नाही.

**तुका म्हणे झरा। आहे मुळीचाचि खरा।।**

तुकोबांच्या सर्व अभंगाचे अवलोकन केले असता यांनी मागितलेले पसायदान असे असावे असे वाटते.

**हे चि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा।**
**गुण गाईन आवडी। हे चि माझी सर्व जोडी।।**
**न लगे मुक्ति आणि संपदा। संत संग देई सदा।**
**तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी।।**

अभंग गाथा -२३०६

या अभंगाद्वारे तकाराम महाराज परमेश्वराला

### संत तुकाराम आणि समर्थ रामदास

आपण जर भारताच्या हजारो वर्षाच्या इतिहासाकडे पाहिले तर असे दिसून येते की या मातृभूमीत सेतू हिमाचल अनंत थोर, थोर संत महात्मे होऊन गेले आहेत.म्हणूनच आपली भारतीय संस्कृती आणि वैदिक धर्माचे अंग म्हणजेच या भारत भूमीतील थोर संत परंपरा होय.

तर पाहिलं तर प्राचीन काळापासून या पवित्र भारतभूमीवर महाभयंकर आणि क्रूर व अमानूष आक्रमणे होऊनही भारतीय संस्कृती तरली आहे. जगली आहे. या सर्वांचे श्रेय भारतीय संतांना आहे.

भगवान श्रीकृष्णाने गीतेत अर्जुनाला सांगितलेल्या गुह्याप्रमाणे ''जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते आणि अधर्माला जोर चढतो, अन्याय, अनिती, अत्याचार, बलात्कार, दुष्टपणा, बेबंदशाही माजून साधुंचा व सज्जनांचा छळ होतो आणि दुष्ट लोकांचे वर्चस्व वाढते, तेव्हा तेव्हा आपण तेजस्वी आणि पराक्रमी पुरुषाच्या रूपाने अवतीर्ण होऊन राष्ट्रधर्माची बिघडलेली घडी पुन्हा बसवितो.''

सोळावा शतकात आपली देशस्थिती कशी होती?

**म्लेंच्छ दुर्जन उदंड। बहुता दिसांचे माजले बंड।**
**या कारणे अखंड। सावधान असावे।।**
**बोलतां कळीचे महिमान। धर्म जाला कंपायमान।**
**जे युगी राजा यवन। तेथे अन्य वार्ता कायसी।।**
**राजा देवद्रोही जाला।देवस्थळांचा उच्छेद केला।**
**तीर्थमहिमा सकळ मोडिला। ठाईठाईंचा।।**

स्त्रिया व मुले यांचा अपहार आणि त्यांची विटंबना, देवालयांचा विध्वंस आणि मूर्तींचा भंग व त्यांची विटंबना, लूट, जाळपोळ, कत्तल, धर्मांतर आणि शेवटी क्रौर्याची परिसीमा.

म्हणतात- हे देवा पांडुरंगा, विठ्ठला तुझा विसर मला कधीही पडू देऊ नकोस. हाच प्रसाद मला द्यावास. सदोदीत तुझे गुणच आवडीने गाईन, खर तर हीच माझी कमाई आहे. मिळकत आहे. सर्वजण मोक्ष मागतात, मला तर मोक्षही नको आणि धनसंपत्तीही नको, खरं तर मला नेहमी संतांचा सहवासच हवा.

पुढे जाऊन तुकोबा म्हणतात, देवा, मला संतसहवासाची देणगी द्या आणि खुशाल गर्भवासात घाला. त्यात मला आनंदच आहे. तुझा विसर होऊ नये आणि संत सहवास मिळावा म्हणून यासाठी वैकुंठात न राहता पुनःपुनः या भूतलावर जन्म घेईन.

**श्री समर्थ रामदास स्वामी**

समर्थ कसे होते- प्रभु श्रीरामचंद्राचे अनन्य भक्त, मारूतीरायाचे उपासक, धर्मकारण आणि राजकारण यांची उत्तम प्रकारे सांगड घालणारे महान द्रष्टे. पुनश्च रामराज्य यावे म्हणून ध्यास घेणारे राष्ट्रवादी प्रणेते व महाराष्ट्रातील क्रियाशील संत. यवनांच्या राज्यात संपूर्ण भारतभर भ्रमण करून अकरा मठ स्थापन करणारे, गावागावात मारूतीची स्थापना करणारे, रामदासी संप्रदायाचे प्रवर्तक.

योगायोग म्हणा अगर परमेश्वरी योजना म्हणा हे मात्र सत्य आहे की समर्थ रामदास आणि संत तुकाराम यांच्या काळात शिवाजीराजे अवतरले आणि यवनांच्या राज्यात भारतभूमीत नवा इतिहास घडून आला. देशाच्या राजकारणाला नवीन दिशा मिळाली. मरगळलेला समाज जागृत झाला. समर्थांचा दासबोध आत्माराम आणि मनोबोध याद्धारे सामान्य जनतेमध्ये भक्तिबरोबरच, कर्म करण्याची स्फूर्ती आली असेच म्हणावे लागेल. समर्थांनी प्रभुरामचंद्रांजवळ मागणे केले, तेच त्यांचे पसायदान होय.

**कल्याण करी देवराया। जनहित विवरी।**
**तळमळ होत चि आहे। हे जन हाती धरी।**
**अपराधी जन चुकतची गेले। तुझा तूचि सावरी।**
**कठीण त्यावरी कठीण जाले। आता न दिसे उरी।**
**कोठे जावे काय करावे। आरंभिली बोहरी।**
**दास म्हणे आम्ही केले पावलो। दयेसी नाही सरी।**

**कल्याण करी देवराया। जनहित विवरी।।**

संत ज्ञानेश्वरांचे पसायदान हे जनकल्याणासाठी होते तसेच समर्थांचे पसायदान हेही जनकल्याणासाठीच होते. कारण समर्थांनी समाजाचे कल्याण व्हावे यासाठी सारे आयुष्य वेचले. त्यांची कल्याणकरी देवराया ही प्रार्थना म्हणजे प्रभु रामचंद्राचे चरणी मागितलेले प्रसाददान- पसायदान होय.

समर्थ अतिशय तळमळीने रामरायांना विनवणी करतात. हे रामराया, हे देवराया तू आता या जनाचेहित कर. त्यांच्या वरील कृपेच्या छायेच्या विस्तार कर. तुझी कृपा सर्वांवर असू दे. अवघ्या जनांना हाताशी धरून तू सन्मार्ग दाखव. जनाचे अनेक अपराध आहेत त्यातून त्यांना सावर आणि संकटांना सामोरे जाण्याची शक्ती दे, उत्साह दे, सन्मान दे. साऱ्या भक्तांचे जीवन जगणे या काळात फार कठीण झाले आहे. सर्वत्र अत्याचाऱ्यांची परिसीमा झाल्यामुळे आणखी काही होण्याचे बाकी नाही. आश्रयाला, विश्रांतीला कोठे जागा नाही. झालेला अन्याय दूर व्हावा हाच माझ्या मनातील हेतू. हे रामराया तू जाणतोस आम्हास कोठे जावे, काय करावे काहीच कळत नाही. सर्वत्र म्लेंच्छांनी उच्छाद मांडला आहे.

शेवटी समर्थ म्हणतात आम्ही केले पावलो। दयेसी नाही सरी।'' कारण छत्रपती शिवाजी महाराजांच्यामुळे हिंदवी स्वराज्य निर्माण झाले आणि समर्थांचे आनंदवनभूवनचे स्वप्न साकार झाले. त्यांना सात्विक आनंद मिळाला. ते म्हणतात हे सारे श्रीरामाचे प्रसादाने मिळाले. म्हणून आता भरून पावलो. देवा तुझ्या दयेला सीमा नाही. पसायदान म्हणजे कृपाप्रसाद. संताचे मागणे व्यक्तिगत नसते. ते सर्व जगाच्या कल्याणासाठी मागितलेले असते.

संत ज्ञानेश्वर , संत नामदेव, संत एकनाथ यांनी भगवंताकडे कृपाप्रसाद मागितला. त्याचप्रमाणे संत तुकाराम आणि समर्थ रामदास यांनीही मागितला होता. त्याचा थोडक्यात परामर्श घेण्याचा यत्न केला आहे.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

# अभंग योगवासिष्ठ (लेखांक ३ रा)

**श्री. वामन वा.कोल्हटकर** , फोन (०२०) २५४३८६६३, email - wavako@gamil.com
(विज्ञान मंदिर या फिजिक्स प्रयोगशाळेचे जनक) गणितमंदिर, कीर्तनशाळा, पुणे

या धड्याची सुरूवात शुकाख्यानाने होते. का? तर विश्वामित्रांना राम आणि लहानपणचे शुकमुनी यांच्यात अगदी साम्य दिसले.. अविद्या नेमकी काय, ती कुठेकुठे रहाते याचे ज्ञान दोघांनाही पक्के झालेले; त्या अविद्येत न गुरफटता तिला दूर ठेवणेही दोघांना पक्के जमले होते. पण नंतर जे काही निर्गुण, निरवयव उरते तेच निरूपाधिक सोलीव असे 'आत्मतत्त्व'. ते आपलेसे करणे इथे आपली बुद्धी स्थिर करायची आहे या बाबत राम आणि शुक या दोघांस 'सोनाराने कान टोचणे' तेवढेच बाकी होते.. म्हणजे ते इच्छितस्थळी पोहोचले होते पण ''तू पोहोचला आहेस तेच तर तुझे इच्छितस्थळ आहे हे कोणीतरी जाणतेल्याने ते अधिकार वाणीने सांगायला हवे होते. विश्वामित्र त्याला त्या हजारो श्रोत्यांनी गच्च भरलेल्या सभेत शुकांची गोष्ट सांगतात.

**बाल शुकांची स्थिती**

**वर्षाधारेविण चातक न तृप्त।**
**इतर ऋतूंत वृष्टि होता।।**
**तेवि ज्ञानबोधें अंतरी विश्वास।**
**न होता, चित्तास न मिळे शांति।।**
**तीव्र वैराग्याने पुशी तो पित्यासी।**
**भाव या चित्तासी फसवी केंवी।।**
**कोठुनी हा आला फसवी कोणासी।**
**कदा, केवी यासी निवारावे।।**
**ऐकुनी ते व्यास उत्तर त्या देती।**
**परी ते 'पूर्वीचि ज्ञात' म्हणे।।**
**तदा पुत्रा व्यास बोलती यथार्थ।**
**ज्ञान जनकास, मज न तेवि।।**
**वासुदेव म्हणे यास्तव सुतासी।**
**भेट जनकाची म्हणती घेई।।**

शुकाच्या प्रश्नाला व्यास उत्तर देऊ लागले की शुकांना वाटायचे की हे तर आपल्याला माहीत असलेलेच आहे. अजून काहीतरी उत्तर असणार! तेव्हा उदार वृत्तीच्या बुध्दिमान व्यासांच्या ध्यानी आले की इथे सोनाराकडूनच कान टोचून घेणे क्रमप्राप्त आहे. म्हणून ते विद्यार्थ्याचे कल्याण महत्त्वाचे असे समजून स्वतःकडे कमीपणा घेऊन शुकांना म्हणाले की,'तुझ्या प्रश्नांची उत्तरे माझ्यापेक्षा मिथिलाधिपजनक अधिक चांगली देईल. तेव्हा शुक (धनसंपत्तीशी अजिबात संबंध नसलेल्या अशा त्या) विद्येच्या प्राप्तीसाठी तंगडतोड करीत मिथिलेला गेले. राजाने त्यांची सरबराई म्हणजे रहाणे जेवणखाण इ.सोय लावून दिली खरी. पण तो स्वतः त्यांना भेटेना। ते ही त्याची भेट होईतो काही न खातापिता ताटकळत तसेच त्याची वाट पहात राहिले. राजाने स्त्रियांसह साऱ्याच भोगांची त्याचेसाठी सोय केली असूनही त्याने विदग्धवृत्तीने त्या साऱ्या सत्काराला दुरूनच नमस्कार केला. सात दिवसांनंतर जनक त्यांना भेटला आणि शुकांना म्हणाला की :

**म्हणे बालका तूं साधनसंपन्न।**
**जाहालासी पूर्ण कृतार्थही।।**
**आता इच्छिसी ते मागूनिया घेई।**
**प्रश्न तदा करी तेचि शुक।।**
**उत्तरही तेचि देता जनकाने।**
**शुक म्हणे पिता सांगे हेचि।।**
**''कल्पनेचा खेळ'', ''असार संसार''।**
**योग्य हे की ज्ञान हा शुकप्रश्न।।**
**वासुदेव म्हणे मुळातला प्रश्न।**
**ब्रह्म हेचि सत्य जगन्मिथ्या की।।**

राजा म्हणाला,' तुझा प्रश्न उत्तम आहे आणि तू

शोधलेले त्याचे उत्तर अगदी बरोबर आहे.'

**एकमेव आत्मा जगीं परिपूर्ण।**
**अन्य काहीच न जगामाजी।।**
**संकल्पेचि बद्ध, निस्संकल्पेमुक्त।**
**जीव, हे सुस्पष्ट तत्त्व जाण।।**

विश्वामित्र म्हणाले, रामा, हे पूर्वविदित वाक्यच पण जनकमुखातून ऐकताक्षणी शुकास अगदी हुश्श झाले. त्याची उलघाल शांत झाली. चित्तस्पंद नीरवला, नेत्र अर्धोन्मिलीत झाले. तो काही काळ समाधी निमग्न झाला. विश्वामित्र म्हणतात की नंतर ही असंप्रज्ञात समाधी दृढ करण्यासाठी शुकांनी हजारो वर्षे मेरूपर्वतावर अभ्यास केला.

**सिंधुमाजीबिंदू अन्ती तो विलीन।**
**पूर्ण परब्रह्मपदी स्थिर।।**

विश्वामित्रांनी, रामही असाच आत्मसिंधूच्या अगदी किनाऱ्यावर पोहोचलेला आहे. निखाऱ्यावरील राखच फुंकायची बाकी आहे. ते काम, इथे उपस्थित असलेल्या समस्त ज्ञानियांचे अग्रणी भगवान वसिष्ठ यांनी करावे असे मोजके आवाहन सर्वांसमक्ष वसिष्ठांना केले. ते रामकुळाचे आचार्यही आहेत अशी समर्पकताही त्यांनी निदर्शिली. पुढे ते म्हणतात :

**निषधपर्वतीं विरंचीने आम्हा।**
**वैर थांबविण्या कथिला तोचि।।**
**वसिष्ठ कुलगुरु त्या करोत सुबोध।**
**योग्य तोचि बोध या शिष्यासी।।**

सर्वांनीच ही विश्वामित्रइच्छा उचलून धरली.

आता इथे, पूर्वी सांगायची राहिलेली, एक महत्त्वाची गोष्ट नमूद करून पुढे जाऊ. चराचरस्वामी भगवान महाविष्णू हाच जर राम; तर तो अज्ञानी कसा म्हणावा ? वैराग्य प्रकरणाच्या पहिल्याच सर्गांत या प्रश्नाचे निराकरण केले आहे. ते असे-

एकदा श्रीविष्णु सत्यलोकांत आले असता विरंचीने त्यांची पूजा केली. साऱ्यांनी त्याचा उत्तम सन्मान केला पण तिथे असलेल्या एका सनत्कुमाराने त्याला वंदनही केले नाही. तेव्हा विष्णूने त्याला शाप दिला की तू शरजन्मा नावांने जन्माला येशील. तेव्हा सनत्कुमारानेही त्यास उलट शाप दिला की तू किंचित काल का होईना, अज्ञानी होशील. दरम्यान त्याला भृगु, वृंदा आणि नृसिंहावताराच्या काळातील देवदत्त नावाचा एक ब्राह्मण या तिघांच्या शापाने पत्नीवियोग दुःख सोसावे लागणार होते. रामावतारांत त्याने हे सारे हिशोब चुकते करायचे मनी घेतले होते... असो. आता मूळ विषयाकडे वळू.

विश्वामित्रांसह साऱ्यांचा मान राखायचे श्री वसिष्ठांनी ठरविले आणि ते रामास उपदेश करण्यास सरसावले. सर्व शास्त्रे, विद्या, कला, मूर्तिमंत तप आणि त्रैलोक्याला दिपवणारे महाप्रज्ञेचे साक्षात लेणेच आपल्या सकल तेजानिशी जणू तिथे भगवान वसिष्ठरूपाने प्रगट झाले होते.

पूर्ण आत्मतेज असलेल्या आपल्या प्रभावशाली अशा धीरगंभीर वाणीने साऱ्या सभेचे भान ठेवून रामास ते उपदेशू लागले. ते म्हणाले की गुरू ब्रह्मदेवांनी कथिलेले ज्ञान तुला आता सांगतो.

तेव्हा रामाने पहिलाच प्रश्न केला की भगवान शुक हे विदेहमुक्त झाले पण व्यास तसे झाले नाहीत हे कसे ?... हा प्रश्न विचारण्याचे कारण असे की रामाच्या समोरच, या प्रश्नोत्तरीत जे लोक बसले होते त्यात व्यास, भृगु, अंगिरा पुलस्त्य, च्यवन, उद्दालक, उशीर, शरलोमा, भरद्धाज, वाल्मिकी, नारद, क्रतु, ऋचीक, शर्याति, मरीचि, दूर्वासा इ. थोर थोर ऋषी गर्दी करून बसलेले होते. त्यांत शुक मात्र नव्हते.

पुष्कळ लोकांचा समज असतो की विदेहमुक्त हा सदेहमुक्तापेक्षा सरस असतो. तसाच रामाचा समज.

पण वसिष्ठांनी तत्क्षणी त्याचा भ्रमनिरास केला तो अशा भव्योदात्त व्यापक पातळीवर की वसिष्ठांची, त्रिलोकांना गवसणी घालणारी प्रतिभा, कोणत्या व्यापक आकाशातून अभ्यासकाला हिंडवणार आहे त्याचा पहिल्या वाक्यातच अंदाज यावा. ते म्हणतात राम, विश्वामध्ये अनंत ब्रह्मांडे झराझरा जन्म घेत असतात आणि धडाधडा

नष्ट होत असतात. हे तर सारखेच चालू आहे. आत्मा हा सर्वाला व्यापून आहे पण ''मी'' नावाचा, खरेतर नसलेलाच कोणीतरी, जीव होऊन हे जग कल्पनेनेच जुळवतो.

विश्वे आजपर्यंत कितीवेळा निर्मिली गेली त्याला अंत नाही अर्थात ती नष्टही किती वेळा झाली त्यालाही अंत नाही. तेव्हा राम म्हणतो :

**राम म्हणे भूत भविष्य अगण्य।**
**परी वर्तमान मर्यादित।।**

तेव्हा वसिष्ठ काय म्हणतात पहा –

**देव मानवादि योनींमाजी जीव।**
**हिंडती तोचि ठाव त्रैलोक्याचा।।**
**वासनादेह तो त्रैलोक्यीं हिंडतो।**
**आत्मा स्थिरचि तो एक्या ठायी।।**
**तात्पर्य केवळ कल्पना हे जग।**
**विमल, असंग, आत्मरूप।।**
**संकल्प, कल्पना अथवा इंद्रजाल।**
**तैसेचि सकल विश्व मिथ्या।।**
**मस्तक फिरता पृथ्वीचे भ्रमण।**
**वृक्षपलायन 'नाव'स्थासी।।**
**गंधर्वनगर अथवा स्वप्नसृष्टि।**
**तैसी संसाराची स्थिति जाणा।।**
**वासुदेव म्हणे अभ्यासाने घट्ट।**
**कल्पनाचि मिट्ट खरी वाटे।।**

उंच आभाळात कोसच्या कोस पसरलेला, एकसंध असा एक ढग असतो. एकदम काहीतरी असे घडते की तो खाली कोसळायला लागतो पण तेव्हा तो ढग दिसत नाही तर हजारो, लाखो, कोट्यावधी अशा जल बिंदूंत त्याचे पर्यवसान झालेले असते. तसेच, सारीकडे व्यापून दशांगुळे उरलेल्या परब्रह्माचा जीव रूपाने वर्षाव होतो. ते जीव ज्या स्थिर चल सृष्टीचे सभासदत्व स्वीकारत असतात ती चराचर सृष्टीही त्या पर ब्रह्माचे तामिस्र, अंधतामिस्र, तम, मोह, महामोहरूप अवतार असतात. त्यांतून सात स्वर्ग, सात पाताळ अशी १४ भुवनांची सृष्टी तयार होते. ती भुवने देव, मनुष्य, पशुपक्षी, कीड, मुंगी व त्याहीपेक्षा सूक्ष्म अशा अनेक प्रकारच्या जीवयोनींची वास्तव्यस्थाने होतात. वासना दृढाभ्यासाने घट्ट झाली की ती जीवदशेत परिणत होते. वर उल्लेखिलेला परब्रह्मातला ढग म्हणजे ह्या वासना.

वसिष्ठ म्हणतात की हे जे सारे घडते असे म्हटले ते अगदी खरे तर काहीच घडलेले नसते. 'अगा जे झालेचि नाही' हेच खरे तर त्या सर्व सृष्टीचे वर्णन वास्तव आहे. सृष्टी आहेसे वाटणे हे इंद्रजाल म्हणजे जादू खरी आहे असे मानणे किंवा स्वप्नालाच खरे मानणे असे आहे. आपण गोलगोल फिरून बसलो की जगच फिरते असे वाटते किंवा नावेतून, आगगाडीतून बाहेर बघितले की कडेची झाडेच मागे पळताहेत असे वाटते तसे जग आहे असे आपण भ्रमामुळे समजतो.

तू जो मला व्यासांबाबत प्रश्न केलास त्याचे उत्तर आता ऐक. पाण्यावर जसे तरंग पुन्हा पुन्हा उमटतात तसे ब्रह्मावर हे जग पुन्हा पुन्हा भासते. नवे जग कधी पहिल्या जगासारखे तर कधी वेगळे !

**दुस्तर ही जाणे अज्ञालागी माया।**
**आत्मसागरी या लीला बहु।।**
**साधर्मवैधर्म्ये वारंवार तेंचि।**
**अन्य वा भासती जीव नाना।।**
**स्मरती मजसी व्यास ते बत्तीस।**
**काही हुबेहूब काही भिन्न।।**

आजपर्यंत ३२ द्वापर युगे या ब्रह्मची झाली आहेत. या कल्पांतला व्यासांचा हा १० वा अवतार आहे. पण रामा, एक पक्के लक्षात ठेव की,'सदेह आणि विदेह मुक्ती' एकीपेक्षा दुसरी सरस वा निरस असे काहीही नसते. मुक्ती ती मुक्ती. मेल्यावर कोणी मुक्त होत नाही. आणि मुक्त झाल्याबरोबर मरतो असेही नाही. ज्ञानरूप झाला की त्याला मुक्त म्हणायचे. तेव्हा त्याला देह असतो म्हणून तो सदेह मुक्त. मग केव्हातरी 'आता देहच नाही' असा तो होतो. की त्याला आपण विदेहमुक्त म्हणतो.

(अशाही गोष्टी घडतात की ब्रह्मदेवाच्या सृष्टीकार्यास

सहाय्य म्हणून कित्येक जीवात्मे स्वतः मुक्त असूनही स्वयंसेवक बनून लोक कल्याणार्थ कार्य करीत राहतात. मग ते ब्रह्मदेवाबरोबर विदेहमुक्त होतात. उदा. सप्तर्षीसारखे अनेक ऋषी, राजर्षी, देवर्षी..नवनारायण कलियुगात जनोध्दारासाठी नवनाथ बनून आले...) रामा हे व्यास ऋषिकुळांना ललामभूत असेच आहेत. तयांचे महत्त्व काय वर्णू ?

**लौकिककुळाचा वाढवूनि अंती।**
**विदेहमुक्तीसी पावतील ।।**
**अधिकार मोठा असे या व्यासांचा।**
**मोहबंध साचा न बाधे त्यां ।।**

मुक्त होऊ इच्छिणाऱ्याने अगोदर काय समजून घ्यावे?

या धड्याचा विषय असा आहे की, 'मुमुक्षूने, म्हणजे हे जग काय आहे, ''मी'' ही काय भानगड आहे, आणि या दोहोंचे अधिष्ठान जे परमतत्त्व ते काय आहे ते अगदी मनापासून समजून घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने, प्रथम मुख्यत्वे काय जाणून घेणे अपरिहार्य आहे त्याचे ज्ञान देणे. त्यासाठी जी पूर्वतयारी लागते तिची माहिती वसिष्ठ या धड्यात रामाला पद्धतशीरपणे सांगतात. ती अशी :

१) प्रयत्न हा नियती व प्रारब्ध म्हणजे दैव यापेक्षा फार महत्त्वाचा. २) शुभाशुभ वासना ३) सदाचार सच्छास्त्राभ्यास, सत्संग, सद्विवेक ह्या चौघांचे बळ ४) सुसंस्कृत बुद्धी ५) प्रमाता, प्रमेय, प्रमाण व प्रमाज्ञान यांची माहिती. ६) शौच, संतोष व वैराग्य या गुणांची आवश्यकता ७) या ग्रंथाची माहिती ८) प्रयत्न आणि दैव या दोन संकल्पना वसिष्ठ या ठिकाणी अगदी स्पष्ट करून सांगतात. प्राणी कर्मे तर सततच करीत असतो. त्यातील काही कर्मे सहज होत असतात. त्यातही काही नकळत होतात तर काही कळत होत असतात पण जी न ठरविता झालेली ती सहजकर्मे असतात. चालता चालता नकळत घाणीत पाय पडू शकतो तसेच गर्दीत सहज नकळत एखाद्या अपंगाला रस्ता ओलांडून दिला जातो. ही नकळतची कर्मे. कळत झालेले सहज कर्म म्हणजे तुम्ही समजा एखाद्या मोठ्या रांगेत तिकीट काढायला उभे आहात. इतक्यात तुमचा जवळचा मित्रही तिकिट काढायला आला तर नुसत्या खुणांनी त्याचेही तिकिट तुम्ही काढता.

आता काही कर्मे आपण ठरवून करतो. ती ही शुभ म्हणजे चांगली-पुण्यकारक किंवा-वाईट-पापकारक असतात. शुभ वासना मनात धरून योग्य मार्गाचे अनुसरण करून केलेले कर्म आज ना उद्या शुभ फळ देईल. अशुभ वासना मनात धरून अशुभ कर्म केले तर आज ना उद्या त्याचे अशुभ फळ मिळेल. एक मात्र लक्षात असू द्या की नुसती वासना शुभ असून भागत नाही तर त्या संदर्भातले कर्मही वाजवी मार्गाने केलेले हवे. होताहोईलतो सन्मार्गाचे हवे.

वेदांचा सिद्धांत असा आहे की केलेल्या कर्माचे फळ ज्याने ते कर्म केले त्यास आज ना उद्या, या जन्मी नाहीतर पुढल्या कुठल्यातरी जन्मी भोगावेच लागते. कृतप्रणाश हा कधी होत नाही. म्हणजे कर्म केले पण त्याचे फळ भोगावेच लागले नाही असे सृष्टीयंत्रणेत कधी होत नाही. त्याचप्रमाणे, कर्म न करताच फुकटचे भले वा बुरे, फळ मात्र भोगावे लागले असेही कधी होत नाही शास्त्रीय भाषेत असे म्हणायचे की अकृताभ्यागम हाही कधी होत नाही. आपण केलेले कर्म हाच आपल्याकडून कळत न कळत झालेला प्रयत्न. हा प्रयत्न जेव्हा मागच्या कुठल्यातरी जन्मातला असतो तेव्हा त्यास दैव किंवा प्रारब्ध असे म्हणायचे. थोडक्यात म्हणजे, आपण पूर्वी केलेले प्रयत्न तेच प्रारब्ध किंवा दैव.

पुष्कळांचा असा समज असतो की देव बसल्या बसल्या, आपल्याला सुख किंवा दुःख स्वतःच्या मर्जीने वाटत असतो तसे नाही. तुमचे पूर्वकर्मफल देव स्वतःच्या शक्तीने बदलू इच्छित नसतो. तुम्ही एखाद्या संकटातून सुटण्यासाठी कळवळून देवाची प्रार्थना करता तेव्हा शुभवासनेने एक विशेष प्रयत्न करीत असता. त्याचे पुण्य संकटमुक्तीस पुरेसे ठरले तर तुम्ही संकटमुक्त होता. अशा रीतीने, वसिष्ठ उलगडा करीत आवर्जून सांगतात की दैव महत्त्वाचे नाही तर प्रयत्नच केव्हाही महत्त्वाचा आहे. आपले

जिद्दीचे प्रयत्न दैवाला म्हणजे, आपणच पूर्वी केलेल्या चुकीच्या प्रयत्नांस उलथवू शकतात. आणि शुभ प्रयत्नांची मंगल फले आपणास नक्कीच भोगायला मिळू शकतात. मात्र प्रयत्न हा मनमान्या पद्धतीने न होता तो शास्त्रीय मार्गानेच व्हावयास हवा.

**शास्त्रीय प्रयत्ने सिद्धि ती निश्चित।**
**निश्चये अनर्थ अन्य मार्गे॥**

पुढे ते म्हणतात-

**लंघने अजीर्णदोष जैं निवारे।**
**प्राक्तन ते सरे तेवि यत्ने॥**

प्रयत्नच प्राक्तनावर कब्जा करण्याचे एकमेव शस्त्र आहे.

**शुभाशुभ कर्मे साठली पूर्वीची।**
**प्राक्तन बा तेंचि, तेचि दैव॥**
**प्रत्यक्ष प्रमाण दुर्लक्षोनि अनुमाना।**
**मानी तो स्वभुजासचि सर्प मानी॥**
**दैव दैव करी ऐशा आळशाला।**
**सोडोनिया लक्ष्मी जाई सुखे॥**

मुमुक्षूसाठी श्री वसिष्ठ विशेष काही सांगतात-

**यास्तव निश्चये करोनि प्रयत्न।**
**श्रवण-मनन संपादावे॥**
**वासनांकिता ज्या इच्छा ना मुक्तीची।**
**असो धिःकारचि तयालागी॥**
**वासुदेव म्हणे यास्तव प्रयत्ने।**
**विवेके शास्त्राते अवलंबावे॥**

## सच्छास्त्र सदाचार सत्संग व सद्विवेक

जी गोष्ट मिळवायची आहे ती काय आहे, कशी आहे हे प्रथम त्या गोष्टीतल्या जाणत्या अशा सज्जनाकडून समजून घ्यावे. प्रयत्नपूर्वक त्या गोष्टीसाठी लागणारी साधन सामग्री आवश्यक त्या क्रमाने गोळा करावी. तिच्या साहाय्याने काम होते असे समजू नये. कारण ती सामग्री वापरण्याचे कसब असणे हे आवश्यक असते. त्यासाठी सदाचारपूर्वक त्या गोष्टीच्या शास्त्राचा चांगल्या गुरूकडून अभ्यास करावा.

चांगला गुरू, चांगले स्नेहीसोबती असा सत्संग कळत नकळत पुष्कळ खुब्या अंगी बाणवीत असतो आणि सत्संगाने पाय घसरण्याची शक्यताही बरीच कमी होऊ शकते. आणि या सर्वांपेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सद्विवेक. तो तर जन्मभराचा साथी असतो. इष्ट गोष्ट मिळण्यासाठी तर तो लागतोच ती मिळाल्यावर ती कल्याणकारक ठरण्यासाठीही सद्विवेकाची फार आवश्यकता आहे.

तात्पर्य, मनुष्याने हातावर हात चोळून, दांत-ओठ खाऊन प्रयत्नांच्या बळावर दैवावर कुरघोड करावी आणि त्यासाठी उत्तम शास्त्राभ्यास, नेमस्त वागणे, चांगल्या लोकांची संगती आणि सद्विवेक यांची भक्कम शिदोरी जवळ बाळगावी. या बद्दलचा उपदेश वसिष्ठ करीत आहेत. तो पुढील अंकात चालू राहील. तूर्तास इथेच विराम घेतो.

**॥ जय जय रघुवीर समर्थ॥**



# यज्ञसंकल्पना-३

स. भ. शरयु दाते, रामदासी, मिरज, जि. सांगली

१) यज्ञाचे महत्त्व, २) मानवी जीवनामध्ये यज्ञाचे महत्त्वाचे स्थान आणि ३) यज्ञाचे विविध प्रकारचे स्वरूप या तीन मुद्यांचा विचार आपण मागील दोन लेखात केला. विविध शास्त्रीय ग्रंथ, वेद, भगवद्गीता व उपनिषदे इ. ग्रंथांच्या आधारे यज्ञाचे महत्त्व आणि मानवी जीवनाशी यज्ञ कसा निगडित आहे यासंबंधीचा विचार केला. आता भगवद्गीतेच्या ४ थ्या अध्यायात सांगितलेले यज्ञाचे स्वरूप पाहू.

गीतेच्या ४ थ्या अध्यायात जो यज्ञविचार आला आहे, तो साधारणपणे २४ ते ३२ या श्लोकात आणि त्यापूर्वी २३ व्या श्लोकात म्हटले आहे.

यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ।।४.२३ ।।

केवळ यज्ञासाठी कर्म करणाऱ्या माणसाची संपूर्ण कर्मे पूर्णपणे नाहीशी होतात. ज्ञानरूप अग्नीमध्ये साधकाची सर्व कर्मे दग्ध होतात. (ज्ञानाग्निदग्धकर्माणम्....) का ? त्याची सर्व कर्मे कामनारहित, संकल्परहित असतात. त्यामुळे त्याला ही कर्मे बंधनात पाडू शकत नाही. त्याला कर्मफलाची आसक्ती नाही. तो नित्यतृप्त असतो. त्याच्या अंतःकरणाचा संयम झालेला असतो आणि तो सर्व भोगलालसांचा त्याग करतो. तो देहाने केवळ कर्म करतो पण त्यात आसक्त नसतो.

यदृच्छा लाभसंतुष्टः द्वंद्वातीतः विमत्सरः। (४.१९) असा तो झालेला असतो. सिद्धी-असिद्धीमध्ये तो समभाव ठेवतो. यालाच 'कर्मात अकर्मता' म्हणतात.'शारीरं केवलं कर्म' त्याच्या शरीराकडून केवळ कर्मे घडत असतात. स्वाभाविकपणे. कारण शरीरनिर्वाहासाठी कर्मे करावीच लागतात. शरीरयात्रा तर चालली पाहिजे. अ.५ श्लोक ८ व ९ मध्ये सांगितल्याप्रमाणे (पश्यन् श्रृण्वन् स्पृशन्...) कर्मे होत असली तरी 'ती करणारा मी कुणी नाही' असे समजावे. 'कायेन मनसा बुद्ध्या, इन्द्रियैः' अशी कर्मे योगी पुरूष करीत असतात. कशी ? 'संगं त्यक्त्या' - विषयांचा संग सोडून व 'आत्मशुद्धये' -अंतःकरणाच्या शुद्धीसाठी. आत्मसंयमपूर्वक अशी कर्मे केल्याने 'नाप्नोति किल्बिष'- कर्माचे दोष कर्त्याला लागत नाही.

हा संयम- एका प्रकारे संयमयज्ञच आहे. भागवतात इंद्रियाद्वारा केल्या जाणाऱ्या कर्मातून सुटण्याचा सोपा उपाय सांगितला आहे. 'कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा... करोमि यद् यद् सकलं परस्मै। नारायणायेति समर्पयेत् तत्।। (भागवत, स्कंध ११)

चौथ्या अध्यायातील २४ वा श्लोक पहा

१) ब्रह्मार्पणं ब्रह्महवि ब्रह्माग्नौ ब्रह्मणाहुतम।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्म समाधिना ।।(४.२१४)

यज्ञात अर्पण करण्याची जी क्रिया ती ब्रह्मच आहे. हवनाची क्रियाही ब्रह्मच. अग्नीही ब्रह्मरूप आणि आहुतीही ब्रह्मरूप. या भावनेने केलेले कर्म ब्रह्मरूपच होते. सारांश ब्रह्मरूप अग्नीत ब्रह्माचेच हवन ! आणि ज्याचे सर्व कर्म ब्रह्मरूप होते, तो ब्रह्मच प्राप्त करतो.

२) दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते।
ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वती ।।४.२५)

दुसरे कोणी देवता विषयक यज्ञ करतात तर कोणी ब्रह्मरूप अग्नीत यज्ञद्वारा यज्ञाचेच यजन करतात.

३) श्रोत्रादीन् इंद्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति।
शब्दादीन् विषयान् अन्ये इंद्रियाग्निषु जुह्वती।। (४.२६)

कुणी श्रोत्रादि (काम वगैरे) संयमरूप अग्नीत हवन करतात. म्हणजेच इंद्रियांवर संयम ठेवतात. तर दुसरे कोणी शब्दादी विषयांचे इंद्रियरूप अग्नीत हवन करतात. समर्थ म्हणतात- 'मना रे जनी मौनमुद्रा धरावी' मौन- आत्मसंयमच. उदा. भागवतातील जडभरत- तो

आत्मज्ञानी असूनही मुका, बहिरा,जड असल्यासारखे दाखवी. आता या जन्मातून सुटायचेच आहे, म्हणून कर्म होऊच द्यायचे नाही.(बरे-वाईट कोणतेही) कारण ते बंधनाला कारण होते व 'पुनरपि जननम्' या चक्रात तो सापडतो. मात्र हे सर्व अवघड आहे.

४) द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे।
स्वाध्याय ज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः।। (४.२८)

कुणी द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ करणारे तर कुणी स्वाध्याययज्ञ करणारे यति असतात. अ) द्रव्ययज्ञ- द्रव्य-धनदौलत लोककल्याणाच्या कार्यासाठी अर्पण करतात. उदा. विहिरी, तलाव, धर्मशाळा, पाठशाळा, मंदिरे, घाट बांधणे इ.साठी ते द्रव्य त्या त्या संस्था वापरतात. ब) मुष्टिफंडासाठी द्रव्य देणे, धान्य, पुस्तके इ. देणे. तपोयज्ञ-तप करणारे लोक.शीतोष्णादी सहन करून, यम-नियम, उपवास इ. पाळून पवित्र होतात. आत्मशुद्धीसाठी तप महत्त्वाचे आहे. केन, तैत्तिरीय, मुंडक, प्रश्न इ. उपनिषदांमध्ये तपाचा विचार विस्ताराने केला आहे. क) योगयज्ञ- योगाचे अनुष्ठान करणारे योगी पुरुष यमादि अष्टांग योगाचे पालन करून आत्मोन्नति करून घेतात. ड) स्वाध्यायज्ञानयज्ञ- स्वाध्याय- आपल्या कल्याणासाठी आवश्यक असणाऱ्या विद्यांचे अध्ययन करून त्यावर चिंतन करणे व ज्ञानयज्ञ- आपल्याला ज्ञात असलेले ज्ञान दुसऱ्याला समजून देणे.५) अपरे नियताहायः प्राणान् प्राणेषु जुह्वति।। नियमित आहार घेऊन प्राण व अपानाची गती थांबवून प्राणांचे प्राणातच हवन करतात. अशा यज्ञाद्वारे त्यांचे पाप दूर होते. आकंठ भोजन केल्यास प्राणायाम होणार नाही म्हणून 'युक्ताहारविहार- गीतेने सांगितला. पूरक, रेचक, कुंभक याद्वारा करावयाचा हा यज्ञ आहे. प्राणायाम हा शास्त्रीय विषय आहे. अधिकारी गुरूकडूनच तो शिकावा व आत्मसात करावा. तरच आयुरारोग्य प्राप्त होऊन योगसिद्धी होते. साधक 'समाधी' पर्यंतही जाऊ शकतो.

अशा प्रकारे इतरही अनेक यज्ञ वेदांनी सांगितलेले आहेत. आपण अत्यंत संक्षेपात काहींचा उल्लेख केला. भगवान शेवटी अर्जुनाला सांगतात-

६) श्रेयान्द्रव्यमयान् यज्ञात् ज्ञानयज्ञः परंतप।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।।(४.३३)

द्रव्यमय यज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ अत्यंत श्रेष्ठ आहे. सर्व कर्मे शेवटी ज्ञानातच समाप्त होतात. ज्ञानातच सर्व कर्माचे पर्यवसान होते. धन, द्रव्य, गाई, भूमी इ.चे दान केल्याने जे लाभ होतात, त्याहून कितीतरी अधिक पटीने ज्ञानयज्ञाचे लाभ आहेत. आचार्य, गुरु, अध्यापक यांचे महत्त्व यामुळेच आहे. हेच पुढे उत्तम नागरिक, राष्ट्रनिर्माते होऊ शकतात. उदा.पहा. नचिकेताने यमराजाकडे आत्मज्ञानाची मागणी केली. यमराज राज्य, ऐश्वर्य सर्व देण्यास तयार होता. पण ते सर्व तुच्छ मानून त्याने आत्मज्ञानासाठी प्रार्थना केली. कारण धनादी सर्व अनित्य आहे. स्वायंभुव मनू, जनकराजा, प्रल्हाद, ध्रुव, ऋषभदेव सर्वांनी आत्मज्ञान प्राप्त करूनच मोक्षप्राप्ती करून घेतली.

आत्मज्ञानामुळे इंद्रिये शांत होतात. (तज्ज्ञानं प्रशमकरं इन्द्रियाणाम्।) ज्ञानामुळेच मोह नष्ट होऊन मोक्षप्राप्ती होते. ब्राह्मी स्थिती प्राप्त होते. (धन्यालोभ-शंकराचार्य) (एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ। अ.२ गीता)

परीक्षिताला 'तक्षक दंश करेल' असा शाप मिळाला. हे कळल्यावर त्याने सर्व विषयांचा, राज्याचा त्याग तत्क्षणी करून तो गंगातीरी 'उपोषण व्रत' आचरीत होता. शुकदेवांकडून त्याला आत्मज्ञानाची प्राप्ती झाली. त्यावेळी तो ब्रह्मस्वरूप झाला. आता तक्षक येऊन चावला न चावला याच्याशी त्याला कर्तव्यच नव्हते. झाडाच्या खोडासारखी त्याची अवस्था झाली होती. तो स्तब्ध, निश्चल झाला होता. पूर्णपणे देहेंद्रियांपासून मुक्त झाला होता. हाच ब्रह्मयज्ञ- आत्मयज्ञच!

यजनकर्ता यज्ञ करताना ब्रह्मरूप हवा. ब्रह्मज्ञानाची प्राप्ती झालेला जो साधक, त्याला शेवटी सर्व ब्रह्मस्वरूपच दिसायला लागते. जसे-यज्ञातील समिधा, अग्नी, घृत, आहुती, हवनीय पदार्थ, यजमान सर्वच ब्रह्मरुप वाटू लागते वाटले पाहिजे. कारण हे समर्पण आहे. समर्पणात 'मी म्हणून काही शिल्लक रहातच नाही.'

'सर्व ह्येतद् ब्रह्म' 'अयमात्मा ब्रह्म' (माण्डूक्य उप.) 'सर्वं खल्विदं ब्रह्म' (छां.उप.) सर्वच आत्मस्वरूप दिसू लागते. उदा. नामदेव कुत्र्यामागून तुपाची वाटी घेऊन जातात, किंवा नाथ गाढवाला गंगा पाजतात, यातील तात्पर्य हेच आहे. किंवा वारकरी एकमेकांच्या पाया पडतात. यातही 'तुझ्यात जे आत्मस्वरूप तेच माझ्यात आहे' हाच भाव आहे. 'तो हा विठ्ठल बरवा, तो हा माधव बरवा' तोच हा आणि हाच तो(सोऽहम्, हंसः) गुरू शिष्याला 'तत्' ते (ब्रह्म) त्वम्- तू, असि-आहेस असा उपदेश करतो. तो साधना करतो.त्याला हळूहळू 'अहं ब्रह्मास्मि' (मी ब्रह्म आहे) हा अनुभव येतो व शेवटी 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हे तो जाणतो. गुरूबोधाने, तपःस्वाध्यायाने त्याला ही दृष्टी येते. यज्ञामागील तात्पर्य हेच आहे. उदा. रामकृष्ण परमहंस कालीमातेची पूजा करीत. पण त्यांच्या ठिकाणी ब्रह्मभाव इतका परिपूर्ण होता की त्यांना स्वतः व कालीमाता दोन वाटतंच नसत. पूजा करता करता कधी कधी ते स्वतःवरच फुले वाहत. त्याचे त्यांना भानही नसे. रामकृष्ण आणि कालीमाता एकरूपच झाले होते.

इशोपनिषदात म्हटल्याप्रमाणे

यस्मिन् सर्वाणि भूतानि आत्मैवाभूद्विजानता।

तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः ।। ईश. मंत्र ७) 'मी-तू' हा भेद आहे तोवर शोकआहे. तो भेद गेला की सर्व एकच।

ब्रह्मज्ञानाच्या अंतिम स्थितीचे वर्णन उपनिषदांप्रमाणे वेदांनीही केले. उदा. यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्।। (ऋ१/१६४/५०) देवांनी प्रथम यज्ञाने यज्ञ केला. मग काय झाले ?

ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः।। (ऋ १०-९०-१६)

ज्या ठिकाणी पूर्वकालीन साधक पोचले होते त्या स्वर्गाला हा यज्ञ करणारे मोठे होऊन पोचले.

ज्ञानमय यज्ञाचे श्रेष्ठत्व असे विविध प्रकारे सांगितले आहे. आत्मज्ञानाची प्राप्ती झाली की, 'सर्व भूतानि आत्मनि एव अनुपश्यति।' आणि सर्वभूतेषु चात्मानं' अशी अवस्था होते. मग 'सर्वत्र समदर्शनः (गीता ६.२९) असा तो साधक होतो. हाच आत्मयज्ञ हाच ज्ञानयज्ञ. हाच ब्रह्मयज्ञ!

भगवान गीता ६.१० मध्ये म्हणतात- 'यो मां पश्यति सर्वत्र, सर्वं च मयि पश्यति' मला (भगवंताला) सर्वत्र पाहतो आणि माझ्यामध्ये(भगवंतामध्ये) सर्व जग पाहतो. तोच खरा ज्ञानी पुरूष होय.


एक उदा. छांदोग्य उपनिषदातील गुरू शिष्याला सांगतो 'पाणी आण.' त्यात 'मीठ घाल.' सकाळी माझ्याकडे ते घेऊन ये' असे सांगतात. ''मीठ कुठे आहे ? 'ते पाण्यात मिसळले. 'आता वरचे पाणी, मधले पाणी, खालचे पाणी असे वेगळे काढता येईल का ? शिष्य म्हणतो 'नाही'.

ब्रह्मस्वरूप असेच आहे. 'सर्व भूतमात्रात आत्मा आणि आत्म्यात सर्व भूतमात्रे. मग आता शोक, मोह कशाला ? सर्व आनंदस्वरूपच तर आहे. या स्थितीत कर्मदोष शिल्लकच रहात नाही. आत्मज्ञानरूपी अग्नीत तो केव्हाच भस्मसात झाला.

अशी स्थिती तुम्हा आम्हा सर्व साधकांना यावी.

।। जय जय रघुवीर समर्थ।।

**सुजन वाक्य**



**नोदकक्लिन्नगात्रस्तु स्नात इत्याभिधीयते ।**
**स स्नातो यो दमस्नातः सबाह्याभ्यन्तरं शुचिः।।**

▶ अंग पाण्याने भिजवले म्हणजे स्नान झाले असे म्हणत नाहीत. तर जो इंद्रियनिग्रह या व्रताने नखशिखान्त शुध्द झाला, त्यानेच खरे स्नान केले असे म्हणतात.



संत तुकाराम महाराजांचे साखळीचे १२ अभंग

# तुका म्हणे (अभंग ६ वा)

सौ. माधुरी दि. जोशी, बुलढाणा, मो. ९८२२१९०९६३

**अभंग -६**

**दोष रे जातील अनंत जन्मीचे।**
**पाय त्या देवाचे न सोडावे ।।१ ।।**
**न सोडावे पाय निश्चय तो करा।**
**आळवा शारंगधरा भावबळे ।।२ ।।**
**धरूनी केशवा आणा भाव बळे।**
**पापीया न कळे काही केल्या ।।३ ।।**
**न कळे तो देव, संतसंगावाचूनि।**
**वासना जाळोनी शुद्ध करा ।।४ ।।**
**शुद्ध करा मन देहातीत व्हावे।**
**वस्तूसी ओळखावे तुका म्हणे ।।५ ।।**

जीव जेव्हा मनुष्य योनीमध्ये जन्माला येतो तेव्हा तो अनंत जन्मांचे बरे-वाईट संस्कार घेऊनच आलेला असतो. वासनेतून त्याचा जन्म असल्याने बऱ्या वाईट वासना मानवात फार खोलवर दडलेल्या असतात. अनेक दोषांमुळे मानवाचे चित्त मलीन झालेले असते. स्वार्थापायी असत्य भाषण, चोरी करणे, लोकांचे पैसे इ. लुबाडणे, लोकांना फसवणे, खोटे नाटे व्यवहार करणे, आळस, प्रमाद, निद्रा इ.मध्ये व्यर्थ वेळ घालवणे, देहाला अवास्तव महत्त्व देऊन त्याला सजवणे, मनोरंजनात्मक, विलासी गोष्टी मध्ये रंगून जाणे इ. सर्व गोष्टी मनुष्य कमी अधिक प्रमाणात करीत असतो. थोडक्यात रजोगुण व तमोगुणाचा जबरदस्त पगडा त्याचेवर अंमल बजावीत असतो. अधर्म व अनितीने वागणे ह्याला एवढी सहजता येते की जणू तोच धर्म होऊन बसतो. परंतु रोग, दारिद्र्य, दैन्य, अपघात, स्वजनांचा आकस्मिक मृत्यु या व अशा जबरदस्त आपत्तींनी मनुष्याचे अंतरंग गदागदा हलविले जाते. त्याच्यामधील देवपणा किंचित का होईना जागा होतो आणि मग तो पशुपणातून बाहेर पडण्यासाठी तळमळू लागतो.

**संसारदुःखे दुखवला। त्रिविधतापे पोळला।**
**निरूपणे प्रस्तावला। अंतर्यामी ।।५/८/३**
**जाला प्रपंची उदास। मनें घेतला विषयत्रास।**
**म्हणे आता पुरे सोस। संसारीचा ।।५/८/४**

अशा प्रकारे मुमुक्षुत्व जागे झालेला मनुष्य पूर्वपुण्याईने सद्‌गुरू किंवा संतांच्या सान्निध्यात आला तर त्यांच्या उपदेशाने, मंत्रोपदेशाने पुनः पुनीत होण्याच्या मार्गावर लागतो. आपले दोष त्याला प्रखरतेने दिसू लागतात. ते घालवण्यासाठी तो तळमळू लागतो.

**पूर्वी नाना दोष केले। ते आवघेचि आठवले।**
**पूढे येऊनि उभे ठेले। अंतर्यामी ।।५/८/७**

काम,क्रोध,मोह,मद,मत्सर,द्वेष,परनिंदा इ. विकारांनी मन मलीन झालेले असते. ते सर्व विकार सद्ग्रंथ वाचन, नाममंत्र व सद्‌गुरू उपदेश ह्याने हळू हळू नाहीसे होऊ लागतात. अनंत जन्मीचे हे विकार केवळ परमेश्वराला, सद्‌गुरूला शरण गेल्याने जातात. केवळ आपल्या बळावर ते नाहीसे होऊ शकत नाहीत. सद्‌गुरूकृपेने देहांकार हळूहळू कमी होऊ लागतो म्हणून सद्‌गुरूंना अनन्यशरण जाणे हाच एकमेव उपाय शिल्लक राहतो. सद्‌गुरूंच्या मार्फत परमेश्वर मनुष्याच्या चित्तांतील दोष दूर करतो आणि म्हणून तुकाराम महाराज म्हणतात,

**दोष रे जातील अनंत जन्मीचे**
**पाय त्या देवाचे न सोडावे ।।१ ।।**

देहाहंकार हेच अज्ञान. हा देहाहंकार हाच सर्व दोषांचे मूळ होय. देहाहंकारामुळेच स्वार्थ बोकाळतो. व स्वार्थामुळे मी, मला, माझेपण जोपासल्या जां व मी-माझेपणामुळेच काम-क्रोधादी सर्व विकार (दोष) जागे होतात. ह्या सर्व दोषांच्या उच्चाटनासाठी देहाहंकार नाहीसा होणे फार फार महत्त्वाचे ठरते व तो सद्‌गुरूंच्या पादसेवनाने नष्ट होतो

म्हणून ''पाय न सोडावे'' असे महाराज म्हणतात. देवाचे पाय न सोडावे ह्याचा शब्दशः अर्थ घेणे योग्य होणार नाही. तर त्याचा मतितार्थ लक्षात घ्यावा लागेल.पाय न सोडावे ह्या शब्दरचनेत त्याचे दास्यत्व सोडू नये हेच सूचीत होते. त्याची शरणागती त्यात अभिप्रेत आहे. सद्गुरूंची वा देवाची सेवा, सद्गुरूंनी दिलेल्या नाममंत्राचे अखंड स्मरण, सद्गुरूंच्या उपदेशाचे आज्ञापालन, सद्ग्रंथांच्या वाचनाचे आचरण, सद्गुरू व देवाला नमन करणे ह्या सर्व गोष्टी स्वतः हनुमंतराय रामाला म्हणतात की हे रामा''देहदृष्ट्या तु दासोऽहं, जीव दृष्ट्या त्वदंशकः'' असे केले तरच मग ''आत्म दृष्ट्या त्वमेवाहं इति मे निश्चिता मतिः' असे म्हणण्याचे धाडस निर्माण होईल. आणि म्हणून देहाने सद्गुरू व देवाची सेवा व मनाने मी त्याचा दास आहे ह्या भावनेत राहून शरणागती स्वीकारणे महत्त्वाचे आहे. केवळ एक परमेश्वरच सर्व शक्तिमान, सत्ताधीश, सर्वज्ञ, सर्वनियंता आहे व तोच स्वामी असून मी केवळ निमित्तमात्र आहे हा भाव जेवढा अधिक जागृत होईल व राहील तेवढ्या प्रमाणात शरणागती वाढीस लागेल. म्हणून समर्पण वृत्तीने नामस्मरण करणे व सर्व प्रयत्नांती जे घडेल ते ईश्वरी इच्छेने घडले ह्या भावात निवांत राहणे ह्यालाच पाय न सोडणे असे म्हणता येईल. अंतर दोष घालविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणे व देवाची कळवळून प्रार्थना करणे ह्या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. म्हणून पुढील चरणात महाराज म्हणतात,

**न सोडावे पाय निश्चय तो करा।**
**आळवा शारंगधरा भावबळे ।।२ ।।**

काहीही झाले तरी परमेश्वराचे पाय सोडणार नाही. अर्थात् परमेश्वराशिवाय मला दुसरा-तिसरा आधार नाही असा बुद्धीचा पक्का निश्चय करावा लागेल. मनुष्याला जीवनात अनेकांचा आधार वाटत असतो. घर-दार, पैसा-अडका, नातेवाईक, मुलेबाळे, स्वतःचे सामर्थ्य इ. सर्वांबद्दलचा आधार जमेस धरून मनुष्य जीवन जगतो. परंतु हे सर्व आधार तात्पुरते, क्षणिक व बिनभरवशाचे आहेत. कोण केव्हा दगा देईल काहीही सांगता येत नाही. म्हणून केवळ एका देवाचा आधार वाटावा व तो कायम टिकावा ह्याविषयी काही प्रमाणे ग्रंथात सापडतात.

**अनन्याश्चिंतयन्तो मां ये जना पर्युपासते।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।**९/२२(गीता)

**किंवा**

**सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।**
**अहं त्वा सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।**१८/६६

ही भगवंताची आश्वासने शरणागतीला व श्रद्धा बळकट करायला फार फार दिलासा देतात म्हणून अनन्य शरणागतीने व भावयुक्त अंतःकरणाने देवाला आळवावे. देव भावाचा भुकेला आहे तो भक्ताचा भाव पाहतो. हे देवा मी अत्यंत अपराधी, पापी, दोषी आहे. माझे मन अनेक विकारांनी बरबटलेली आहे. देवा, केवळ माझ्या प्रयत्नांनी ते स्वच्छ होऊ शकत नाही. तूच आई होऊन माझ्या अंतरातील दोष, पाप नाहीसे कर. मी तुला शरण आलो आहे अशी कळवळून प्रार्थना केल्यास तो परमेश्वर हाकेला धावून येतो व आपले दोष नाहीसे करतो. कारण तो पतीतपावन, दोष निवारण, षड्रिपूभंजन करणारा आहे. ज्याप्रमाणे अत्यंत घाणीने बरबरटलेल्या मुलाला आई जवळ घेऊन प्रेमाने न्हाऊमाखू घालून त्याला स्वच्छ करते तद्वतच भगवंत भावरूपाने किंवा सद्गुरू रूपाने जवळ येऊन, प्रेमाने समजावून सांगून, प्रेम दृष्टीने, स्पर्श कृपेने वा संकल्प शक्तीचा वापर करून, त्याला (शिष्याला) नाममंत्र देवून आपलेसे करतात व भाव जागृती करून चित्तातील दोष नाहीसे करतात. म्हणून देवाची कळवळून, भावाने प्रार्थना करणे अतिशय महत्त्वाचे आहे. परमार्थात भावाला फार महत्त्वाचे स्थान आहे.

'भाव बळे आकळे एरवी ना कळे' किंवा 'भाव धरा रे आपुलासा देव करा रे।' ही संत वचने या संदर्भात लक्षात घ्यायला हवीत.''मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव। देव अशान भेटायचा नाही रे देव बाजाराचा भाजीपाला नाही रे'' असे तुकडोजी महाराज म्हणतात. म्हणून भावयुक्त अंतःकरणाने देवाला पुनःपुनः आळवावे लागेल. हीन-दीन होऊन आपली असमर्थता त्याचे जवळ

अश्रुयुक्त नयनाने प्रगट करावी लागेल तरच तो परमेश्वर कृपा करील. अर्थातच पश्चाताप व अनुतापाने दग्ध झालेल्या अंतःकरणातच परमात्मा प्रगट होऊ शकेल. म्हणून पुढील चरणात महाराज म्हणतात,

**धरूनी केशवा आणा भावबळे।**
**पापीया न कळे कांही केल्या ।।३ ।।**

आतच असलेल्या देवाला (आत्मारामाला) प्रगट होण्यासाठी, त्याच्यावर असलेले दोष-विकाररूपी आवरण दूर करावे लागेल. अखंड नामसाधनेने भाव जागृती होऊन ते आवरण हळूहळू विरळ होत जाईल. कळकळीच्या प्रार्थनेने, अनुतापाने दोष, विकार वासना जळू लागतील व चित्त शुद्ध होत-होत आतच असलेला आत्माराम स्पष्ट अनुभवायला येऊ शकेल. परंतु ह्या सर्व गोष्टी अत्यंत पापी माणसाला कळणे दुरापास्त आहे. पापी माणसाला भजन, पूजन, नामस्मरण, कीर्तन, प्रवचन वगैरे गोष्टी चांगल्या हितकारक असतात हे कळते परंतु तरीही तो तिकडे वळत मात्र नाही. त्याची बुद्धी त्याला तिकडे जाऊ देत नाही. विषय सुखातच तो गढून गेलेला असल्याने ह्या सर्व पुण्यदायी गोष्टींकडे पाठ फिरवतो. अशा माणसांसाठी माऊली म्हणतात,

**तैसा हृदयामध्ये मी रामु। असता सर्व सुखाचा**
**आरामु। कां भ्रांतासी कामु। विषयावरी ।।**

गायीच्या स्तनामध्ये मधुर, पौष्टीक दूध असूनही गोचीड मात्र त्याचा आस्वाद न घेता स्तनावरील त्वचेत असणारे रक्तच पिण्यात मशगुल असते. त्याचप्रमाणे पापी मनुष्य पापापायी जवळच असलेल्या आत्मारामाकडे पाठ फिरवून बहिर्मुख वृत्तीने विषयसुखातच रममाण होतो. अशा पापी माणसाचे मुख म्हणजे जणू सर्पाचे बीळ व जिव्हा म्हणजे काळसर्प होय असे नाथ महाराज म्हणतात.

**नामाविण मुख सर्पाचे ते बीळ।**
**जीव्हा काळ-सर्प आहे ।।** (हरिपाठ ए.म)

अशा पापी जनांना सावध करताना तुकाराम महाराज पुढील चरणात उपदेश करतात,

**न कळे तो देव संतसंगावाचूनी।**
**वासना जाळूनी शुद्ध करा ।।४ ।।**

देव आहे असे सर्वजण केवळ तोंडाने म्हणतात परंतु देवाचे खरे स्वरूप मात्र कोणी ओळखत नाहीत. बहुतांशी लोक देवघरातील वा देवळातील मूर्तीला किंवा प्रतिमेला फक्त देव म्हणून समजतात व अंतःकरणातील देवाला विसरून जातात. श्री समर्थ म्हणतात-

**देवाचा ठावचि लागेना। येक देव नेमस्त कळेना।**
**बहुत देवी अनुमानेना। येक देव ।।**दा.१८/८/२।
**तो अंतर्देव चुकती। धावां घेऊन तीर्था जाती।**
**प्राणी बापुडे कष्टती। देवास नेणतां ।।**दा.१८/८/११।
**मग विचारिती अंतःकर्णी। जेथे तेथे धोंडापाणी।**
**उगेंचि वणवण हिंडोनी। काय होते ।।**दा.१८/८/१२।
**ऐसा ज्यासी विचार कळला। तेणे सत्संग धरिला।**
**सत्संगे देव सापडला। बहुत जनांसी ।।**दा.१८/८/१३।

खरा देव समजावून घेण्यासाठी सत्संगाशिवाय पर्याय नाही म्हणून मानवाने सत्संगाच्या बाबतीत आग्रही असले पाहिजे. संगतीचे ३ प्रकार आहेत. त्यातली कुसंगती जाणीवपूर्वक टाळावी, विसंगती प्रारब्धानुसार वाट्याला आलेली असल्याने ती तक्रार न करता शांत चित्ताने सहन करावी व सत्संगती वाट्टेल ती किंमत देऊन आग्रहपूर्वक पुरुषार्थाने हस्तगत करावी. अर्थात सत्संगतीसाठी कितीही कष्ट पडले, पैसा खर्च करावा लागला (जाणे-येणे, प्रवासासाठी) व वेळ द्यावा लागला तरी तो अवश्य द्यावा. पुष्कळदा प्रपंच पुरूषार्थाने केला जातो. व परमार्थ प्रारब्धात असेल तर होईल असे म्हटले जाते, परंतु नेमके ह्याचे उलट करता यावे. प्रपंच प्रारब्धावर सोपवून परमार्थाच्या बाबतीत पुरुषार्थ करता यावा.

संत संगामध्ये दोन गोष्टींचा प्रामुख्याने लाभ होतो. एक तर दोषांचे उच्चाटन होते व दुसरे म्हणजे देवाचे व जगताचे खरे स्वरूप ध्यानी येऊन नित्यानित्य विवेक, आत्मानात्म विवेक जागृत होतो. सत्संगात वासनांचे निर्मुर्लन होते. अशुभवासना नाहीशा होऊन शुभ वासना निर्माण होतात. म्हणून संतसंगात अशुभ वासना जाळून

टाका असे तुकोबा म्हणतात. पापी माणसांना सुद्धा जवळ करणारे संत असतात. पतीतपावन अशा रामाच्या स्मरणाने पाप वासना नाहीशा होऊ लागतात म्हणून नाममंत्र देऊन त्यांना आपलेसे करतात. प्रेमाने समजावून सांगून पापी माणसाला हळूहळू भक्तीमार्गाकडे वळवितात. खऱ्या देवाची म्हणजेच अखंड समाधानाची, निर्विषय आनंदाची जाणीव करून देऊन अंतस्थ असलेल्या आत्मारामाकडे लक्ष कसे लावावे ह्याचे धडे संत संगतीत मिळतात. म्हणून सत्संग आवर्जून करावा. सत्संगात रामकथा, कृष्णकथामृत श्रवण केल्याने चित्तशुद्धी होते. अशाप्रकारे मन शुद्ध करून देहातीत होण्याचा अभ्यास करावा व आत्मवस्तुला ओळखावे, जाणावे, अनुभवावे. असे महाराज शेवटच्या चरणात सांगतात.

**शुद्ध करा मन देहातीत व्हावे**
**वस्तुसी ओळखावे तुका म्हणे ।।५।।**

चित्त शुद्धी व चित्त शांती ही परमार्थाची पहिली अट आहे. निष्काम कर्माने चित्त शुद्धी व निष्काम उपासनेने चित्त शांती होते. म्हणून निष्काम कर्म व निष्काम उपासना ह्या दोन्ही विषयी संत, शास्त्र, सद्ग्रंथ आग्रह धरतात.ज्याप्रमाणे स्वच्छ व शांत पाण्यामध्ये तळ स्पष्टपणे दिसू शकतो त्याचप्रमाणे शुद्ध व शांत चित्तामध्ये दडलेली आत्मवस्तू ओळखता येते. सातत्याने तिन्ही देहांचा निरास करून आत असलेल्या आत्मारामाला जाणावे. स्थूल, सूक्ष्म व कारण देहाला प्रकाशीत करणारा आत्मा हेच आपले खरे स्वरूप असून त्याला गवसणी घालावी. सततच्या आत्मचिंतनाने आत्मवस्तुचा निजध्यास लागतो व निजध्यासाचे रूपांतर कालांतराने गुरूकृपेने आत्मसाक्षात्कारात होऊन जाते व त्याला सहजता आली की खऱ्या अर्थाने मनुष्य जीवनाचे सार्थक होते. ही सार्थकता सर्व संत-सद्गुरू अनुभवीत असतात. म्हणून सत्संगात आपली ओळख आपल्याला होते. संत विचाराची साधना देऊन देहातीत अवस्थेला घेऊन जातात. समर्थ म्हणतात,

**तस्मात् विचार करावा। देव कोण तो ओळखावा।**
**आपला आपण शोध घ्यावा। अंतर्यामी ।।४/९/७।**

असा शोध घेता घेता,

**आत्मा एक स्वानंदघन। आणि अहमात्मा हे वचन।**
**तरी मग आपण कैचा भिन्न। उरला तेथे ।।४/९/१५।**

ह्या अवस्थेला मनुष्य पोहचतो. ह्यालाच "आत्मवस्तूस ओळखावे" असे तुकाराम महाराज म्हणतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**


## 'रघुवीर समर्थ' मासिकातील पृष्ठ प्रायोजनासंबंधी


एप्रिल २०१३ च्या अंकापासून **'रघुवीर समर्थ'** मासिकाच्या समर्थ विचार कार्यात सहभागी व्हा.

आपण आपल्या नावाने, आपल्या दिवंगत आप्तेष्टांच्या स्मृतीप्रीत्यर्थ किंवा परिवारातील सदस्याच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ श्रीसमर्थ विचारांचा प्रसार व प्रचार सेवा म्हणून अंकातील एक अथवा अधिक पानांचे प्रायोजकत्व स्वीकारू शकता. प्रायोजित केलेल्या पानावर आपले नाव छापले जाईल.

**पृष्ठ प्रायोजनाचे दर :**
**एका अंकातील एका पानासाठी रु. ५००/-**

**अधिक माहितीसाठी संपर्क-**
**स. भ. मंदारबुवा रामदासी, ९७६३२७१४०७**


**सुजन वाक्य**



**न यत्रस्ति गतिर्वायोः रश्मीणात्र्च विवस्वतः ।**
**तत्रापि प्रविशत्याशु बुध्दिर्बुध्दिमतां सदा ।।**

▶ जिथे वारासुध्दा शिरु शकणार नाही किंवा जिथे सूर्यकिरणांनाही जाता येत नाही, तेथे सुध्दा बुध्दिमान लोकांची बुध्दि अगदी नेहमी झटकन जाऊन पोहोचते.



# दृष्टांत

श्री. अमृतबुवा रामदासी,
मो. ९४०४५९०७७३ सज्जनगड

**जयास वाटे मोक्ष व्हावा। तेणे सद्गुरू करावा।**
**सद्गुरूविण मोक्ष पावावा। हे कल्पांती न घडे।।**

ज्याप्रमाणे बर्फाला पाण्यापेक्षा कायम वरती रहायला हवं असतं, अगदी त्याचप्रमाणे अहंकारालाही सगळ्यांपेक्षा वरती रहायला आवडत असतं. आपल्या अंतरात जेव्हा थोड्याशा ज्ञानाची जागृती होते, किंवा आपण एखाद्या गोष्टीसाठी थोडेसे सरस होत असतो तेव्हा आपल्यामध्ये नकळत अहंकारही जोपासला जाऊ लागतो. तो ज्ञान अवस्थेच्या सर्वंकष अधःपतनाला कारणीभूत ठरतो. अहंकार तर आपले वर्चस्व सिद्ध करतोच. त्याला असं वाटू लागतं की हे जे मी मिळवलेले ज्ञान आहे, मला आलेला अनुभव आहे तो केवळ माझ्याच प्रयत्नांमुळे शक्य झालेल आहे. सत्य पाहता जेव्हा जेव्हा अहंकार सद्गुरूंच्या चरणावर समर्पित होत असतो तेव्हा तेव्हा आपण अधिकाधिक पात्र होत असतो आणि आपणास ज्ञान प्राप्ती होत असते.

सद्गुरुंच्या समोर स्वीकारभाव जागृत होतो त्यामुळे अहंकाराच्या समर्पणाला येणारा कठीणपणा इथे जाणवत नाही. आपल्याला जप-तप, मंत्र-तंत्र यांचे एक प्रकाराचं आकर्षणच असतं. आपण आपले ईप्सित साध्य सोडून अशाच गोष्टीमध्ये गुंतून जातो. आपल्याला सिद्धीची आवश्यकता वाटू लागते. कारण जे कोणीही करू शकत नाही अशा काही गोष्टी आपल्याला कराव्याशा वाटतात आणि असे करता करता यातून अहंकारात गुरफटत जातो. मग असं वाटू लागतं की आपल्या कामात कोणीही विघ्न आणू नये. मला जसं वाटतंय माझं मन जसं म्हणेल त्याचप्रमाणे सगळं घडावं. मग खऱ्या ज्ञानाची त्याला आवश्यकता वाटतच नाही, कारण खरं ज्ञान प्राप्त करून घ्यायचं असेल तर त्याला परिश्रमांची जोड आवश्यकच आहे आणि अहंकार काही परिश्रम करू देत नाही. यासाठी आलेला दृष्टांत आपण पाहू...

दोन साधू मित्र एक मणिकांचन आणि एक ऋषिकांचन दोघांमध्ये खूप घनिष्ट मैत्री असते. मणिकांचन नावाचा जो साधू असतो त्याची दोन्ही मुले जे की शास्त्रामध्ये पारंगत असतात. आणि ऋषिकांचनचा पुत्र नेमिष कोणत्याही प्रकारचे परिश्रम न घेता ज्ञानी बनायचं ठरवतो, सगळ्या विद्यांमध्ये पारंगत होण्याची मनिषा बाळगतो आणि मणिकांचन याच्या दोन्ही मुलांचा मत्सर तिरस्कार करू लागतो. त्याला सद्गुरुशिवाय मोक्षपद प्राप्त करायचं असतं. म्हणून तो वेदज्ञान शास्त्रांचे ज्ञान मिळविण्याच्या उद्देशाने भगवान इंद्राचे कठोर तप करायला सुरूवात करतो.

त्याच्या तपाच्या कठोर परिश्रमामुळे भगवान इंद्र प्रसन्न होऊन प्रकट होतात. तेव्हा डोळे उघडून नेमिष भगवान इंद्राला वर मागतो की ''हे देवेंद्रा मला असा वर दे की मला मोक्षपदाच्या प्राप्तीसाठी कोणत्याही सद्गुरूची आवश्यकता नसावी, तसेच सारे वेद आणि शास्त्र मला

मुखोद्गत व्हावेत त्यासाठी मला गुरू करण्याची गरज भासू नये तसेच अध्ययनाची देखील आवश्यकता असू नये. असा वर मला दे.''


हे ऐकून भगवान इंद्र हसत उत्तर देतात,'हे पहा बाळा हे अशक्य आहे. तू केवळ कठोर तपाचे आचरण करून ज्ञानप्राप्ती करून घेऊ शकत नाहीस. त्यासाठी तू सद्गुरुंच्या मार्गदर्शनाखाली परिश्रम आणि अध्ययन करून ज्ञानप्राप्ती करून घे आणि हेच योग्य असेल.

भगवान इंद्र एवढे सांगून तिथून गेले मात्र नेमिष आपल्याच हट्टावर अडून राहीला. इंद्राच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. त्याने आपली तपश्चर्या चालू ठेवली. एक दिवस जेव्हा नेमिष जेव्हा स्नानासाठी गंगेवर गेला तेव्हा त्यानं पाहील की एक वृद्ध तिथे नदीच्या तीरावर बसला आहे आणि तो ते दृश्य पाहू लागला. तो वृद्ध आपल्या मुठीत माती भरून नदीच्या वाहत्या प्रवाहात फेकू लागला होता. हे त्याचं जगावेगळं वर्तन नेमिष पाहून विस्मित झाला. त्याने त्या वृद्धाला विचारलं की हे महानुभाव आपण हे काय करत आहात ? तेव्हा तो वृद्ध म्हणाला नदी पार करायला लोकांना खूप कठीण जातंय. माझा विचार आहे की ही माती टाकून पलीकडेपर्यंत एक पूल बनवला जावा, जेणे करीता लोकांना येता-जाता काही अडचण नाही येणार. हे ऐकून मात्र नेमिष हसू लागला. तो हसत-हसतच म्हणाला हे महानुभाव वाहत्या प्रवाहात माती टाकून कसा बरं पूल तयार होईल ? तुमचे हे परिश्रम व्यर्थ आहेत. याने काही साध्य होणार नाही. तेव्हा तो वृद्ध म्हणाला का ? माझे श्रम व्यर्थ का ? मी पण तर तुझ्यासारखंच काम करतोय. तू पण तर वेदांचं-शास्त्राचं अध्ययन न करताच ज्ञान आणि मोक्षपदाचा पूल बांधण्याचा प्रयत्न करीत आहेस. हे म्हणून त्या वृद्धाने आपले रूप बदलले. तो वृद्ध दुसरा तिसरा कोणी नसून प्रत्यक्ष भगवान इंद्र होते. ते नेमिषला समजावण्यास आले होते की गुरूंच्या मार्गदर्शनाशिवाय या सगळ्या गोष्टी केवळ अशक्य आहेत. नेमिषला आपली चूक लक्षात आली.

तात्पर्य- ज्ञान व मोक्षपदाची प्राप्ती परिश्रम अध्ययन आणि योग्य गुरूंच्या मार्गदर्शनानेच केवळ अर्जित केली जाऊ शकते. त्याविणा ते केवळ अशक्यच.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

---



## काव्यांजली

# स्वामीनिष्ठ हनुमान

**श्री.सुभाष शं.सरदेशमुख, सातारा**

छाती फाडुनी श्रीरामाचे दर्शन जो देई
सेवक ऐसा एकनिष्ठ या ब्रह्मांडी नाही ।। धृ. ।।
अत्यानंदे रामचंद्र सर्वांना गौरविती
अलंकार-वसनेही सकला वानरांस देती
बिभीषण-सुग्रीव याना छत्रे-मुकुट तधी देई ।।१।।
या विश्वाला धीर देई जो, निर्वाणीचा सखा
शोधोनीही मिळे न सेवक हनुमंतासारखा
ऐशा कपिश्रेष्ठाचे व्हावे कैसे उतराई ? ।।२ ।।
त्यास राघवे हृदयी धरिले, बोले ते समयी
'वायुसुता मी सदैव राहे तुझिया या हृदयी'
तेजस्वी अनमोल हार देई सीतामाई ।।३ ।।
वृक्षावरी बैसोनी पाहे फोडोनिया मणी
राघव नाही म्हणुनी दिधले सर्व तधी फेकुनी
'हार का बरे फोडिलास?' कपि पुसती ते समयी ।।४ ।।
रूद्र म्हणे,''या मण्यामधे नाही श्रीसीतापती
श्रीरामाविण ज्या वस्तू त्या तुच्छ मला वाटती'
वानर म्हणती,'प्रभू दाखवी तू तुझिया हृदयी ।।५ ।।
विदारिले हो हृदयकपाटा रूद्रे तात्काळ
नवल दाविले, दिसती तेथे सीता-घननीळ
श्रेष्ठ भक्त हा, म्हणूनी वानर वंदिती हो पायी ।।६ ।।




# स्वभावाला औषध नाही ?

**श्री. ग. प्र. कुलकर्णी** - मो. ८७९३३६०८१४



युवक मित्रांनो,
सप्रेम जय रघुवीर !

आमच्या महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचं संमेलन होतं. त्यानिमित्ताने आम्ही सर्व वर्गमित्र एकत्र आलो होतो. थोड्याफार गप्पा झाल्या. एका मित्राला विशेष घाई असल्याने तो लवकर गेला. तो गेल्यानंतर आमच्यापैकी प्रत्येकाची प्रतिक्रिया होती, 'स्वभावाला औषध नाही.' महाविद्यालयातील अनेक जुने प्रसंग आठवले, या आमच्या मित्रानं आपल्या स्वभावामुळे न जाणो किती लोकांची मनं दुखावली असतील ! आमच्यापैकी प्रत्येकाला हा अनुभव होताच. परंतु आज बारा वर्षांनंतर काहीतरी फरक पडला असेल असे वाटले होते. 'झालं गेलं गंगेला मिळालं असे म्हणुन आम्ही त्याच्याशी वागत होतो. हा मात्र पूर्वीसारखाच दुसऱ्याच्या दोषांवर बोट ठेवून वर्मी लागेल असे बोलत होता. एका तासाभराच्या भेटीत तो आम्हाला बरंच काही बोलून गेला. आमची मनं दुखावली गेली, याची जाणीवही त्याला नव्हती. या उलट, ''माझा स्वभाव जरा स्पष्ट वक्तेपणाचा आहे. कोणाला आवडो अथवा न आवडो, आपण हे असेच आहोत,'' याचा सार्थ (?) अभिमान त्याला होता.

आपली बुध्दिमत्ता, श्रीमंती, आपलं यश याचा दुराभिमान बाळगुन सगळ्या दुनियेला तुच्छ लेखण्याचं धाडस माणूस कसं करतो कोणास ठाऊक ? श्रीसमर्थ रामदास स्वामींचा दासबोध वाचनात असल्यामुळे त्यातील वचन साहजिकच आठवलं-

**भरोन वैभवाचे भरी । जीवमात्रास तुच्छ करी ।**
**पाषांडमत थावरी । तो येक पढतमूर्ख ।।** दा.२-१०-२०।।
**आपल्या पुरुषार्थ वैभवें । बहुतांस सुखी करावें ।**
**परंतु कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया ।।**दा. १२-१०-२७

तो मित्र गेला, जाऊ दे ना यार' म्हणुन आम्हीही उरलेला वेळ एकमेकांची सुख-दुःख वाटून घेण्यात आनंदात घालवून घरी आलो. परंतु मनात प्रश्न होता खरंच स्वभावाला औषध नसतं का ? स्वभाव बदलु शकतो का ?

या प्रश्नाचं उत्तर शोधताना लक्षात येतं की 'विकार' आणि 'विचार' या दोन्ही मार्गाने स्वभाव बदलतो. परंतु विकारातुन झालेला स्वभावातील बदल हा नकारात्मक असतो. ती व्यक्ती समाजालादेखील घातक असते. काही व्यक्ती पूर्वायुष्यात सज्जन, सरळमार्गी असतात. त्याच व्यक्ती काही काळानंतर काम, क्रोध, लोभ इत्यादी विकारांच्या आधीन होऊन दुष्कर्म करतात, कुमार्गाने चालू लागतात. भ्रष्टाचार, स्त्रियांवर होणारे अत्याचार, हत्या, आत्महत्या ही विकारांच्या आधीन होऊन केलेली अत्यंत घृणास्पद दुष्कृत्ये (पाप) अशा नकारात्मक स्वभावाबद्दलची उदाहरणे आहेत. अशी विकारांना बळी पडलेली माणसं आपल्या हातुन घडलेल्या कुकृत्यांची जबाबदारी घेत नाही. आपलं नशीब, प्रारब्ध, परिस्थिती यांना ते दोष देतात. परंतु समर्थ म्हणतात..

**रेखा तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येते ।**
**डोळे झांकणी करावी तें। काय निमित्त।।**दा.१५-६-९।।

विकारांमुळे स्वभावात सकारात्मक बदल झाल्याचे काहीवेळा दिसते. परंतु असे बदल तात्पुरते किंवा नाटकी असु शकतात. उदाहरणार्थ अत्यंत क्रोधी असलेल्या व्यक्तीने कापड दुकान सुरू केले. स्वार्थासाठी ग्राहकापुढे

तो अत्यंत नम्र व सहनशील असतो. ग्राहकाला शंभर साड्या दाखवुन त्याने एकही विकत घेतली नाही तरी हा चेहऱ्यावरचे स्मितहास्य न ढळू देता ग्राहकाला 'पुन्हा आजर्वुन या' म्हणुन निरोप देतो. परंतु हीच सहनशीलता आपल्या नोकराबरोबर वागताना किंवा घरी असत नाही. व्यक्ती आणि स्थान बदलले की गुण नाहीसा होतो.

दुसरा मार्ग विचारातुन, आत्मपरीक्षणाने स्वभावात होणारा बदल हा आहे. विचारांच्या माध्यमातूनच खऱ्या अर्थाने स्वभावदोषांचे निर्मूलन होते. यासाठी प्रथमतः आपल्या स्वभावातील दोषांची 'दोष' म्हणून कबुली होणे आवश्यक आहे.

**सकळ अवगुणांमध्ये अवगुण ।**
**आपले अवगुण वाटती गुण ।**
**मोठे पाप करंटपण । चुकेना की ।।**

दा. १९-८-८।।

आपले अवगुण आपणास अवगुण वाटायला हवेत. आपले दोष जाणवल्यानंतरच आपण ते घालवु शकतो. विचारांनी घडलेला स्वभावातील बदल हा अधिक टिकाऊ व अधिक हितकारक असतो. परंतु असा बदल घडून येण्यासाठी स्वतः प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**मना गुज रे तुज हे प्राप्त जाले ।**
**परी पाहिजे अंतरी यत्न केले ।**
**सदा श्रवणे पाविजे निश्चयासी ।**
**धरी सज्जनसंगती धन्य होसी ।।** म. श्लो.

दृढ निश्चय, प्रयत्नातील सातत्य, चांगली संगत, आणि आत्मपरीक्षणानेच स्वभावात सकारात्मक बदल घडतो.

**स्वभाव ज्याचा जैसा, त्याचा व्यवहार तैसा होतसे ।**
**स्वभावें होतें फजिती, स्वभावें मान्यता पावतसे ।**
**स्वभाव बदलणें मनाचा, बहुत कठीण असे जरी ।**
**दृढनिश्चय अन् दीर्घप्रयत्नें, तो बदलें ही गोष्ट खरी।।**

तात्पर्य हेच की स्वभावाला औषध आहे, परंतु स्वतः घेतलं तरंच !

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

## दुष्काळ निवारण कार्यात संस्थानचा सहभाग

दि. १ मे व २ मे रोजी जालना शहरातील 'मोती तलाव' या निजाम कालीन तलावातील गाळ काढण्याचा उपक्रम जालना जिल्हा प्रशासनच्या वतीने आयोजित केला होता. ह्या उपक्रमामध्ये २० पोकलेन मशिन व ३०० टिप्पर, १०० ट्रॅक्टर सहभागी झाले होते. हा उपक्रम लोकसहभागातून पूर्ण झाला. ह्या उपक्रमामध्ये सहभागी पोकलेन, टिप्पर, ट्रॅक्टर यांचे चालक, आर.पी.टी.एस. चे २०० जवान, प्रशासनातील कर्मचारी यांच्या भोजनाची व्यवस्था 'श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगडच्या व जालना शहरातील समर्थभक्त समीर खडकीकर, समर्थ संस्थान  जांबसमर्थ चे अध्यक्ष डॉ. भारत कुलकर्णी, रमेश याडकीकर, अभिजीत देशपांडे, अनिल कुलकर्णी, धनंजय याडकीकर, निवृत्ती रुद्राक्ष, आनंद वेचलेकर, गिरीश राखे, दिपक रणनवरे, यांच्या वतिने करण्यात आली. याप्रसंगी श्री रामदास स्वामी संस्थानचे सज्जनगडचे प्रतिनिधी स.भ. श्रीहरी दड्डीकरबुवा ह्यांचे हस्ते कमचाऱ्यांना भोजन पाकिटे देण्यात आली.

जिल्हाधिकारी श्री. शाम देशपांडे, उपजिल्हाधिकारी रविंद्र गुरव, प्रकल्प अधिकारी हेमंत पांडे, उपनगराध्यक्ष राजेश राऊत यांनी भेट देऊन समर्थ कार्याचा गौरव केला व  शुभेच्छा दिल्या.

निझामकालिन मोती तलावाचे क्षेत्र २०५ एकर असून १४ मीटर त्याची खोली आहे. त्यात १० मीटर खोलीचा गाळ साचलेला आहे. दि. १ मे व २ मे या दोन दिवसात ४८ हजार ब्रास गाळ उपसण्यात आला. त्यामुळे तलावाची साठवण क्षमता अतिरिक्त ४०० हेक्टर घन मीटर ने वाढणार आहे.




# अभंग आस्वाद

श्री. प्रसादबुवा रामदासी, सज्जनगड, मो. ९४२१५७४२००

**भक्ती नको भक्ती नको विषयांची**
**विषय वाटतसे सुख । परि ते दुःख मुळ**
**विषय सेविता गोड । शेवटी जड परिणामी**
**रामदास म्हणे मनी । विषय जनी अधोगती ।।**

सोळाव्या शतकामध्ये भक्तिमार्गाच्या प्रचार आणि प्रसाराचे महान कार्य करण्यामध्ये श्रीसमर्थांचे स्थान अग्रगण्य आहे. श्री समर्थांच्या अप्रतीम आणि अलौकिक ग्रंथसंपदेमुळे भक्तीचा महापुर आला. समर्थांचे अभंग म्हणजे शब्दरुपी मोठाली ताटे असून त्यात मोक्षरुपाकडे घेऊन जाणारे साधनरुप व साधनसंपत्ती रुप अशी पक्वान्ने वाढली आहेत ती आपण ग्रहण करीत आहोत. वरील श्री समर्थांचा अभंग हा उपदेशपर आहे त्याचे चिंतन श्री समर्थ कृपेने करुया. या जीवसृष्टीवर जन्माला येणाऱ्या प्रत्येक जीवाचे शरीर हे पंचभूताचे बनलेले आहे. प्रत्येक भूताचा एक-एक गुण आहे. पंचज्ञानेंद्रियाद्वारे जीव पंचविषय भोगीत असतो.

**या विषयावाचोनि काही ।आणि सवर्था रम्य नाही।**
**हा स्वभावोचि पाही । इंद्रियांचा ।।** (ज्ञानेश्वरी)

जीवाने आपल्या पूर्वस्थितीला प्राप्त करुन घ्यावे म्हणून मनासहित पंचज्ञानेद्रियांने ईश्वरीतत्वाला जाणून घ्यावे या हेतूनेच सर्व इंद्रियांची योजना भगवंताने केली आहे. पण हे न जाणता जीव मात्र त्या सर्व इंद्रियांचा उपयोग विषयभोगाकरीतांच करतो. विषय इंद्रियांचा माध्यम करुन जीवास आपल्याकडे ओढतात. या विषयांच्या अल्प सुखामुळे जीव देवापासून दूर जातो. व जन्ममरणाच्या चक्रात अडकतो.

**ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते**
**संगात्संजायते कामः कामात्क्रोधोभिजायते ।**
**क्रोधात् भवति संमोहः सम्मोहात्स्मृतिविभ्रमः।**
**स्मृतिभ्रंशाद् बुध्दिनाशो बुध्दिनाशात्प्रणश्यति ।।** गीता

विषय संगाच्या स्टेशनवरुन निघालेली गाडी वैराग्याचे ब्रेक तुटल्यामुळे विनाशाकडे जात आहे. म्हणून अत्यंत कनवाळूपणे श्रीसमर्थांसारखे संत उपदेश करीत असतात 'भक्ती नको भक्ती नको विषयांची' विषापेक्षा विषय घातक आहेत विष एकालाच एकदाच मारते पण विषय सर्व जनांस अनंतजन्म मारत आहेत, म्हणून विषय सेवनामुळे होणारे दुःख, क्षणभंगुरत्व तसेच इतर होणारे तोटे आपल्या लक्षात यावे यासाठी समर्थांनी पुनःपुनः सांगितले आहे. 'चिंतेने उर फाटतो' असे म्हणणाऱ्या समर्थांच्या अंतःकरणात जीवाच्या कल्याणाची अखंड तळमळ होती म्हणून समर्थांनी विषयांच्या ठिकाणी असणारे ममत्व कमी करुन आत्मस्वरुपाचे ज्ञान प्राप्त करुन परमेश्वराशी एकरुप व्हावे यासाठीच 'भक्ती नको भक्ती नको विषयांची' अशी द्विरुक्ति केलेली आहे.

**सांडून राम आनंदघन । ज्याचे मनी विषयचिंतन**
**त्यासी कैसे समाधान । लोलंगतासी ।।**
**विषयजनित जे जे सुख । तेथेचि होते परमदुःख ।**
**पुर्वी गोड अंती शोक । नेमस्त आहे ।।** (दासबोध)

इंद्रिय देवाकडे लावली तर देहब्रह्मरुप होतो व जीवाचा उध्दार होवू शकतो. कान, डोळे, त्वचा, जिव्हा, नासिका आणि मन या सर्वांकडून जीवात्मा त्या त्या इंद्रियांच्याद्वारा त्या त्या विषयांचे सेवन करतो आणि हेच त्या जीवात्म्यास बंधनकारक होते.

**विषयी विटला, सुटला, भजनी नटला, त्यजुनी भव खटला। तो विठ्ठल मनी पटला, संशय फिटला, तयासी यम हटला।**

वास्तविक जन्म-मरणाच्या बंधातून मुक्त होण्यासाठी अविनाशी परब्रह्माशी एकरुपता जीवाने प्राप्त करुन घ्यावी

आणि त्या करिताच सर्व इंद्रियांनी आपला विषय भगवंतच करुन घ्यावा यासाठी संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा अभंग चिंतनीय आहे.

**घेई घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचे ।**
**मना तेथे धाव घेई । राही विठोबाचे पायी ।**
**तुम्ही ऐकारे कान । माझ्या विठोबाचे गुण**
**तुम्ही डोळे घ्या रे सुख । पहा विठोबाचे मुख ।**

एका सुभाषितकारांनी वर्णन केल आहे एक एका विषयामुळे एक एक जीव मरतो मग पंचविषय भोगणाऱ्याची काय गती होत असेल ?'' विषयाचे सुख येथे वाटे गोड । पुढे अवघड यमदंड'' विषयसुखाचे आठ तोटे श्री शंकराचार्यांनी वर्णन केले आहेत.

**बलविर्यतप प्रज्ञामेधा धन धर्मोत्साह**
**हानि देतुत्वादधर्म तज्जनित नरकादी हेतुत्वाच**

सुख जरी एक असल तरी सुखाचे विषय अनेक आहेत, प्रपंचामध्ये प्रत्येकाचा सुखाचा विषय वेगळा आहे, संसारिक सुखाचे तीन प्रकार गीतेमध्ये आले आहेत. १) सात्विक सुख २) राजस सुख ३) तामस सुख. चंदन मिळवण्याकरीता ज्याप्रमाणे सर्पांना बाजुला करावे लागते तेंव्हा ते चंदन प्राप्त होते त्याप्रमाणे अगोदर कठीण नंतर चांगले त्यालाच सात्विक सुख म्हणतात. विषय व इंद्रियांच्या संयोगाने जे क्षणिक सुख होते, परिणाम मात्र वाईट त्यास राजस सुख असे म्हटले जाते. तामस सुखामधे सुखाचा भास होतो, असते मात्र दुःखच यासाठी शाश्वत सुखाचा अनुभव घेण्यासाठी समर्थांच्या अभंगाचा विचार करू आणि विषयां त्यागाने परमसुखाची अर्थात परमात्म्याची प्राप्ती करून घेण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करुया आणि समर्थांच्या श्लोकाचे स्मरण करून या लेखाला पूर्णविराम देवुया.

**विषयजनित सुखे सौख्य होणार नाही ।**
**तुजविण रघुनाथा वोखटे सर्व काही ।**
**तळमळ निववी रे राम कारुण्यसिंधु ।**
**षड्रिपुकुळ माझे तोडी याचा समंधु ।।**
**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

# श्रीसमर्थ पादुका पूजन व दर्शन सोहळा, विलेपार्ले, मुंबई

श्रीस्वामी समर्थ मठ, विलेपार्ले, मुंबई येथील श्रीसमर्थ पादुका पूजन व दर्शन सोहळा श्रीस्वामी समर्थ मठ हनुमान रोड विलेपार्ले पूर्व यांनी श्रीसमर्थ रामदास स्वामी, श्रीसंत साईबाबा, श्रीस्वामी समर्थांच्या मूळ पादुकांचा पूजन व दर्शन सोहळा दिनांक ५ मे २०१३ रोजी विलेपार्ले येथे एका भव्य मंडपात आयोजित केला होता. दि. ४ मे रोजी समर्थ पादुकांचे स्वामी समर्थ मठात मठाचे सर्व विश्वस्त व पदाधिकारी सेवक व भक्तगणांनी भव्य स्वागत केले. श्री. व सौ. हरिदास, श्री व सौ. कंटक, श्री व सौ. शशिकांत बोजवारे, श्री. पुरंदरे व मठाचे सर्व पदाधिकारी यांनी दोन दिवसांच्या कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले होते. सायंकाळी उपासनेचा कार्यक्रम झाला. श्रीमती तांबवेकर यांच्या घरी पादुकांचे पूजन झाले. दि. ५ मे रोजी थोर समर्थ भक्त श्री. व सौ. हेटे यांचे हस्ते सर्व संतांच्या पादुकांना महाअभिषेक झाला. सकाळी ९ वाजता मिरवणुकीने समर्थ, साईबाबा व स्वामी समर्थांच्या पादुका कार्यक्रमस्थळी पोहोचल्या भव्य अशा मंडपामध्ये दिवसभर भजन गायन आणि उपासनेने संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते. आध्यात्मिक सामाजिक राजकीय तसेच संगीतक्षेत्रातील अनेक मान्यवरांनी सर्व पादुकांचे दर्शनाचा व कार्यक्रमाचा आनंद घेतला.

सुप्रसिध्द गायक श्री. अजित कडकडे यांनीही पादुकांचे दर्शन घेऊन एक अभंग गायन केले. त्यांना समर्थ वंशज श्री. बाळासाहेब स्वामी यांचे हस्ते प्रसाद देण्यात आला. या कार्यक्रमात समर्थ वंशज संस्थानचे मुख्य विश्वस्त श्री. बाळासाहेब स्वामी, संस्थानचे व्यवस्थापक स.भ. मोहनबुवा रामदासी व सज्जनगडावरील रामदासी सहभागी झाले होते. हा एक दिवसीय संत पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम उत्तमप्रकारे पार पडला. श्री. महेशराव ल्हासे हेही सहभागी होते. श्री. हेटेसाहेबांचे या कार्यक्रमास संपूर्ण सहकार्य व सहभाग लाभला.

# जुना दासबोध-निराभिमान शांति (लेखांक १० वा)

**सौ. मंजिरी श. धूपकर, पुणे.** मो. ९९२३०४५५५४

**शांति म्हणों नये सुलभ। अरे हे ब्रह्मादिकांसि दुर्लभ।**
**शांतिसारिखा लाभ। आणिक कांहींच नाही ।।२९ ।।**

माणसाला जगण्यासाठी श्वासोच्छवासाची जशी गरज आहे तशीच मानसिक शांतीचीही आहे. पण ती मात्र कोणालाही मिळत नाही; अगदी अपवादानेसुद्धा. मानसिक शांती दुर्मिळ आहे. लोककल्याणाचाच विचार करणाऱ्या श्रीसमर्थांनी अत्यंत महत्त्वाचा असा निराभिमान शांती समास लिहिला आहे. एक तरी ओवी अनुभवावी किंबहुना एकेक ओवी अनुभवावी असे म्हणणे श्रीसमर्थांच्या बाबतीत जास्त श्रेयस्कर आहे. दासबोध ग्रंथ, अगदी त्याच्या प्रथम रूपापासून (जुना दासबोध यशस्वी जीवनव्यवहार शिकविणारा ग्रंथ आहे. त्यातली प्रत्येक ओवी महत्त्वाची आहे.

निराभिमान शांती समासात श्रीसमर्थ प्रथम सद्‌गुरूंना वंदन करताना म्हणतात, श्रीरामाने-सद्‌गुरूने मला आपले केले. रामदास नाव देऊन स्वतःशी अद्वैत केले. कर्ता-अकर्ता रामरायाच झाला म्हणून रामदासांचे मीपण सहजीच संपले. रामदासांनी ग्रंथ लिहावयास घेतला; पण राम करविता अशी त्यांची श्रद्धा आहे.

**आतां कर्ता अकर्ता रामदास। इच्छा उद्‌भवली**
**तयास। नांव दिधलें ग्रंथास। आपण**
**नामरूपावेगळा ।।३३।।**

ग्रंथामध्ये रघुनाथाची स्तुती करताना श्रीसमर्थ म्हणतात श्रुतीसुद्धा परब्रह्माची स्तुती पूर्ण करू शकल्या नाहीत. तेथे आपली मर्यादा ती किती! लहान मुले जसे गारगोट्या मांडून देव म्हणून त्यांची अजाणतेपणे पूजा करतात किंवा आपल्या घरातील भांड्यामध्ये आपण सूर्य साठविला आहे म्हणून आनंदतात किंवा एखादा वेडा आपण मुठीत आकाश धरून ठेवलेले आहे ह्या भावनेने खुष होतो; तसेच आपलेही परब्रह्माची स्तुती करताना झाले आहे असे श्रीसमर्थांना वाटते. आपण परमेश्वराची स्तुती करण्याचा आटापिटा करतो पण विश्व व्यापून असणाऱ्या त्या स्वरूपाचे किती आणि कसे वर्णन आपण करू शकणार. जसे द्रोणागिरी पर्वतावर औषधी वनस्पती आणण्यासाठी मारूतीराया गेले आणि तेथे सगळीकडे औषधी वनस्पती पाहून त्यातले काय घ्यावे हे त्यांना कळेना; तसेच आपले परब्रह्माचे वर्णन करताना झाले आहे. परमात्मा म्हणजे काय ह्याचा किती विचार करावा, जो सर्व व्यापून आहे आणि निराकार, अमूर्त आहे. त्याचे तरी वर्णन करता येईल का ? गडद अंधाराचे वर्णन आकाशाच्या मर्यादेपुढे करता येत नाही. आपल्या दृष्टीची आणि कल्पनेची कुवत तेवढीच असते असे सांगून श्रीसमर्थ म्हणतात, परमेश्वराबद्दलच्या आपल्या मर्यादित ज्ञानात किंवा अज्ञानात आपण सुख घ्यावे. परमात्म्याचे वर्णन करायला कोणतीच उपमा पुरेशी नाही. काही तर्क केला तरी स्वतःला नीट उमजत नाही आणि उमजला तरी शब्दात मांडता येत नाही. असे हे स्वरूपाचे वर्णन अपार आहे. एवढे वर्णन सांगण्याचा मी प्रयत्न केला पण हे बोलणे योग्य नाही हे जाणवते. कारण हे वर्णन पूर्णपणे खरे नाही. माझे बोलणे प्रमाण मानावे असा मी कोणी जाणकारही नाही. ब्रह्माच्या ज्ञानाचे वेड मला लागले आहे; म्हणून त्याबद्दल जमेल ते व तसे बोलतो. मला ज्ञान मिळविण्याचे वेड आहे हे खरे पण मला योग्य ज्ञान मिळालेले नाही. आपल्याला यथार्थ ज्ञान झाले नाही तरी न बोलताही राहवत नाही. जो जसा काही आपला अनुभव आहे तो व्यक्त केल्याशिवाय मला राहवत नाही. असे वर्णन करताना स्वतःबद्दल मी खूप बोलतो. म्हणजे मला स्वतःचा अभिमान आहे; त्या अभिमानाने मीपणा जेवढा बाळगतो

त्यामुळे इतर विचार मी करू शकत नाहीच. मी माझ्यातच सदैव हरवलेला असतो. ह्या सामान्य माणसाच्या ह्या सामान्य वृत्तीचा आरोप स्वतःवर करीत श्रीसमर्थ सामान्य माणसाच्या मीपणात दंग होण्याबद्दल सांगतात.

**मी मी बोलणें हाचि अभिमान। सदा सर्वदा मीपणीं मग्न। तें मीपण असतां संलग्न। सर्वही बाधी।।१८।।**

गुरूंचे हे बोलणे ऐकून शिष्याने त्यांना विनंती केली, मीपणा टाकून द्यायचा आहे. स्वतःबद्दल नाहीच बोलायचे. पण मग मनात अनेक शंका गर्दी करतात. मनाला देहबुद्धीने ग्रासून टाकले आहे. ह्यातून मुक्त होण्यासाठी काय करावे हे आपण मला सांगावे. शिष्याच्या ह्या प्रश्नाने गुरूंना समाधान वाटले. शिष्याची शंका दूर करावी, देहबुद्धीतून बाहेर पडण्याचा उपाय शिष्याला सांगावा आणि शिष्याने तो तत्काळ अंमलात आणावा ह्यासाठी गुरू अधीर झाले आहेत.

गुरू शिष्याला सांगतात, तुझ्या शंकांचे निरसन करतो ते लक्षपूर्वक ऐक आणि थोडाही वेळ वाया न दवडता उपदेशाचे अनुसरण तू कर. तू तसे करू शकतोस; नव्हे तुझ्यात ते सामर्थ्य आहे.

**अरे तू भवार्थाचा मेरू। प्रेमळ शांतीचा सागरू। यथार्थ सर्वस्वें उदारू। जळधरासारिखा।।२२।।**

शिष्य श्रेष्ठ भक्त, असीम प्रेमळ आणि उदार मेघासारखा आहे. गुरू त्याला मागणे मागतात. गुरू हे केवळ लोक कल्याणकारी असतात. त्यांना स्वतःसाठी काही नको असते आणि ते मागतही नाहीत. तरीही ते शिष्याला काही मागतात ह्याचा अर्थ ते शिष्याच्या कल्याणार्थ असते हे निश्चित. येथेही गुरू म्हणतात मी काय मागतो ते नीट लक्ष देऊन एक आणि मला ते देताना थोडाही कंजूषपणा करू नकोस. माझे मागणे हे आहे की तू श्रवणभक्तीमध्ये मन एकाग्र कर. तसे केले नाहीस तर, तुझे मन भरकटले, विचलित झाले तर तुझा पैसा जाईल; तो पुन्हा तुला मिळणार नाही. तन्मयतेने श्रवण कर आणि तसे आचरण कर. मनाला उगीच सैरभैर होऊ देऊ नकोस. श्रवणभक्तीने मन शांत करावे आणि ते करता येते.

**श्रवणाविषयीं आळस नसावा। बहु बोलणियाचा वीट न मानावा। यावा क्रोधाचा आवरावा। विवेकबळें करूनी।।२६।।**

श्रीसमर्थ शिष्याला उपदेशावर श्रद्धा ठेवण्यास सांगतात. ते शिष्याला म्हणतात, अवांतर वाईट विचार, क्रोध ह्यांच्यावर संयम ठेव. मन शांत ठेवायचा प्रयत्न कर. मन शांत ठेवणे हे अवघड आहे. पण प्रयत्नाने त्यात यश मिळाले म्हणजे मनाच्या शांतीसारखे श्रेष्ठ सुख नाही.

मनाला शांती मिळविताना आणि ठेवताना येणाऱ्या अडचणींची जाणीवही गुरू करून देतात. शांत माणसाला लहानमोठे सर्वजचण गृहीत धरतात. त्याचा अकारण अपमान करतात. काहीही आणि कसेही बोलण्याच्या आपल्या इच्छा शांत माणसावर ते पूर्ण करतात. कारण त्यांना प्रतिकाराची भीती नसते.. इतकेच नव्हे तर त्यांच्या अनाठायी आक्रमक वागण्यावरही शांतच राहिल्यावर ते म्हणतात, कितीही बोला आणि कसेही वागा ह्याला राग येतच नाही. आपण व्यर्थ ठरतो. मग ते स्वतःच वैतागतात आणि बेशरम, दांभिक अशी विशेषणे वापरून शांततेची टिंगल करतात. तरीही आपली शांती भंग पावू देऊ नये असे गुरू शिष्याला सांगतात. परिस्थितीची प्रतिक्रिया म्हणून राग येतो आणि तो गिळावा असे गुरू सांगत नाहीत तर राग मनात उमटू द्यायचा नाही; मन शांत ठेवायचे असा उपदेश ते करतात.

**आतां कुतर्काचें लक्षण। तें तूं जाण आधार घेणें। सकळ ईश्वरअर्पणें। मन हें आवरावें।।३३।।**

मनाची शांतता राखायची, तेथे कोणतेही विकल्प येऊ द्यायचे नाहीत ह्यासाठी मनालाच ईश्वरस्थान द्यायचे. ह्या मनाची सत्ता आपल्यावर चालते म्हरजे ती ईश्वरसत्ता आहे आणि यथायोग्यच असणार; अशी संदेहरहितबुद्धी होते आणि मनाला शांतता मिळते. गुरूंनी केलेला ह्या उपदेश आचरणात नाही आणला तर मन स्वैर होऊन दुःख भोगावे लागते.

गुरूपदेश मनात बिंबतो तेव्हा स्वस्वरूपाची जाणीव होते. ईश्वराचा आपण अंश आहोत असा प्रत्यय स्वतःशी

येतो. तेव्हा जाणवते, ईश्वर सुख आणि दुःख देतो आणि स्वतः नामानिराळा राहतो तसे परिस्थितीपासून मनाला दूर ठेवले पाहिजे. कर्ता करविता ईश्वर आहे ही खुणगाठ पक्की झाल्यावर मनाला अलिप्तता येऊ शकते. आयुष्यातल्या कोणत्याही संकटाचे दुःख करणे ह्यापासून परावृत्तता येते. आयुष्य ही सुखदुःखाची वीण आहे असा विवेक होण्यासाठी ईश्वरसाधना करावी. ही साधना अंतर्यामी झाली पाहिजे. तसे झाले नाही तर साधना वरवरची ठरते आणि सर्व भार ईश्वरावर टाकून नरकातही सुख मानावे लागते. असे करणे म्हणजे आत्मघात आहे. आपल्या स्वैर मनाकडे डोळेझाक करणे आहे. श्रीसमर्थ शिष्याला म्हणतात तू असा अविवेकीपणा करू नकोस. साधनेचा आळशीपणा करू नकोस.

मनाची शांतता म्हणजे आयुष्याचे सार्थक होय. ह्यासाठीची साधना म्हणजे मनापासून केलेले श्रवण होय. श्रवण म्हणजे फक्त ऐकणे नव्हे तर श्रवणेंद्रियाच्या माध्यमातून ज्ञानार्जन करणे. वाचणे, पाहणे, ऐकणे, चर्चा करणे यातून मिळालेले ज्ञान म्हणजे श्रवणच होय. ज्ञानार्जनाला सदैव सिद्ध असण्याचा उपदेश गुरू शिष्याला करतात. सत्पुरुषाचा उपदेश श्रद्धेने ग्रहण करावा. ह्यासाठी तीन प्रकारचा अभिमान वर्ज्य करावा. एक आपणच सर्वज्ञ आहोत. दोन संतांना अनन्यभावाने शरण जाताना अभिमान धरू नये आणि तीन आपण परिपूर्ण आहोत; इतर कोणाच्या उपदेशाची आवश्यकता नाही. मुळात आपल्याला ज्ञान आहे असे वाटणे हा स्वतःबद्दलचा गैरसमज आहे. ज्ञानाची अनंतता न समजणे हे अज्ञान आहे. आपला भक्तीमार्ग, संप्रदाय ह्यांचे ज्ञान आपल्याला आहे हे अज्ञान आहे आणि त्यावर पुन्हा आपलाच भक्तीमार्ग खरा, चांगला आहे; इतरांचे दुय्यम आहेत असा आपल्या कीर्तीचा वृथा अभिमान, समाधानाची राखरांगोळी करतो. अशा प्रकारचा खोटा अभिमान असमाधानाला कारण ठरतो आणि असमाधानामुळेच जन्ममृत्युचक्र चालू राहते.अभिमान धरणे मूर्खपणाचे आहे. ज्ञानार्जनाची हाव असली आणि मनाची संकुचित वृत्ती नष्ट करते. मग तेथे अभिमानाला थारा राहत नाही. श्रेष्ठ-कनिष्ठ, तुझे-माझे ही मनोवृत्ती संपुष्टात येते आणि मनामध्ये शांती नांदते.


**राम आणि रामदास। भजन भाव आणि विश्वास।**
**ज्ञान वैराग्य आणि उदास। इतुकेहि संपले तेथे ।।५५।।**

शांत समाधानी मन म्हणजे साक्षात ईश्वर आहे. अशा मनाचा आनंद शब्दात व्यक्त करता येत नाही. हा अनुभव असतो तो अनुभवायचा असतो. तरीही हा आनंद कसा मिळवायचा आणि त्यातले सुख सांगण्याचा आपण बराच प्रयत्न केला असे श्रीसमर्थ म्हणतात. हे आपले सांगणे अंतर्यामीचे अंतर्यामीच आणि अंतर्यामीसाठी होते हे समाधान श्रीसमर्थ व्यक्त करतात. निरभिमानी स्वानंदसुख म्हणूनच श्रीसमर्थांना मिळाले. असा अनुभव घेण्याचा प्रयत्न सर्वांनी करावा ही श्रीसमर्थांची तळमळ आहे.

**इति श्रीरामदास। विनवी आपण आपणियास।**
**पुढे होऊनि सावकाश। श्रवणीं सादर असावें।।६०।।**

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

## सुजन वाक्य



**वाच्यंश्रध्दासमेतस्य पृच्छतश्च विशेषतः।**
**प्रोक्तं श्रध्दाविहीनस्यारण्यरुदितोपमम् ।।**

▶ ऐकणाऱ्याची श्रध्दा- विश्वास असेल तरच आणि विशेषतः विचारल्यावरच सांगावे. श्रध्दाहीन माणसाला कितीही चांगले सांगितले तरी ते निर्जन अरण्यात रडल्याप्रमाणे निष्फळ ठरते.

## मासिक 'रघुवीर समर्थ' वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| रु. १५० | एक वर्षासाठी |
| रु. ५०० | चार वर्षांसाठी |
| रु. १००० | आठ वर्षांसाठी |

# नमस्कार माझा सद्गुरू रामदासा (लेखांक ८ वा)

**सौ. संध्या अशोक कोल्हटकर, कोथरुड, पुणे.** मो. ९८५००४३२७३

**बळीं आत्मनीवेदनीं पूर्ण झाला।**
**विदेहीपणें दास तैसा मिळाला।**
**म्हणें उध्दवसूत वर्णू मी कैसा।**
**नमस्कार माझा सद्गुरु रामदासा ॥८॥**

नवविधा भक्तीचा व भागवत कथांचा उत्तम संगम करून उद्धवसूतांनी हे ''सद्गुरूस्तवन'' केले आहे. त्यातील हा शेवटचा श्लोक आहे. यात त्यांनी ''बळी''चे आत्मनिवेदन कथन केले आहे.

अमरावती जिल्ह्यातील सुर्जी अंजनगांव नावाचे गाव आहे. तिथे त्रिंबकपंत नावाचा ब्राह्मण राहत होता. त्याला मल्हारी नावाचा मुलगा होता. विवाहानंतर मल्हारीस वैराग्य आले व त्यांनी प्रपंचाचा त्याग केला. तो तीर्थयात्रेला गेला. नगर घोडेगाव येथे रामनवमी निमित्त समर्थ आपल्या शिष्यासह भिक्षा मागत असता तो त्यांच्यात सामील झाला,''आपण एकटेच आहोत आपणास कोणीही नाही तरी आपण मला अनुग्रह करावा'' असे त्यांनी समर्थांना सांगितले. त्यावर समर्थानी त्याला अनुग्रह दिला. मल्हारी समर्थ संप्रदायात रमून गेला. इकडे मल्हारीचे आईवडील मल्हारीला शोधत होते. समर्थांची किर्ती ऐकून ते दोघे तिथे आले व त्यांनी मल्हारीला पाहिले. मल्हारीने सर्व सत्य वृत्त समर्थांना सांगितले. तो खोटे बोलला म्हणून समर्थ त्याला रागावले व म्हणाले,''किमान एक मुलगा होईपर्यंत तू संसार कर.'' म्हणून मल्हारीने पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारला व संसार करायला सुरूवात केली. त्याला एक मुलगा झाला त्याचे नाव ''उद्धव'' असे ठेवले. मल्हारीने पुन्हा संन्यास घेऊन नंतर काशीस देह ठेवला. उद्धवाने गृहस्थाश्रम स्विकारला होता. त्याला एक मुलगा झाला. त्याचे नाव ''लक्ष्मण' होते. लक्ष्मण अतिशय प्रतिभासंपन्न कवी होते. त्यांनी समर्थांचे चरित्र लिहिले आहे. त्यांनी ''उद्धवसूत'' हे टोपणनाव धारण केले होते. ''समर्था मला पूर्ण वैराग्य द्यावे'' हे काव्यही उद्धवसूतांचे आहे. समर्थांचे श्रवण परिक्षीतीसारखे, कीर्तन नारदासारखे, नामस्मरण प्रल्हादासारखे, दास्य हनुमंतासारखे, सख्य अर्जुनासारखे व आत्मनिवेदन 'बळी' सारखे होते असे ते या काव्यात सांगतात यावरून त्यांची समर्थांवरील निष्ठा दिसून येते. (संदर्भ- चिंता करीतो विश्वाची, स.भ. सुनिलजी चिंचोळकर)

बळीची उत्पत्ती भगवान विष्णूंच्या अंगुष्ठापासून झालेली असल्यामुळे त्याला श्रीविष्णूंची अर्धकला म्हणतात. बळी हा प्रल्हादाचा नातू व विरोचनाचा मुलगा होता. भगवान विष्णू मोहिनीरूपात असताना विरोचनाबरोबर जलक्रिडा करायला गेले होते. जलाशयात उतरण्यापूर्वी मुकुट काढून ठेवावा या मोहिनीच्या आग्रहामुळे त्याने मुकुट उतरवला व विरोचनला मृत्यु आला. मोहिनीरूपात पोटी विरोचनाचा अंश वाढत आहे हे नारदांनी भगवान विष्णूंच्या लक्षात आणून दिले त्यावेळी त्यांनी तो गर्भ आपल्या अंगठ्यातून बाहेर टाकला तोच ''बळी'' होय असा कथाभाग आहे.

दैत्य कुळात असला तरी बळीराजा वैष्णव असून पराक्रमी होता. महादेवाला प्रसन्न करून त्याने ''मी रणात सर्वांना जिंकावे व मला यमपुरीचे दर्शन होऊ नये'' असा आशिर्वाद मिळवला. त्याने अमरावतीचा अक्षयलाभ होण्यासाठी शंभर यज्ञ करण्याचे ठरविले. भृगुवंशीय ब्राह्मणांनी त्याला अनेक प्रकारच्या शक्तीचे दान दिले होते त्यामुळे तो बलाढ्य झाला होता. बळी अश्वमेध करत होता. तिथे अदिती व कश्यप यांचा पुत्र 'वामन' यांनी जायचे ठरविले. ब्रह्मर्षींच्या सभेत बटुवामनाचे स्वागत झाले. तिथे तो बटु आपल्या ज्ञानाने उठून दिसत होता.

बळीने त्याचा यथोचित सत्कार केला, वामनाचे बुध्दिसामर्थ्य पाहून बळीराजा खुश झाला व त्याने बटुला, ''तुझी इच्छा असेल ते माग मी अवश्य देईन.'' असा शब्द दिला. बटु वामन म्हणजे भगवान विष्णूंचा अवतार होता. वामनाने तीन पावले जमीन मागितली. आचार्य शुक्राचार्यांच्या लक्षांत आले की हा कपट प्रकार आहे ! त्यांनी बळीला थांबविण्याचा खूप प्रयत्न केला, पण बळीने संकल्प सोडलाच ! बळी सत्यवचनी दानी होता. बलीष्ठ होता.

वामनाने आपले ''विराट रुप'' धारण केले. त्या विराटाचे पाय पाताळांत तर मस्तक एकवीस स्वर्गमंडळे व्यापून होते. बळीने भगवान विष्णूंच्या विराटरुपात सर्व चराचर समावलेले पाहिले. हे रुप पाहून बळीला खूप आनंद झाला. वामनाने दोन चरणांत त्रैलोक्य व्यापले व तिसरे पाऊल कुठे ठेवूं ? असे विचारताच बळीने आपले मस्तक त्याच्या पुढे केले. नतमस्तक होऊन त्याने, ''मला आपल्या ब्रह्मऋणांतून मुक्त करा असे सांगितले. भगवंतासमोर पूर्ण शरणागत भावाने बळीने आत्मसमर्पण केले होते. प्रल्हादाने नामस्मरणभक्तीने तर विरोचनाने विरोध भक्तीने भगवंताला आपलेसे केले होते. तर बळीने आत्मनिवेदनाने भगवंताला प्रसन्न केले होते.

भगवंताने त्याच्या मस्तकावर पाय देऊन त्याला खाली ढकलले असे म्हणण्यापेक्षा भगवंताने त्याच्या मस्तकाला आपला चरणस्पर्श करुन त्याचा उध्दारच केला होता. बळीने भगवंताची स्तुती केली. त्याला सर्वसमर्पण केले. भगवंत ज्याच्यावर कृपा करतो, त्याचे सर्वस्व हिरावून घेतो व त्याची मायापाशातून सुटका करतो लौकिक दृष्ट्या भगवंतानी बळीच्या कुळाचा (हिरण्यकशिपू-विरोचन)) यांचा नाश केला होता. आत्म्याला मोहित करणाऱ्या राजलक्ष्मीला त्यांनी हिरावून घेतले होते. आणि मोहमायेतून बळीची सुटका केली होती.

ब्रह्मदेवानी बळीच्या अनन्यतेची व समर्पणाची प्रशंसाच केली. बळीला पक्षीराज गरुडाने वरुणपाशांनी बांधून टाकले होते. ते पाहून ब्रह्मदेव म्हणाले,''प्रभो, अंतःकरणपूर्वक श्रध्देने भगवंताला पत्र, पुष्प, फळ वाहतो. त्याला तुम्ही सर्व बंधनातून मोकळे करता. इथे बळीने तुम्हांला त्रिलोकीचे राज्य स्थिर चित्ताने श्रध्दापूर्वक दिले आहे. तरी तो बंधनात कसा ?''

भगवंत प्रसन्न चित्ताने हसत होते. कारण हे बळीचे बंधन नसून, त्याच्या आत्मनिवेदन भक्तीमुळे प्रसन्न होऊन भगवंतच त्याच्या बंधनात अडकले होते. व द्वारपाल म्हणून राहण्याचे कबूल केले होते. बळीने सर्वस्व देऊन भगवंताला आपलेसे केले होते म्हणून भगवंताने बळीला त्याच्या आजोबा प्रल्हादासह स्वर्गापेक्षा श्रेष्ठ अशा ''सुतला''चे राज्य देऊन स्वतः त्याचे द्वारपाल व रक्षक बनले होते. त्याची वरुण पाशातून सुटका केली होती. बळीची आत्मनिवेदन भक्ती श्रेष्ठ समजली जाते. समर्थ रामदास म्हणतात.

**ऐका निवेदनाचे लक्षण । देवासि वाहावे आपण ।**
**करावे तत्व विवरण । म्हणिजे कळे ।।४-९-३।।**

आत्म म्हणजे ''स्वतः'' किंवा ''मी'' आणि निवेदन म्हणजे अर्पण करणे. स्वाधीन करणे. स्वतःला पूर्णपणे भगवंताच्या स्वाधीन करणे म्हणजे आत्मनिवेदन करणे या आत्मनिवेदनांत जे द्यायचे ते प्रेमपूर्वक द्यायचे, दिल्यानंतर त्यावर ममत्व आसक्ति ठेवायची नाही हे लक्षांत घ्यावे लागते. तसेच ''मी'' कशाचा बनलेलो आहे ''यांतील माझे काहीच नाही'' ''मी'' म्हणजे नक्की कोण ? हे जाणणे आपले स्व-स्वरुप जाणणे व ते भगवंताशी एकरुप होणे म्हणजे आत्मनिवेदन !

समर्थ,''पहावे आपणासी आपण या नांव ज्ञान ।'' असेही म्हणतात हे स्वतःला पाहणे म्हणजे आपणच आपल्याला विदेहस्थितीत भेटणे होय.

**कदा वोळखीमाजि दूजें दिसेना ।**
**मनी मानसी द्वैत कांही वसेना ।**
**बहुता दिसां आपुली भेटि जाली ।**
**विदेहीपणें सर्व काया निवाली ।।२०१।।** म. श्लोक

देहबुध्दी नसल्यामुळे मनाचे कार्य संपते. द्वैत नेहमी मनांत, अंतःकरणांत निर्माण होते. द्वैत नसल्यामुळे

संकल्प, विकल्प राहात नाहीत. शुध्द ज्ञान होते, तेव्हा देह इंद्रिये, मन, बुध्दी, पूर्ण शांत झालेले असतात ''काया निवाली'' म्हणजे चत्वार देहाचा निरास होणे, त्रिविध ताप संपणे. स्वतःचीच स्वस्वरुपाशी भेट होणे होय. म्हणजेच विदेहस्थिती प्राप्त होणे. ही ज्ञानाची श्रेष्ठ अवस्था आहे. देहामध्ये राहुनी विदेही असणे ही उन्मनी अवस्था आहे. देहाचे व्यवहार चालू असतात पण चैतन्याची, परब्रह्मांची प्रचिती आल्यामुळे तो साधन तर करत असतोच पण ते करतांना ,''मी देह नसूनआत्मा आहे'' ही त्यांची भूमिका ठाम असते त्यामुळे साधनेचा कर्तेपणा त्याला चिकटत नाही. ''मी करुनि अकर्ता'' किंवा ''रामकर्ता'' ही भावना दृढ असते. मनाच्या श्लोकांतील वरील श्लोक समर्थांनी अनुभवसिध्द करुन दाखविला आहे. म्हणूनच उध्दवसुत (लक्ष्मण) आपल्या सद्‌गुरुबद्दल ''विदेहीपणे दास तैसा मिळाला।'' असे म्हणतात.

बध्दमुक्त हे बंधन है द्वैत, मायेमुळे निर्माण होते. कल्पनेने निर्माण होते. हे दोन्ही वृत्तींचे तरंग असतात इथे काया निवाली किंवा विदेह स्थिती प्राप्त झाली. त्यामुळे वृत्तीही नाही व तरंगही नाही. पूर्णपणे आत्मनिवेदन आहे. नदी समुद्राला मिळाल्यावर जशी वेगळी करता येत नाही तसेच आहे.

समर्थांच्याच शब्दांत सांगायचे झाले तर

**ऐसा रामें रामदास चेवविला ।**
**आपे आपणियातें विसरोन ठेला ।**
**तेथे जागृती ना स्वप्न सुषुप्ती ना तुर्या ।**
**भवभाव वाव जाला ।**
**तेथे वृत्ती ना निवृत्ती मन ना उन्मन ।**
**आठव विसर हारपला ।**
**तेथे देही न विदेही जनीं ना विजनी ।**
**सहजीं सहज स्थिरावला रे रे ।।**

सिध्द बाहेरुन साधकासारखा दिसतो पण अंतर्यामी तो पूर्ण स्वरुपाकार असतो. आत्मानंदात मग्न असतो. विदेह अवस्था प्राप्त झाली की सिध्द पुरुष निःसंदेहपणे जगाच्या कल्याणासाठी झटत राहतो. समर्थ असेच होते. म्हणूनच ते लोककल्याणाचे कार्य धर्म संस्थापनेचे कार्य करत होते. लोकांतात राहुन एकांतसेवन करु शकत होते. जनी असोन आपण । जनावेगळा ।। हा अनुभव घेत होते.

''अशा विदेह स्थिती प्राप्त झालेल्या सद्‌गुरुचे वर्णन मी काय करणार ? परब्रह्माचे वर्णन करता येते कां ? आतापर्यंतच्या सद्‌गुरु स्तवनांत मी त्यांना अनेक उपमा देण्याचा प्रयत्न केला पण तरीही माझी वाणी या सद्‌गुरुचे वर्णन परिपूर्णतेने करु शकत नाही. म्हणून मी त्यांना फक्त नमस्कार करुन त्याचे चरणी नतमस्तक होतो, असे उध्दवसूत म्हणतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

यालेखाबरोबरच 'नमस्कार माझा सद्‌गुरु रामदासा' या नमनाष्टकातील प्रत्येक श्लोकावर प्रसिध्द होणारी लेखमाला संपूर्ण होत आहे.


## 'रघुवीर समर्थ' मासिक
## जिल्हा व तालुका प्रतिनिधी

**जानेवारी २०१३ पासुन मासिकाच्या प्रतिनिधींची रचना लावण्याचे कार्य सुरू आहे. आतापर्यंत महाराष्ट्रातील २० जिल्हे व ३५ तालुक्यांमध्ये 'रघुवीर समर्थ' मासिकासंबंधी सेवा करणारे व अधिकाधिक सभासद करून घेणारे सेवाभावी प्रतिनिधी कार्य करीत आहेत.**

**प्रतिनिधी म्हणून सेवा करू इच्छिणाऱ्या कोकण व विदर्भ विभागातील समर्थ भक्तांनी संपर्क साधावा.**

**संपर्क - स. भ. मंदारबुवा रामदासी, ९७६३२७१४०७**

## सुजन वाक्य



**आरोग्यं विद्वत्ता सज्जनमैत्री महाकुले जन्म ।**
**स्वाधीनता च पुंसां महदैश्वर्यं विनाप्यर्थैः ।।**

▶ आरोग्य, विद्वत्ता, सज्जनांशी मैत्री असणं, मोठ्या खानदानी घरात जन्म, स्वतंत्रता म्हणजे माणसाला द्रव्याशिवाय मिळालेली अफाट श्रीमंतीच होय.

# विविध कार्यक्रम वृत्ते

## समर्थांच्या विचारांची आणि शिस्तीची आज गरज

**स्वामी गोविंददेव गिरी (आचार्य किशोरजी व्यास)**

### 'श्री समर्थशिष्य कल्याण' पुस्तकाच्या द्वितीयावृत्तीचे प्रकाशन

पुणे दि. ७ मे – 'समर्थ रामदासांनी केवळ जप आणि पाठ केले नाहीत, तर राष्ट्र जागृतीचे काम केले. त्यांच्या विचारांची, शिस्तीची आणि कार्याची आज खऱ्या अर्थाने गरज आहे,' असे मत स्वामी गोविंददेव गिरी (आचार्य किशोरजी व्यास) यांनी येथे व्यक्त केले.

समर्थ रामदास स्वामींचे शिष्य कल्याण स्वामी यांच्या ३०० व्या पुण्यतिथीनिमित्त मोरया प्रकाशनातर्फे काढण्यात आलेल्या 'श्री समर्थशिष्य कल्याण' पुस्तकाच्या द्वितीयावृत्तीचे प्रकाशन बाल शिक्षण मंदिर सभागृहामध्ये स्वामी गोविंददेव गिरी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. समर्थभक्त सुनिल चिंचोलकर, श्री रामदासस्वामी संस्थान सज्जनगड संस्थेचे अधिकारी स्वामी श्री. भूषण स्वामी, श्री रामदास स्वामी संस्थानचे विश्वस्त विजय ठोंबरे, मोरया प्रकाशनाचे दिलीप महाजन, श्री उद्धव रामदासी मठ, टाकळी संस्थेचे विश्वस्त ॲड. दिलीप कैंचे, श्री समर्थ मंदिर, जांब संस्थेचे अध्यक्ष डॉ.भारत कुलकर्णी, डोमगावचे मठपती श्री आप्पासाहेब जहागिरदार आणि रामदास स्वामी संस्थान सज्जनगडचे प्रमुख विश्वस्त श्री बाळासाहेब स्वामी, समर्थ वाग्देवता मंदिर धुळेचे अध्यक्ष शामराव जोशी, रामदासी संप्रदायातील अनेक मठाधिपती आणि समर्थ संस्थांचे प्रतिनिधी व समर्थभक्त यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. गौरी देव यांनी केले.

गणेश शंकर देव यांनी १९४५ साली संपादीत केलेल्या 'श्री समर्थशिष्य कल्याण' या ग्रंथाचे धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिरातर्फे प्रकाशन करण्यात आले होते. ६८ वर्षांनंतर या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन आज करण्यात आले. स्वामी गोविंददेव गिरी पुढे म्हणाले की, समर्थांनी आपले तेज कल्याण स्वामींमध्ये संक्रमित केले, त्याच तेजाची आज राष्ट्राला गरज आहे. गुरूनेच शिष्याची निवड करण्याची फारच थोडी उदाहरणे इतिहासामध्ये आहेत. रामाने हनुमानाची आणि श्रीकृष्णाने अर्जुनाची निवड केली होती तशीच समर्थांनी कल्याण स्वामींची निवड केली. कल्याण स्वामी म्हणजे गुरूभक्तीचे मूर्तीमंत उदाहरण आहे. यावेळी बोलताना चिंचोलकर म्हणाले, ''कल्याण स्वामी यांनी लिहिलेल्या समर्थांच्या आरतीमध्ये 'नृप शिवाजी तारिला' असा छत्रपती शिवाजी महाराज आणि रामदास यांच्या भेटीचा उल्लेख असून, त्याचा पुरावा म्हणून इतिहासामध्ये उल्लेख व्हायला हवा.''

श्री. भूषण स्वामी म्हणाले की, कल्याण स्वामींनीच समर्थांचा सर्व ठेवा जपला आणि त्यांच्यामुळेच आज आपण समर्थांचे निर्गुण रूप पाहू शकतो.

ऋग्वेदस्मार्त चूडामणी अरूण वझे आणि ब्रह्मवृंदाने केलेल्या वेद मंत्रांच्या घोषामध्ये पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी आदिती आणि अद्वैत केसकर या बालगायकांनी समर्थ गीते सादर केली. दिलीप महाजन यांनी प्रास्ताविक केले तर शरद कुबेर यांनी प्रमुख मान्यवरांचा परिचय करून दिला. विजय ठोंबरे यांनी व्यासपीठावरील प्रमुख मान्यवरांचा सत्कार केला तर सत्कार्योत्तेजक सभा धुळ्याचे कार्यवाह प्रा.नकाणेकर यांनी आभार मानले. स्वामी गोविंददेव गिरी यांचा लवकरच हरिद्वार येथे महामंडलेश्वर स्वामी असा पट्टाभिषेक संपन्न होणार असून, त्यानिमित्ताने श्री समर्थ संप्रदायातर्फे त्यांचा भूषण स्वामी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्री रामदास स्वामी संस्थानचे विश्वस्त विजय ठोंबरे यांनी या कार्यक्रमाचे नियोजन व प्रसिद्धीसाठी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

## भडगाव, (ता. गडहिंग्लज)


सालाबादप्रमाणे याही वर्षी श्रीसमर्थ सेवा ट्रस्ट, समर्थनगर, भडगांव यांच्या विद्यमाने निवासी बालसंस्कार शिबिर दि. २५/४/१३ ते १/५/१३ या कालावधीमध्ये व्यवस्थितरित्या पार पडले.

शिबिराचे उद्‍घाटन दि. २५/४/१३ रोजी संध्या. ५ वा करण्यात आले. या शिबिरासाठी विविध ठिकाणाहून एकूण ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शिबिराचा दिनक्रम पुढीलप्रमाणे होता. स. ६ वा. प्रातःस्मरण हे सत्र सौ.शिलाताई गाडगीळ यांनी शिकविले. योगासने व सूर्यनमस्कार श्री.खोत सर व आर.एस.पाटील यांनी शिकविले. सौ. शितल शिवणे यांनी गणपतीस्तोत्र शिकविले. यानंतर न्याहरी व पेयपान होत असे. यानंतर गीताध्ययन या सत्रात श्री मोरेश्वर गाडगीळ यांनी गीता १६ वा अध्याय शिकविला. स्तोत्रपठण या सत्रात सौ.रोहिणी पाटणे यांनी दारिद्र्यदुःखनाशन स्तोत्र शिकविले. पद्य या सत्रात सौ.किर्ती देशपांडे व श्री पाटकर सर यांनी मुलांना अफजलखानचा वध, बलसागर भारत होवो, ही अनादी भरतभू ही पद्ये शिकविली. दिनविशेषाच्या कथा श्री चंद्रशेखर दाणी यांनी सांगितल्या. यामध्ये त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील, स्वामी विवेकानंद, सचिन तेंडूलकर, शिवाजी महाराज, बाबा आमटे या थोर व्यक्तींविषयी कथा सांगितल्या. १२ ते २ या वेळेत भोजन व विश्रांती होती. यानंतर श्री. रामपुरे सरांनी हस्तकला शिकविले. मा.आप्पा पाटगावकर यांनी हितगुज व गटचर्चा हे सत्र घेतले. गटचर्चेसाठी मुलांना स्वच्छता व काटकसर हे विषय देण्यात आले. यानंतर चरित्र कथा या सत्रात कु. पूनम पाटील व श्री. मोरेश्वर गाडगीळ यांनी श्रीधर स्वामी, रामदास स्वामी, संत तुकाराम, संत एकनाथ, नाना फडणीस यांचे जीवनचरित्र सांगितले. यानंतर खेळ या सत्रात श्री. अभिजीत आपटे व श्री. अनिल पाटील यांनी सावधान विश्राम, बेडूक उड्या, खो-खो, कबड्डी, नेता निवडणे, सर्कल खो-खो, रनिंग असे खेळ शिकविले. सायं उपासना या सत्रात सौ.पुष्पा पाटील, सौ.शकुंतला भकरी, सौ.सुवर्णा गुरव, सौ.गीता पाटील यांनी ॐ नमःशिवाय जप, रामरक्षा, मारूती स्तोत्र, भवानी स्तोत्र, चौपदी सांगितले व प.पू.किसन महराजांनी कल्याणकरी प्रार्थना सांगितली. यानंतर श्री मोरेश्वर गाडगीळ यांनी श्री गोंदवलेकर महाराज, शिवाजी महाराजांचे किल्ले, संत तुकाराम यांच्या जीवनावर आधारित स्लाईड शो दाखविले. यानंतर रात्री ८ ते ९ या वेळेत भोजन झाले. यानंतर आनंदमेळा या सत्रात सौ. गीता पाटील, सौ. संगीता पाटील, सौ.जयश्री जाधव, सौ. अर्चना देसाई यांनी पशुपक्षी मेळावा, प्रश्नमंजुषा, नाट्यीकरण असे खेळ घेतले. यानंतर पसायदान म्हणून दीपविसर्जन होत असे.

शिबिराची सांगता १/५/१३ रोजी स.१० वा. झाली. या सांगता समारंभात उपविभागीय पोलिस अधिकारी गडहिंग्लज अशोक भरते, मा.श्री.करिगार साहेब, मा.श्री.आप्पा पाटगावकर, शिबिर प्रमुख श्री.सुभाष कोरे, शिबिर संयोजक श्री.विजयकुमार घुगरे हे उपस्थित होते. यानंतर सर्वांनी प्रसाद ग्रहण केले व प.पू. किसन महाराजांचा आशिर्वाद घेऊन सर्व मुलांनी निरोप घेतला. प.पू. किसन महाराजांच्या आशिर्वादाने व श्री.आप्पा पाटगाकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर अत्यंत उत्कृष्टरितीने पार पडले.

**सौ. संगीता सुनिल पाटील**

**सुजन वाक्य**



**शुभाशुभाभ्यां मार्गाभ्यां वहन्ति वासनासरित्।**
**पौरुषेण प्रयत्नेन योजनीया शुभे पथि ।।**

▶ शुभ आणि अशुभ दोन्ही मार्गांनी वाहु शकणारी वासनारुपी नदी माणसाने प्रयत्न करून केवळ शुभ मार्गाने वाहत राहील अशी व्यवस्था केली पाहिजे.

# विश्रामबाग सांगली येथे श्रीमद् ग्रंथराज दासबोध पारायण सोहळा संपन्न

श्री संत वेणास्वामी मिरज मठाचे मठपती श्री.कौस्तुभबुवा रामदासी व सज्जनगड संपर्क कार्यालय सांगलीचे प्रमुख श्री. माधव रामचंद्र देशपांडे यांचे मार्फत श्री रामदास स्वामी भक्त परिवार सांगली,मिरज व इतर यांचे सौजन्याने दिनांक १०/५/२०१३ ते १६/५/२०१३ पर्यंत अष्टविनायक गणपती मंदिर सरस्वती नगर, विश्रामबाग, सांगली येथे श्रीमद् ग्रंथराज दासबोध पारायण सोहळा साजरा केला.

या सोहळ्यामध्ये दि. १०/५/२०१३ रोजी सकाळी सात वाजता श्री समर्थ रामदास स्वामींच्या पादुका पालखीमध्ये ठेवून मिरवणूक काढून पादुकांचे आगमन कार्यक्रम स्थळी झाले. पादुकांच्या स्वागतास श्री.भूषण स्वामी महाराज, अध्यक्ष व अधिकारी स्वामी, श्रीरामदासस्वामी संस्थान सज्जनगड, श्री गुरूनाथ कोटणीस महाराज, अध्यक्ष समर्थ सेवा मंडळ व श्री.चंद्रशेखर केळकर महाराज आदी मान्यवर हजर होते. सकाळी नऊ वाजता श्री.भूषण स्वामी महाराज यांच्या हस्ते पादुकांचे पूजन करून पारायणाचा संकल्प केला. श्री.भूषण स्वामी महाराज यांनी आशीर्वादपर भाषण केले. यावेळी श्री गुरूनाथ कोटणीस महाराज व श्री.चंद्रशेखर केळकर महाराज यांची भाषणे झाली व पारायणास सुरुवात झाली.

दिनांक १०/५/२०१३ ते १६/५/२०१३ पर्यंत दररोज सकाळी ९ ते १२ पारायण व दुपारी ३ ते ४ नामस्मरण, दु. ४ ते ५ प्रवचन व सायं.५ ते ६ सांप्रदायिक उपासना, सायंकाळी ६.३० ते ८.३० कीर्तन इ. कार्यक्रम झाले. या पारायण कार्यक्रमात १५० वाचकांनी सहभाग घेतला. या पारायण काळात व्यासपीठ प्रमुखाचे काम श्री.जे.जी. कुलकर्णी, मिरज, श्रीमती अनुराधा मोडक, सांगली व सौ. अवंतिका जोशी, मिरज यांनी पाहिले. शेवटी दि. १६/५/२०१३ रोजी ७०० भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

प्रवचन कार्यक्रमात श्री.बाळासाहेब स्वामी महाराज समर्थ वंशज व विश्वस्त रामदास स्वामी संस्थान सज्जनगड, श्री.मंदारबुवा रामदासी संपादक, रघुवीर समर्थ मासिक, श्री.अरविंद गोसावी सांगली श्री.प्रकाशराव दामोदरे पुणे, श्री.मोहनबुवा रामदासी व्यवस्थापक रामदास स्वामी संस्थान सज्जनगड यांची प्रवचने झाली.

तसेच पारायण काळामध्ये सायं. ६.३० ते ८.३० पर्यंत श्री.भूषणस्वामी महाराज, श्री.सुरेशबुवा सोन्ना रामदासी, चाफळ, स्मितताताई पाठक बेळगांव, कुमारी रेणू रामदासी दिंडोरी नाशिक, ह.भ.प. नारायणबुवा काणे, श्री.विलासबुवा गरवारे, कुरोली सिद्धेश्वर यांची कीर्तने झाली. दि. १६/५/२०१३ रोजी सकाळी १०.०० श्री.कौस्तुभबुवा रामदासी यांचे ललीताचे कीर्तन झाले. नंतर डोमगांव मठाचे मठपतींचे प्रतिनिधी श्री.आप्पासाहेब जहागीरदार यांचे मार्गदर्शनपर भाषण होऊन कार्यक्रमाचा शेवट झाला.

सरतेशेवटी पुढील वर्षी मोठ्या प्रमाणात दासबोध पारायण करण्याचा सर्वांनी संकल्प केला.

सद्गुरु श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या निवडक ११ रचनांच्या 'रामदास म्हणे' या सी.डी. चा प्रकाशन सोहळा श्री क्षेत्र सज्जनगड येथे श्री समर्थांच्या समाधी समोर संपन्न झाला. ही सी. डी. श्री समर्थ चरणी अर्पण करण्यात आली. रामदास म्हणे या सी. डी. मध्ये श्री. राजेंद्र दिक्षीत, सौ. अश्विनी टिळक, श्री. राहूल कुलकर्णी, सौ. आदिती आठल्ये यांनी गायन सेवा केली आहे. सर्व रचनांचे संगीत 'अमृतादास यांचे आहे.

या प्रसंगी श्री रामदास स्वामी संस्थानचे अध्यक्ष श्री. भूषण स्वामी, श्री. सुधीरबुवा रामदासी (निलंगामठपती) श्री. राजेंद्र दिक्षीत. श्री. हिमांशु दिक्षीत, श्री. यशोधन आदमणे, श्री. शशिकांत आठल्ये उपस्थित होते.

# श्रीसमर्थ रामदास अध्यासन व्याख्यानमाला

श्रीसमर्थ रामदास अध्यासनाचे संचालक, संस्थापक कै.प्रा.डॉ.र.रा.गोसावी यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रबोधन व्याख्यानमाला ता.२२ ते २४ मार्च एरंडवणा भागातील सहकार उद्यान सभागृहात संपन्न झाली.

या प्रबोधन मालेतील पहिले व्याख्यान डॉ.यशवंत वैशंपायन यांचे 'दासबोधातील व्यवस्थापन' या विषयावर होते. ते म्हणाले,' समर्थांनी पहिले ते हरिकथा निरूपण। दुसरे ते राजकारण। तिसरे सावधपण। सर्व विषयी ।।' हे सूत्र संपूर्ण दासबोध ग्रंथात सांभाळले आहे. समर्थांच्या काळात १७ व्या शतकात भारतात मुसलमानी सत्तेचा अंमल होता. या सत्तेच्या भोगवादी लालसेमुळे सारा समाज निष्क्रिय झालेला होता. सामान्य माणूस दारिद्र्याने, अंधश्रद्धेने गांजलेला होता. तो असुरक्षित होता, स्त्री, शूद्रांवर होणारे अत्याचार, समर्थांनी त्यांच्या भारत यात्रेत पाहिले होते. समाजाच्या ह्या दारूण अवस्थेने त्यांच्या मनाला यातना झाल्या.

अशा विस्कळीत, स्वधर्म विसरलेल्या समाजात जागृती करून, त्यांची संघटना करण्याचे कामास समर्थांनी सुरूवात केली. कीर्तनातून, ग्रंथलेखनातून त्यांनी प्रबोधनास सुरूवात केली. या संघटनेचे नेतृत्व करणारा महंत प्रज्ञावंत, नीतिवंत, बुद्धीमान, सात्विक आचरणाचा, निःस्पृह असावा हा त्यांचा दंडक होता.

समर्थांनी संघटना वाढवणे, तिचे व्यवस्थापनासाठी लावलेली सूत्रे शाश्वत आहेत. तीच आताही मॅनेजमेंटच्या शिक्षणाला उपयुक्त आहेत. पाश्चिमात्य लेखकांनी सांगितलेली संघटनेची सूत्र तीनशे वर्षापूर्वीच संतांनी, किंबहुना वेदकाळापासूनच आहेत. समाज घडविण्यासाठी, लोकसंग्रह वाढविण्यासाठी, समाजाचे प्रबोधनासाठी समर्थांची सूत्रे महत्त्वाची आहेत. नेत्याने निःस्पृह राहून, विवेकबुद्धी जागृत ठेवून कार्य करावे. समर्थ म्हणतात,'उत्कट भव्य तेचि घ्यावे। मिळमिळीत अवघेची टाकावे। निःस्पृहपणे विख्यात व्हावे। भूमंडळी ।।

दुसरे व्याख्यान पत्रकार, व्याख्याते श्री श्याम भालेराव यांचे होते. त्यांचा विषय होता 'विवेकानंद आणि समर्थ रामदास यांचे वैचारिक साम्य.''

या संदर्भात भालेराव म्हणाले,''या दोन्ही संतांच्या काळात परकीय सत्ता भारतात होत्या. दोघांनीही भारत भ्रमणांत जुलमी राजसत्ता, अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धेच्या गर्तेत सापडलेल्या समाजाचे, सामान्य माणसाचे दुःख जवळून पाहिले. तत्कालीन अस्वस्थ समाज मनाचे, अस्थिर माणसांचे जीवन पाहून व्यथित झाले.''

अशा व्यथित समाजाला उभारी देण्याचे काम स्वामी विवेकानंद, समर्थांनी केलेले आहे. तळागाळातील जनतेचा विकास, प्रगती हाच दोघांच्याही कार्याचा केंद्रबिंदू होता. यासाठी विवेकानंदांनी 'शिक्षणास प्राधान्य दिले, समर्थांनी भक्तिमार्गातून समाज प्रबोधनास अग्रक्रम दिला. दोघांनीही स्त्रियांना समाजात समान स्थान दिलेले आहे. विवेकानंदांनी सामान्य माणसास शिक्षण देऊन तो सक्षम केला तर स्वराज्य हे स्वधर्माची जाणीव त्याला होईल. चातुर्य त्याच्या अंगी बाणून स्वसंरक्षण करू शकेल याची जाणीव करून दिली. कुटुंबातील महिला शिकली तर कुटुंब सुधारेल, नंतर समाज सुधारून राष्ट्रही जागृत होईल. समर्थांची स्वधर्म जागृती भक्तीतून, विवेकानंदांनी शिक्षणांतून कली. हेच दोन्ही संतांचे महानकार्य आहे.

प्रबोधन मालेत शेवटच्या दिवशी संगीत विशारद श्रीमती विजया भट यांनी समर्थांची विविध पदे गाऊन, अभंग, गौळण म्हणून समर्थांची 'धन्य ते गायनी कळा' सर्वांना अनुभवास दिली. या मालेत संस्थेचे प्रास्ताविक, सत्कार डॉ.सुरेश धायगुडे यांनी केले. परिचय प्रा.सौ.वंदना कुलकर्णी, प्रा.वीणा गोसावी यांनी करून दिला. आभार डॉ.चंद्रशेखर जोशी, डॉ.भालचंद्र कापरेकर यांनी मानले. सौ.सुलेखा कापरेकर यांनी 'कल्याण करी रामराया' म्हणून समारोप केला. प्रबोधनमालेच्या सर्व दिवसांचे सूत्रसंचालन डॉ. कल्पना नातू यांनी केले.

# ग्रंथमात्र धांडोळावा...



## प्रश्नमंजुषा

आपल्या 'रघुवीर समर्थ' मासिकाच्या प्रत्येक अंकात त्या अंकातील लेखांवर आधारित 'प्रश्नमंजुषा' देत आहोत. साधारण प्रत्येक लेखातून एक प्रश्न काढला आहे.आपला अभ्यास वाढावा व वाचक समर्थ भक्तांशी संवाद घडावा, हा मुख्य हेतू आहे. सर्वाधिक योग्य व अचुक उत्तरे लिहून पाठविणाऱ्या निवडक वाचकांची नावे मासिकातून प्रसिध्द केली जातील. मे २०१३ च्या अंकातील प्रश्नांची योग्य उत्तरे देणाऱ्या वाचकांची यादी जुलै २०१३ च्या अंकात प्रसिध्द केली जाईल. या प्रश्नांची उत्तरे खालील पत्त्यावर लिहून किंवा ईमेल द्वारा पाठवावित.

**१) जेणे मक्षिका भक्षिली जाणिवेची ।**
**तया भोजनाची रुची प्राप्त कैची ।**
**अहंभाव ज्या मानसीचा विरेना ।**
**तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना ।।**
**या मनाच्या श्लोकाचा संक्षिप्त अर्थ लिहा.**

**२) शास्त्रकारांच्या मते 'श्रध्दा' म्हणजे काय ?**

**३) सध्याच्या 'स्त्री' शिक्षणातील दोष कोणते ?**

**४) अपरिग्रह म्हणजे काय ?**

**५) श्रीमत् भगवद्गीता अध्याय ४ श्लोक २८ मध्ये सांगितलेले यज्ञाचे चार प्रकार कोणते ?**

**६) श्रीसमर्थांनी रामरायाकडे मागितलेले पसायदान कोणते ?**

**७) 'नमस्कार माझा सद्गुरु रामदासा' हे अष्टक लिहिणारे समर्थ शिष्य कोण ?**

**८) श्री तुकाराम महाराजांच्या अभंगातील 'पाय न सोडावे' चा मतितार्थ काय ?**

**९) अभंग योगवासिष्ठावरील लेखाच्या आधारे प्रारब्ध म्हणजे काय ? हे थोडक्यात लिहा.**

**१०) संसारिक सुखाचे तीन प्रकार कोणते ?**

**प्रश्नमंजुषेचे उत्तर पाठविण्याचा पत्ता :**
**श्री. अमृतबुवा रामदासी ('रघुवीर समर्थ' मासिक 'प्रश्नमंजुषे' करिता)**
**श्री रामदास स्वामी संस्थान, श्री रामदास स्वामींचा मठ,**
**मु.पो. सज्जनगड, ता.जि. सातारा. पिन ४१५०१३**
**मो. ९४०४५९०७७३,** raghuvirsmasik@gmail.com

# श्रीमत् ग्रंथराज दासबोध पारायण सोहळा, मिरज-सांगली



श्रीमत् दासबोध पारायण प्रसंगी
व्यासपीठ चालक श्रीमती अनुराधा मोडक, सौ. आवंतिका जोशी
व श्री. जे. जी. कुलकर्णी



श्रीमत् दासबोध पारायण प्रसंगी सहभागी पारायणार्थी



कीर्तन श्रवणासाठी उपस्थित जनसमुदाय



श्री वेणास्वामी मठ, मिरज मठाधिपती श्री. कौस्तुभबुवा रामदासी यांचा सत्कार करताना
संस्थानच्या उपासना केंद्राचे संचालक स. भ. श्री. माधवराव देशपांडे
व समर्थ विचार प्रबोधिनीचे पदाधिकारी

# श्रीसमर्थ पादुका दर्शन सोहळा, स्वामी समर्थ मठ, विलेपार्ले, मुंबई



स्वामी समर्थ मठ, विलेपार्ले, मुंबई येथे
श्रीसमर्थ पादुकांचे पूजन करताना श्री. व सौ. नरेंद्र हेटे



श्रीसमर्थ पादुका दर्शनासाठी सुप्रसिद्ध गायक श्री. अजित कडकडे आले,
त्यांना श्रीसमर्थ प्रसाद देताना श्री. बाळासाहेब स्वामी व श्री. मोहनबुवा रामदासी

RNI - MHMAR/2007/19142 Regd. No. SATARA/036/2013-2015






जालना येथे दुष्काळी भागात तलावातील गाळ काढण्याच्या कार्यासाठी संस्थानचा सहभाग – याप्रसंगी संस्थानचे श्री.दड्डीकर, मा.जिल्हाधिकारी श्री.शाम देशपांडे, उपजिल्हाधिकारी श्री.रविंद्र गुरव, प्रकल्प अधिकारी श्री.हेमंत पांडे, उपनगराध्यक्ष श्री.राजेंद्र राऊत, स.भ.श्री.समीर खडकीकर,डॉ. भरत कुलकर्णी,श्री.श्रीकृष्ण चिंचोरकर व मान्यवर







श्री कल्याण स्वामी त्रिशताब्दी पुण्यतिथी वर्षानिमित्त 'मोरया प्रकाशन' च्या वतीने 'श्री समर्थ शिष्य कल्याण' या ग्रंथाचे प्रकाशन प.पू.स्वामी गोविंद देव गिरी (आचार्य किशोरजी व्यास) यांच्या शुभहस्ते झाले. याप्रसंगी श्री.दिलीप महाजन, श्री समर्थ वाग्देवता मंदिर,धुळेचे अध्यक्ष श्री.शामराव जोशी,श्री.बाळासाहेब स्वामी,श्री.आप्पासाहेब जहागिरदार, श्री.सुनिलजी चिंचोलकर, संस्थानचे अध्यक्ष श्री.भूषण स्वामी,जांब समर्थ ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.भारत कुलकर्णी,अॅड.श्री.दिलीप कैचे

## मासिक '॥ रघुवीर समर्थ ॥'

### समर्थ विचार प्रसार मोहीम/सभासद संख्या वृध्दी संकल्प

**एक आवाहन** :– युवक मित्रांना.., रघुवीर समर्थ मासिक सभासदांना, वाचकांना, सर्व समर्थ भक्तांना...

**एक उद्दिष्ट (प्रत्येकाचे)** :– प्रत्येक समर्थ भक्ताने कमीत कमी ५ किंवा त्यापेक्षा अधिक नवीन सभासद करुन घेणे...

**एक दृष्टी (आपल्या सभोवती)** :– आपल्या सभोवताली आपले आप्तेष्ट, मित्रपरिवार तसेच आपल्या विभागातील सार्वजनिक वाचनालय, ग्रंथालय, विद्यालय, महाविद्यालय यांना रघुवीर समर्थ मासिकाचे सभासद करून घेणे...

**एक संकल्प सर्वांचा (आगळी वेगळी गुरुदक्षिणा)** :– २०१३ या वर्षात रघुवीर समर्थ मासिकाचे नवीन १३ हजार सभासद करूया... त्यांच्या जीवनात समर्थ विचार पोहोचवून समर्थ चरणी अर्पण करुया एक आगळी वेगळी गुरुदक्षिणा...

**एक सेवक प्रतिनिधी/समिती (जिल्हास्तरीय/तालुकास्तरीय) :-**
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात व प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सेवाभावी (मिशनरी) वृत्तीने काम करण्याची इच्छा असणाऱ्या भक्तांची सेवक प्रतिनिधी किंवा समिती स्थापन करणे आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क :मंदारबुवा रामदासी – ९७६३२७१४०७, संपादक, रघुवीर समर्थ.

प्रेषक : प्रति,

।। रघुवीर समर्थ ।।

श्री रामदास स्वामी संस्थान,श्री रामदास स्वामींचा मठ,
सज्जनगड, जि. सातारा, पि.४१५ ०१३. फोन : (०२१६२) २७८२२१